(२) राष्ट्रीय उद्याने व उभयारण्यातील चिंताजनक वन्यजीव वसतिस्थान यांतील या अधिनियमान्वये मान्यता मिळालेल्या वन हक्कात सुधारणा करता येईल व त्यांचे पुन:स्थापन करता येईल. वन हक्कधारक, पुढील सर्व शर्तीचे समाधान झाल्याशिवाय वन्यजीवन संवर्धनाकरिता अबाधित क्षेत्र निर्मिती करण्याच्या प्रयोजनार्थ पूनस्थापित होणार नाही किंवा त्याच्या हक्कांना कोणत्याही रीतीने बाधा पोहचणार नाही; त्या अशा--

(क) सर्व क्षेत्रात, कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे हक्कांना मान्यता देण्याची व ते विहित करण्याची प्रक्रिया विचारात घेणे.

(ख) वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ (१९७२ चा ५३) अन्वये आपल्या अधिकारांचा वापर करताना राज्य शासनाच्या संबंधित अभिकरणाने, धारणाधिकार असणाऱ्यांच्या हालचाली किंवा त्यांची उपस्थिती यामुळे वन्यप्राण्यांवर होणारा परिणाम हा उक्त प्रजाती आणि त्यांची वसतिस्थाने यांची भरुन न काढता येण्याजोगी हानी होण्यास किंवा त्या धोक्यात येण्यास, पुरेसे कारण होईल असे सिध्द करणे.

(ग) राज्य शासनाने, सहजीवन अस्तित्वात नाही, असे योग्य पर्याय समाप्त करणे.

(घ) बाधित व्यक्ती व समुह यांच्याकरिता सुरक्षित उपजीविका पुरविण्यासाठी आणि प्रस्तुत विधि व केंद्र सरकारच्या धोरणात दिलेल्या, अशा बाधित व्यक्ती व समुह यांच्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी पुन:स्थापना करणे किंवा पर्यायी योजना तयार करणे व संसूचित करणे.

(ङ) प्रस्तावित पुन:स्थापनेसाठी व योजना - लेखी स्वरुपात मिळविण्यासाठी संबंधित क्षेत्रातील ग्रामसभेची संमती मोफत कळविणे.

(च) वचन दिलेल्या योजनेप्रमाणे सुविधा व पुन:स्थापनेच्या ठिकाणी जमीन वितरण पूर्ण केल्याशिवाय पुन:स्थापना घडून येणार नाही.

परंतु, वन्य जीव संवर्धनाच्या प्रयोजनाकरिता अशा रितीने पुन:स्थित करीत आहेत अशा हक्क धारकांकडून चिंताजनक वन्यजीव वसतिस्थाने किंवा इतर वस्तू, वापरांसाठी, राज्य शासन किंवा केंद्र सरकार लगेचच दिशा बदलणार नाही.

(३) या अधिनियमा अन्वये, वननिवासी अनुसूचित जमातींना वन भूमी व त्यांची वसतिस्थाने या बाबतीतील कोणतेही राज्य किंवा संघराज्य क्षेत्र यांच्या संबंधातील इतर पारंपारिक वननिवासींना वन हक्कांची मान्यता देणे व ते निहीत करणे अशा अनुसूचित जमाती किंवा जमाती समूह यांच्या शर्तींच्या अधीन असेल किंवा इतर पारंपारिक वननिवासी १३ डिसेंबर, २००५ च्या पूर्वी वनभूमी संपादित करील.

(४) पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या हक्क वारसागामी असेल मात्र अन्य संक्रांम्य किंवा हस्तांतरणीय नाही व विवाहित व्यक्तींच्या बाबतीत नवरा बायको या दोघांच्याही नावाने संयुक्तपणे नोंद घेण्यात येईल. आणि एकाच व्यक्तीचे प्रमुख असलेल्या कुटुंबाच्या बाबतीत एकाच प्रमुखाच्या नावे नोंद करण्यात येईल व थेट वारस नसेल तर वारसा हक्क निकटतम नातेवाईक देण्यात येईल.

(५) अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, मान्यतेची व पडताळणीची प्रक्रिया पूर्ण झाल्याखेरीज, वननिवासी अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपरिक वननिवासी यांच्या सदस्याला, त्याच्या भोगवट्यातील वनभूमितून निष्कासित करण्यात किंवा काढून टाकण्यात येणार नाही.

(६) पोट-कलम (१) द्वारे मान्य व निहीत करण्यात आलेले वनहक्क कलम ३, पोट-कलम (१) च्या खंड (क) मध्ये नमूद केलेल्या जमिनींच्या बाबतीत, अशी जमीन या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाला व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या किंवा समाजाच्या भोगवट्याखाली असेल आणि ती प्रत्यक्ष भोगवट्यासाठी असलेल्या क्षेत्रापुरती मर्यादित असेल आणि कोणत्याही परिस्थितीत चार हेक्टरपेक्षा अधिक असणार नाही.

(७) वन (संवर्धन) अधिनियम, १९८० (१९८० चा ६९) अन्वये हक्क निर्वेध करण्यासह, वनहक्क, सर्व भारापासून व प्रक्रियात्मक आश्यकतांपासून मुक्तपणे प्रदान करण्यात येतील, या अधिनियमात विनिर्दिष्ट करण्यात आले आहे त्याखेरीज वनजमिनीच्या रूपांतरासाठी ''निव्वळ चालू मूल्य'' व ''पूरक वनरोपण'' प्रदान करण्याची आवश्यकता असेल.

(८) या अधिनियमान्वये मान्य व निहित करण्यात आलेल्या वन हक्कामध्ये आपल्या निवासस्थानातून आणि लागवडीच्या जमिनीमधून आपल्याला सरकारी विकास कामांच्या अडथळयांमुळे जमीनरूपी भरपाई न देता विस्थापित करण्यात आले असे सिध्द करणाऱ्या आणि नंतर ज्यांची जमीन, ती संपादित पाच वर्षांत ती ज्यासाठी संपादित केली होती त्या प्रयोजनार्थ वापरण्यात आली नसेल अशा वननिवासी अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वननिवासी यांच्या जमिनीवरील हक्काचा समावेश होतो.

वनहक्क धारकाची कर्तव्ये.

**५.** या अधिनियमान्वये, कोणताही हक्कधारक,--

(क) वन्य जीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करणे;

(ख) लगतची पाणलोट क्षेत्र, जल स्त्रोत व परिस्थितिकीदृष्ट्या अन्य संवेदनाक्षम क्षेत्रे पुरेशी संरक्षित आहेत याची सुनिश्चिती करील;

(ग) वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांचे निवासस्थान, त्यांच्या सांस्कृतिक व नैसर्गिक वारसाला कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचेल अशा, कोणत्याही प्रकारच्या विघातक प्रथांपासून सुरक्षित ठेवले असल्याची सुनिश्चिती करील;

(घ) सामाजिक वनांचे स्त्रोत मिळविण्याच्या मार्गाचे विनियमन करणे आणि वन्यप्राणी, वन व जैविक विविधता यांवर प्रतिकूल परिणाम करणारी कोणतीही कृती थांबविणे यांच्यासाठी ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांचे अनुपालन केले जात असल्याची सुनिश्चिती करील.

## प्रकरण चार

## वनहक्क निहित करण्यासाठी प्राधिकार व कार्यपध्दती.

वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांचे वनहक्क निहित

**६.** (१) या अधिनियमान्वये ग्रामसभेला दिल्या गेलेल्या स्थानिक मर्यादांमध्ये वनात राहणाऱ्या अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांना, वैयक्तिक किंवा सामूहिक किंवा दोहोंसाठी द्यावयाच्या वनहक्कांचे स्वरूप आणि त्यांची व्याप्ती ठरविण्याची प्रक्रिया सुरू करणारे ग्रामसभा हे एक प्राधिकरण असेल, ही प्रक्रिया त्यांच्याकडून दावे प्राप्त करून, ते एकत्रित करून, त्यांची पडताळणी करून आणि अशा हक्कांचा वापर करण्यासाठी विहित

करण्याचे प्राधिकार आणि त्याची कार्य-पध्दती.

केलेल्या रीतीने शिफारस केलेल्या प्रत्येक मागणीचे क्षेत्र निश्चित करणारा नकाशा तयार करून केली जाईल व त्यानंतर ग्रामसभा, तशा आशयाचा ठराव संमत करून, त्याची प्रत उपविभागस्तरीय समितीकडे पाठवेल.

(२) ग्रामसभेच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती पोट-कलम (३) अन्वये स्थापन करण्यात आलेल्या उपविभागस्तरीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करील आणि उपविभागस्तरीय समिती अशा विनंती अर्जावर विचार करून तो निकालात काढील :

परंतु असे की, असा प्रत्येक विनंती अर्ज, ग्रामसभेद्वारे निर्णय संमत झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल.

परंतु आणखी असे की, व्यथित व्यक्तिला, त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा कोणताही विनंती अर्ज तिच्या विरुध्द निकालात काढला जाणार नाही.

(३) राज्य शासन, ग्रामसभेने संमत केलेले निर्णय तपासण्यासाठी उपविभागस्तरीय समिती गठीत करील आणि वनहक्काचे अभिलेख तयार करून तो अंतिम निर्णयासाठी उपविभागीय अधिकाऱ्यामार्फत जिल्हास्तरीय समितीकडे पाठवील.

(४) उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत जिल्हास्तरीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करील आणि जिल्हास्तरीय समिती अशा विनंती अर्जावर विचार करून तो निकालात काढील :

परंतु असे की, उपविभागस्तरीय समितीकडे दाखल करण्यात आल्याखेरीज आणि तिने त्यावर विचार केला असल्याखेरीज, ग्रामसभेच्या निर्णयाविरुध्दचा कोणताही विनंती अर्ज थेट जिल्हास्तरीय समितीपुढे दाखल करण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय असा कोणताही विनंती अर्ज व्यथित व्यक्तीच्या विरुध्द निकालात काढला जाणार नाही.

(५) राज्य शासन, उपविभागस्तरीय समितीने तयार केलेल्या वनहक्कांच्या अभिलेखावर विचार करून त्यांना अंतिम मान्यता देण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करील.

(६) वनहक्काच्या अभिलेखावरील जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

(७) राज्य शासन, वनहक्कांना मान्यता देण्याच्या व ते निहित करण्याच्या प्रक्रियेचे संनियत्रण करण्याकरिता आणि जर नोडल एजन्सीने मागणी केल्यास अशी विवरणे व असे अहवाल तिला सादर करण्याकरिता, एक राज्यस्तरीय संनियंत्रण समिती गठीत करील.

(८) उपविभागस्तरीय समिती, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय संनियंत्रण समिती या विहित करता येईल अशा समुचित स्तरावर, राज्य शासनाच्या महसूल, वन व आदिवासी कार्य विभागाच्या अधिकारी आणि त्या त्या स्तरावरील पंचायती राज संस्थांनी योग्य त्या स्तरावर नेमलेले तीन सदस्य राहतील. त्यापैकी दोन सदस्य अनुसूचित जमातीपैकी असतील व किमान एक महिला सदस्य असेल.

(९) उपविभागस्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती व राज्यस्तरीय संनियंत्रण समिती यांची रचना व कार्ये आणि त्यांची कार्ये पार पाडताना त्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती, ही विहित केल्याप्रमाणे असेल.

## प्रकरण पाच

### वनहक्क निहित करण्यासाठी प्राधिकार व कार्यपध्दती.

या अधिनियमान्वये प्राधिकरणांचे व समित्यांचे सदस्य किंवा अधिकारी यांच्याकडून झालेले अपराध.

**७.** जेव्हा, कोणतेही प्राधिकरण किंवा समिती किंवा अशा प्राधिकरणाचा किंवा समितीचा अधिकारी किंवा सदस्य या अधिनियमाच्या, तरतुदीचे किंवा त्याखाली करण्यात आलेल्या वनहक्कांच्या मान्यतेसंबंधीच्या कोणत्याही नियमाच्या, तरतुदीचे उल्लंघन करील तेव्हा तो किंवा ते या अधिनियमाखाली अपराधाबद्दल दोषी गृहित धरले जाईल आणि त्याच्याविरुध्द कार्यवाही व एक हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र ठरेल.

परंतु, असे की, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, प्राधिकरणाच्या किंवा समितीच्या कोणत्याही सदस्याने किंवा विभाग प्रमुखाने किंवा या कलमात निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, अपराध तिच्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून त्याने सर्व यथोचित दक्षता घेतली होती असे सिध्द केले तर ती कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

अपराधांची दखल.

**८.** ग्रामसभेच्या ठरावाशी संबंधित विवादाच्या प्रकरणात, कोणत्याही वननिवासी अनुसूचित जमातीने स्वत: किंवा कोणत्याही उच्च प्राधिकरणाच्या विरोधात मांडलेल्या ठरावाद्वारे राज्यस्तरीय संनियंत्रण समितीला साठ दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीची नोटीस दिल्याशिवाय आणि राज्यस्तरीय संनियंत्रण समितीने अशा प्राधिकरणाच्या विरोधात कार्यवाही केल्याशिवाय, कोणतेही न्यायालय कलम ७ अन्वये केलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

## प्रकरण सहा

### संकीर्ण

प्राधिकरणाचे सदस्य इत्यादी लोकसेवक असणे.

**९.** प्रकरण चारमध्ये निर्देशिलेल्या प्राधिकरणांचा प्रत्येक सदस्य आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करणारा प्रत्येक अन्य अधिकारी हा भारतीय दंड संहितेच्या (१९६० चा ४५) कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

सद्भावपूर्वक केलेल्या कृतीला संरक्षण.

**१०.** (१) या अधिनियमान्वये, सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृतीकरिता केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या विरोधात कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

(२) या अधिनियमान्वये, सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृतीमुळे कोणतेही नुकसान झाले किंवा नुकसान होण्याची शक्यता असेल तर केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा त्यांच्या अधिकाऱ्यांच्या किंवा अन्य कर्मचाऱ्यांच्या विरोधात कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

(३) या अधिनियमान्वये, सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृतीमुळे प्रकरण चारमध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही प्राधिकरणाच्या तसेच त्याची अध्यक्षपदस्थ व्यक्ती, सदस्य, सदस्य-सचिव, अधिकारी व अन्य कर्मचारी यांच्या विरोधात कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

नोडल एजन्सी.

**११.** जनजातींचे कामकाज पाहणारे केंद्र सरकारचे मंत्रालय किंवा केंद्र सरकारने याबाबतीत प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण हे या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याकरिता नोडल एजन्सी म्हणून काम पाहतील.

**१२.** प्रकरण चारमध्ये निर्देशलेले प्रत्येक प्राधिकरण, केंद्र सरकार वेळोवेळी लेखीस्वरूपात देईल अशा

निदेश देण्याबाबतचा केंद्र सरकारचा अधिकार.

सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांना अधीन राहून, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये नेमून देण्यात आलेली आपली कर्तव्ये बजावील व आपल्या अधिकाराचा वापर करील.

हा अधिनियम अन्य कोणत्याही कायद्याला न्यूनता आणीत नाही.

**१३.** या अधिनियमात किंवा पंचायती (अनुसूचित क्षेत्रासाठी विस्तारित) अधिनियम, १९९६ (१९९६ चा ४०) च्या तरतुदी सोडून या अधिनियमातील तरतुदी अन्य अधिनियमातील तरतुदी त्यांना न्यूनता न आणता भर टाकणाऱ्या असतील.

नियम करण्याचा अधिकार.

**१४.** (१) केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम तयार करील.

(२) विशेषत: आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीची तरतूद करण्याकरिता, असे नियम करता येतील :--

(क) कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीकरिता कार्यपध्दतीचे तपशील;

(ख) दावे प्राप्त करण्याची, ते एकत्रित करण्याची व त्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया करून कलम ६, पोट-कलम (१) अन्वये असलेल्या वनहक्कांचा वापर करण्याकरिता शिफारस केलेल्या प्रत्येक मागणीचे क्षेत्र निश्चित करणारा नकाशा तयार करणे आणि त्या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये उपविभागीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करण्याची रीत;

(ग) कलम ६ च्या पोट-कलम (८) अन्वये उपविभागस्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती आणि राज्यस्तरीय संनियंत्रण समिती यांचे सदस्य म्हणून नियुक्त करावयाच्या, राज्य शासनाच्या महसूल, वन व आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांचा स्तर;

(घ) कलम ६, पोट-कलम (९) अन्वये उपविभागस्तरीय समिती, जिल्हास्तरीय समिती आणि राज्यस्तरीय संनियंत्रण समिती यांची रचना व कार्ये आणि कलम ६, पोट-कलम (९) अन्वये त्यांची कार्ये पार पाडतांना त्यांनी अनुसरावयाची कार्यपध्दती;

(ङ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर. ते सभागृह एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असतांना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**के. एन. चतुर्वेदी,**

भारत सरकार

**( भारताचे राजपत्र, भाग दोन, कलम-३, पोट-कलम (१) दिनांक १ जानेवारी २००८ )**

**सुधारणासह दिनांक ६ सप्टेंबर २०१२**

## भारत सरकार

## जनजाती कार्य मंत्रालय

## अधिसूचना

नवी दिल्ली : १ जानेवारी २००८

**जी. एस. आर. १ (ई).**---ज्याअर्थी, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) नियम, २००७ नुसार आवश्यक असल्याप्रमाणे, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) नुसार कलम १४ च्या पोट-कलम (१) अन्वये भारत सरकारच्या जमाती कार्य मंत्रालयाची अधिसूचना क्र. जीएसआर-४३७ (e), दिनांक १९ जून २००७ याच्या त्याच दिनांकाच्या, भारताचे राजपत्र, भाग-दोन, कलम-३ पोट-कलम (एक) मध्ये, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) नियम, २००७ चा मसुदा प्रसिद्ध करण्यात आला होता आणि यामुळे बाधित होऊ शकतील अशा सर्व व्यक्तींकडून उक्त अधिसूचनेचा अंतर्भाव असलेल्या राजपत्राच्या प्रती जनतेस उपलब्ध करून दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवस पूर्ण होण्यापूर्वी, हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, उक्त राजपत्राच्या प्रती जनतेला दिनांक २५ जून २००७ रोजी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, उक्त नियमांच्या मसुद्यांच्या संबंधातील जनतेकडून प्राप्त झालेल्या हरकती व सूचना, केंद्र सरकारद्वारे विचारात घेण्यात आल्या आहेत.

त्याअर्थी, आता अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ (२००७ चा २) यांचे कलम १४, पोट-कलम (१) व (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, केंद्र सरकार, याद्वारे अशा वनभूमिवर राहणाऱ्या वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) नियम, २००८ ला मान्यता देण्यासाठी व ते निहित करण्यासाठी पुढील नियम करीत आहे, ते असे,

**१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(१) या नियमांना अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) सुधारित नियम, २००७ असे म्हणावे[२]

(२) यांचा विस्तार जम्मू व कश्मिर वगळून संपूर्ण भारतभर असेल.

(३) हे नियम शासकीय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

**२. व्याख्या**

(१) या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर

(क) "अधिनियम" याचा अर्थ, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनिमय, २००६ (२००७ चा २) असा आहे.

(ख) "उपजिविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजा" याचा अर्थ या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या

---

१. **टिप - " # "** हे चिन्ह मूळ मांडणी नियम, २००७ आणि १ जानेवारी २००८ दर्शविते.

२. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

कोणत्याही हक्कांचा वापर करून स्वत:च्या अथवा कुटुंबाच्या उपजीविकेच्या गरजा पूर्ण करणे असा आहे आणि यामध्ये अशा हक्कांच्या वापरातून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त उत्पादनांचा समावेश असेल, असा आहे.[३]

(ग) ''मागणीदार'' याचा अर्थ अधिनियमात सूचिबद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही हक्कास मान्यता देण्यासाठी व ते निहित करण्यासाठी मागणी करणारी व्यक्ती, व्यक्तीचा गट, कुटुंब किंवा समूह असा आहे. (गक) ''सामूहिक हक्क'' याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम १ च्या खंड (ख), (ग), (घ), (ङ), (ज), (झ), (ञ), (ट) आणि (ठ) यामध्ये सूचिबद्ध केलेले अधिकार असा आहे. [४]

(घ) या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये, ''गौण वनोत्पादनांची विल्हेवाटी'' मध्ये त्यांची विक्री करण्याच्या तसेच त्यांवर वैयक्तिक किंवा सामूहिक प्रक्रिया करण्याच्या, त्यांची साठवण करण्याच्या, त्यांचे मूल्यवर्धन करण्याच्या, त्यांची वनक्षेत्राच्या आत व बाहेर समूचित वाहतुकीच्या साधनांना अशा उत्पादनांचा वापर करण्यासाठी किंवा ती गोळा करून किंवा उपजिवीकेसाठी त्यांची सहकारी संस्था किंवा संघ किंवा महासंघ यामार्फत विक्री करण्यासाठी वाहतूक करण्याच्या हक्काचा समावेश असेल.[५]

**स्पष्टीकरण**

(१) नियम ४ पोट-नियम १ खंड (ङ) अन्वये गठित केलेली समिती अथवा ग्रामसभेने प्राधिकृत व्यक्ती यांच्याद्वारे गौण वनोत्पादनांच्या वाहतुकीसंबंधात पारगमन परवाना पद्धतीत फेरबदल येतील व तो देण्यात येईल.

(२) पारगमन परवाने देण्याच्या कार्यपद्धतीविषयक आवश्यकता कोणत्याही प्रकारे गौण वनोत्पादनांच्या विल्हेवाटीबाबतचे हक्क निर्बंधित अथवा संकोचित करणार नाहीत.

(३) गौण वनोत्पादनांचे संकलन हे सर्व प्रकारचे स्वामित्त्वधन अथवा शुल्क अथवा इतर कोणत्याही प्रकारचे आकार यापासून मुक्त असेल.

(ङ) ''वनहक्क समिती'' याचा अर्थ नियम ३ अन्वये ग्रामसभेद्वारे गठित करण्यात आलेली समिती असा आहे.

(च) ''कलम'' याचा अर्थ अधिनियमाचे कलम, असा आहे.

(२) या अधिनियमात व्याख्या केलेल्या परंतु या नियमात व्याख्या करण्यात न आलेल्या शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात जे अर्थ नेमून दिले असतील ते ते अर्थ असतील.

२. (क) वाडी/पाडे किंवा वसाहती निश्चित करणे आणि त्यांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया राज्य शासन सुनिश्चित करेल की,

---

३. बदल नियम २ (१) (ख) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

**" # "** नियम २ (१) (ख) उपजीविकेच्या वास्तविक गरजा याचा अर्थ या अधिनियमाच्या कलम ३ याच्या पोट-कलम (१) च्या खंड (क), (ग), (घ) अन्वये तरतूद केल्यानुसार वन भूमीच्या स्वयं लागवडीतून उत्पादनांची निर्मिती किंवा विक्री याद्वारे स्वत: च्या व कुटुबांच्या कायमस्वरूपी गरजांची परिपूर्ती, असा आहे.

४. समावेश नियम २ (ग आणि क) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

५. बदल नियम २ (I-घ) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

**" # "** नियम २ (I) (घ) या अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ग) अन्वये, ''गौण वनोत्पादनाची विल्हेवाट''.

यामध्ये उपजिवेकेसाठी एकत्र येणारे किंवा समूह यांनी अशा उत्पादनाच्या वापराकरिता किंवा विक्रीकरिता, स्थानिक पातळीवरील प्रक्रिया, मूल्यवर्धन, डोक्यावरून, सायकलवरून व हातगाडीवरून वनक्षेत्रामध्ये वाहून नेणे याचा समावेश आहे.

(क) प्रत्येक पंचायत तिच्या हद्दीतील महसूली अथवा वनग्राम अभिलेखांचा औपचारिकरित्या भाग नाहीत अशा वाडी/पाडे, वस्त्या, नोंद न झालेल्या अथवा सर्वेक्षण न झालेल्या वसाहती किंवा वनग्राम गावे किंवा टांग्या गावे यांची यादी तयार करील आणि अशी यादी अशा प्रत्येक वस्त्या, वाडी/पाडे किंवा वसाहती यांची ग्रामसभा आयोजित करून संमत करून घेईल आणि पंचायतीच्या ठरावाद्वारे सदर अधिनियमाच्या प्रयोजनार्थ अशा वाडी/पाडे, वस्त्या गाव म्हणून समावेश करण्यात येईल व अशी यादी उपविभागस्तरीय समितीस सादर करील.

(ख) उपविभागस्तरीय समितीचे उपविभागीय अधिकारी हे सध्या कोणत्याही गावाचा भाग नसलेल्या मात्र ठरावाद्वारे पंचायतीमधील गाव म्हणून समावेश केलेल्या वाड्या/पाडे आणि वस्त्या यांच्या याद्या एकत्रित करतील आणि विद्यमान गावामध्ये असे गाव म्हणून समाविष्ट करून किंवा राज्याच्या या संबंधातील कायद्यातील प्रक्रिया अनुसरून त्या तयार करतील आणि जनतेच्या काही सूचना असल्यास, त्या विचारात घेऊन जिल्हास्तरीय समिती अशा याद्या अंतिम करील.

(ग) अशा वाड्या/पाड्या आणि वस्त्या यांच्या याद्या अंतिम झाल्यानंतर यापूर्वीच मान्यता मिळालेल्या कोणत्याही हक्कांना बाधा न अशा वाड्या/पाडे आणि वस्त्या यांना मान्यता देण्याचे व त्यांच्यात हक्क निहित करण्याची प्रक्रिया हाती घेण्यात येईल.[६]

**३. ग्रामसभा**

(१) ग्रामसभा ही ग्रामपंचायतीद्वारे आमंत्रित करण्यात येईल आणि तिच्या पहिल्या सभेत, ती तिच्या सदस्यांमधून दहापेक्षा कमी नसतील परंतु पंधरापेक्षा जास्त नसतील अशा सदस्यांना वनहक्क समितीचे सदस्य म्हणून निवडून देईल. त्या समितीमध्ये किमान दोन-तृतीयांश सदस्य अनुसूचित जमातीचे असतील.[७] परंतु, अशा सदस्यांपैकी एक-तृतीयांशपेक्षा कमी नसतील एवढे सदस्य महिला असतील. परंतु आणखी असेही की, अनुसूचित जमातीचे सदस्यच नसतील तर अशा सदस्यांपैकी किमान एक-तृतीयांश सदस्य महिला असतील.

(२) वनहक्क समिती अध्यक्ष व सचिव यांचेबाबत निर्णय घेईल व तो उपविभागीयस्तरीय समितीला कळवील.

(३) वनहक्क समितीचा सदस्य हा जेव्हा व्यक्तिगत वनहक्काचाही मागणीदार असेल तेव्हा तो समितीला त्याबाबत कळवील आणि त्याचा दावा विचारात घेण्यात येत असेल त्यावेळी तो पडताळणीच्या प्रक्रियेत सहभागी होणार नाही.

(४) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) सुधारित नियम, २०१२ अंमलात येण्यापूर्वी मान्य केलेले वनहक्क किंवा सुरू केलेल्या दाव्यांच्या पडताळणीची प्रक्रिया यावर वनहक्क समिती पुन्हा नव्याने विचार करणार नाही.[८]

**४. ग्रामसभेची कार्य - (१) ग्रामसभा -**

---

६. समावेश नियम २ (ग) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

७. बदल नियम ३ (i) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

“ # ” नियम ३ (I) समितीमध्ये किमान एक-तृतीयांश सदस्य अनुसूचित जमातीचे असतील.

८. समावेश नियम ८ (४) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

(क) वनहक्काचे व व्याप्ती निर्धारीत करण्याची प्रक्रिया सुरू करील आणि त्याच्यासंबंधित दावे प्राप्त करून त्यांची सुनावणी करील.

(ख) वनहक्कांच्या मागणीदारांची यादी तयार करीत व मागणीदार व त्यांचे दावे यांच्या केंद्र सरकारने आदेशाद्वारे निर्धारित केलेल्या अशा तपशिलांचा अंतर्भाव असलेली नोंदवही ठेवील.

(ग) हितसंबंधित व्यक्ती व संबंधित प्राधिकरण यांना वाजवी संधी दिल्यानंतर, वनहक्कांच्या मागण्यांचा निर्णय संमत करीत व तो उपविभागस्तरीय समितीकडे अग्रेषित करील.

(घ) अधिनियमाच्या कलम ४ पोट-कलम (२) यांच्या खंड (ङ) अन्वये पुनर्वसाहतींची पॅकेजेस विचारात घेईल व यथोचित निर्णय संमत करील; आणि

(ङ) अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतुदी अंमलात आणण्याच्यादृष्टीने, वन्य जीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी तिच्या सदस्यांमधून समिती गठीत करील.

(च) अनुसूचित जमातीचे वननिवासी व इतर पारंपरिक वननिवासी यांच्या फायद्यासाठी अशा सामूहिक वनसंपत्तीचे निरंतर व समसमान व्यवस्थापन करण्यासाठी सामूहिक वनसंपत्तीचे संवर्धन करण्याची व तिचे व्यवस्थापन करण्याची योजना तयार करणाऱ्या आणि वनविभागाच्या सूक्ष्म योजना किंवा चालू योजना किंवा व्यवस्थापन योजनांबरोबर अशा संवर्धन व व्यवस्थापन योजनांचे, समितीला करणे आवश्यक वाटेल अशा फेरबदलांविषयी एकत्रीकरण करणाऱ्या खंड (ङ) खाली गठित करण्यात आलेल्या समितीचे संनियंत्रक व नियंत्रण करणे.

(छ) वाहतूक, परवाना, उत्पादनांच्या विक्रीपासूनचे उत्पन्न किंवा व्यवस्थापन आराखड्यात बदल करण्याशी संबंधित सर्व निर्णयांना मान्यता देणे.

(२) ग्रामसभेच्या बैठकीची गणपूर्ती ग्रामसभेच्या सर्व सदस्य संख्येच्या अर्ध्यापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्य संख्येने होईल. परंतु, उपस्थित सदस्यांच्या किमान एक-तृतीयांश इतक्या महिला असतील.

परंतु, आणखी असे की, जेथे वनहक्कासंबंधी कोणतेही निर्णय संमत करावयाचे असल्यास किमान पन्नास टक्के इतक्या वनहक्कांची मागणी करणारे दावेदार किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असतील.

परंतु, असेही की, असे निर्णय उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या व्यक्तींच्या साध्या बहुमताने संमत करण्यात येतील.[१०]

(३) ग्रामसभांना राज्यातील प्राधिकरणाद्वारे आवश्यक ते सहाय्य पुरविण्यात येईल.

**५. उपविभागीयस्तरीय समिती -**

---

९. समावेश नियम ४ (च), (छ) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

१०. बदल नियम ४ (ii) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

**“ # ”** नियम ४ (ii) अशा ग्रामसभेच्या सर्व सदस्यांच्या दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यसंख्येने ग्रामसभेच्या बैठकीची गणपूर्ती होईल परंतु, कोणत्याही गावात, अनुसूचित जमाती व अनुसूचित जमातीवर यांची बहु जीनसी लोकसंख्या असेल तर, अनुसूचित जमाती, आदिम जमाती गट व कृषीक- पूर्व समाज यांचे सदस्य पुरेशा प्रमाणात प्रतिनिधीत्व करतील.

राज्य शासन पुढील सदस्यांची मिळून, उपविभागीयस्तरीय समिती गठीत करील.

(क) उपविभागीय अधिकारी किंवा समतूल्य अधिकारी - अध्यक्ष ;

(ख) उपविभागाचा प्रभारी वन अधिकारी किंवा समतूल्य अधिकरी - सदस्य ;

(ग) जिल्हा पंचायतीकडून नामनिर्देशित करावयाचे गट/तहसीलपातळीवरील पंचायतीचे तीन सदस्य, ज्यांच्यापैकी किमान दोन सदस्य हे, प्राधान्यत: जे वननिवासी किंवा जे आदिम जमाती समूहामधील आहेत, असे अनुसूचित जमातीचे असतील आणि जेथे अनुसूचित जमातीचे सदस्य नसतील तेथे ते प्राधान्यत: इतर पारंपरिक वननिवासीपैकीचे दोन सदस्य असतील व त्यातील किमान एक महिला सदस्य असेल किंवा संविधानाच्या सहाव्या अनुसूचित अंतर्भूत असलेल्या क्षेत्रामध्ये स्वायत्त जिल्हा परिषद/प्रादेशिक परिषद किंवा इतर समुचित क्षेत्रस्तर यांच्याद्वारे नामनिर्देशन केलेले तीन सदस्य असतील ज्यापैकी किमान एक महिला सदस्य असेल; आणि

(घ) उपविभागाचा प्रभारी असलेला, आदिवासी विकास विभागाचा अधिकारी किंवा जेथे असा अधिकारी उपलब्ध नसेल तेथे आदिवासी कार्याचा प्रभारी अधिकारी.

**६. उपविभागीयस्तरीय समितींची कार्य - उपविभागीयस्तरीय समिती -**

(क) प्रत्येकी ग्रामसभेला, त्यांची कर्तव्ये आणि वन्य जीवन, वन व ज्यांचे संवर्धन व संरक्षण करणे गरजेचे आहे. अशा संकटग्रस्त वनस्पती व प्राणीजात यांच्यासंदर्भातील जैविक विविधतेचे संरक्षण करणे याबाबत वनहक्काची व इतरांची कर्तव्ये यांची माहिती पुरवील.

(ख) ग्रामसभा किंवा वनहक्क समिती यांना वन व महसूल नकाशे व मतदार यादी पुरवील;

(ग) संबंधित ग्रामसभांच्या सर्व निर्णयाची पडताळणी करील.

(घ) ग्रामसभेद्वारे पुरविण्यात आलेले नकाशे व तपशील एकत्रीत करील.

(ङ) दाव्यांच्या खरेपणाची खात्री करून घेण्यासाठी ग्रामसभेच्या निर्णयांची व नकाशांची तपासणी करील.

(च) वनहक्कांचे स्वरूप व त्याचा विस्तार याविषयी ग्रामसभामधील विवादांची सुनावणी करील व अधिनिर्णय देईल.

(छ) ग्रामसभेच्या निर्णयांनी व्यथित झालेल्या व्यक्तीने व राज्य अभिकरणांनी केलेल्या विनंती अर्जाची सुनावणी करील.

(ज) आंतरउपविभागीय दाव्यांकरिता इतर उपविभागस्तरीय समित्यांशी समन्वय साधील.

(झ) शासकीय अभिलेखाशी मेळ साधल्यानंतर प्रस्तावित वनहक्कांचा गट किंवा तहसीलनिहाय अभिलेखाचा मसुदा तयार करील.

(ञ) उपविभागीय अधिकाऱ्यांद्वारे प्रस्तावित वनहक्कांच्या अभिलेखाच्या मसुद्यासह दावे अंतिम निर्णयासाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठवील.

(ट) अधिनियम व नियमान्वये घालून दिलेली उद्दीष्टे व पद्धती याविषयी वन निवासीत जागृती निर्माण करील.

(ठ) या नियमांचा जोडपत्र-एक (नमुना क, ख आणि ग) मध्ये दिलेल्या दाव्यांची प्रपत्रे दावेदारांना सहज आणि विनामूल्य उपलब्ध

होतील याची खातरजमा करण्यात येईल.[११]

(ड) ग्रामसभेच्या बैठका आवश्यक त्या गणपूर्तीसह, मुक्त, खुल्या वातावरणात व चांगल्यारितीने आयोजित करण्यात येत असल्याची सुनिश्चिती करील.

**७. जिल्हास्तरीय समिती - राज्य शासन पुढील सदस्यांची मिळून जिल्हास्तरीय समिती गठीत करील.**

(क) जिल्हाधिकारी किंवा उप-आयुक्त-अध्यक्ष;

(ख) संबंधित विभागीय वन अधिकारी किंवा संबंधित उपवनसंरक्षक - सदस्य;

(ग) जिल्हा पंचायतीद्वारे नामनिर्देश करावयाचे जिल्हा पंचायतीचे तीन सदस्य, ज्यापैकी, दोन, सदस्य हे जे प्राधान्यत: वननिवासी किंवा अदिम जमाती गटांमधील अनुसूचित जमातीचे असतील व जेथे अनुसूचित जमाती नसतील तेथे जे प्राधान्यत: इतर पारंपरिक वननिवासी आहेत व त्यातील किमान एक महिला सदस्य असेल असे दोन सदस्य; किंवा संविधानाच्या सहाव्या अनुसूचिमध्ये अंतर्भूत असलेल्या क्षेत्रांमध्ये, स्वायत्त जिल्हा परिषद/प्रादेशिक परिषद यांनी नामनिर्देशीत करावयाचे तीन सदस्य, ज्यापैकी किमान एक महिला सदस्य; आणि,

(घ) जिल्ह्याचा प्रभारी असलेला अदिवासी कल्याण विभागाचा अधिकारी किंवा असा अधिकारी उपलब्ध नसल्यास, आदिवासी कार्याचा प्रभारी असलेला अधिकारी.

**८. जिल्हास्तरीय समितींची कार्य - जिल्हास्तरीय समिती -**

(क) नियम सहा, खंड (ख) अन्वये, ग्रामसभेला किंवा वनहक्क समितीला आवश्यक माहिती पुरविण्यात आली आहे याची खात्री करील.

(ख) सर्व हक्क मागण्या, विशेषत: आदिम, आदिवासी समूह, फिरते आदिवासी आणि भटक्या जमाती यांच्या अधिनियमांची उद्दिष्टे ध्यानात ठेवून संबोधित करण्यात आल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करील.

(ग) उपविभागस्तरीय समितीद्वारे तयार करण्यात आलेल्या वन हक्कांच्या हक्क मागण्या व अभिलेख विचारात घेईल व त्यास अंतिम मान्यता देईल.

(घ) उपविभागस्तरीय समितीच्या आदेशाने व्यथित झालेल्या व्यक्तींकडून आलेल्या विनंती अर्जाची सुनावणी करील.

(ङ) आंतर जिल्हा हक्क मागण्या संबंधात इतर जिल्ह्यांसह समन्वय साधेल.

(च) हक्कांविषयीच्या अभिलेखासह सर्व संबंधित शासकीय अभिलेखांमध्ये वनहक्कांचा समावेश करण्याकरिता निदेश देईल.

(छ) अंतिम रूप देण्यात आलेल्या वन हक्कांचे अभिलेख प्रसिद्धी करण्यात आल्याची खात्री करील.[१२]

---

११. बदल नियम ६ (ठ) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

" # " नियम ६ (ठ) या नियमाच्या जोडपत्र-एक (नमुना क व ख) मधील तरतुदीनुसार, मागणीदाराच्या दाव्याची प्रपत्रे सहजगत्या व मोफत उपलब्ध होतील या विषयी सुनिश्चिती करील.

१२. समावेश नियम ८ (छ) "आणि" हे शब्द वगळण्यात आले. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

(ज) या नियमांच्या जोडपत्र दोन व तीनमध्ये विनिर्दिष्ट केल्यानुसार या अधिनियमान्वये वनहक्कांच्या व मालकीहक्कांच्या अभिलेखांची प्रमाणित प्रती, अनुक्रमे संबंधित मागणीकरिता आणि त्या त्या ग्रामसभेला पुरविण्याची खात्री करील आणि[१३].

(झ) या नियमांच्या जोडपत्र-चारमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे या अधिनियमान्वये सामूहिक वनसाधनसंपत्तीचे हक्क व मालकी हक्क यांच्या अभिलेखांच्या प्रमाणित प्रत संबंधित ग्रामसभेला किंवा कलम ३ च्या पोट-कलम-१ च्या खंड (ठ) अन्वये ज्या समूहाला सामूहिक वनस्पतींचे हक्क देण्यास मान्यता देण्यात आली आहे अशा समूहाला देण्यात आल्याची खातरजमा करण्यात येईल.[१४]

**९. राज्यस्तरीय सनियंत्रण समिती - राज्यशासन, पुढील सदस्यांची मिळून राज्यस्तरीय संनियंत्रण समिती गठीत करील -**

(क) मुख्य सचिव - अध्यक्ष;

(ख) सचिव, महसूल विभाग - सदस्य;

(ग) सचिव, आदिवासी विकास किंवा समाज कल्याण विभाग सदस्य;

(घ) सचिव, वन विभाग - सदस्य;

(च) प्रधान मुख्य वनसंरक्षक - सदस्य;

(ङ) सचिव, पंचायत राज - सदस्य;

(छ) जमाती सल्लागार परिषदेच्या अध्यक्षाद्वारे नामनिर्देशीत करावयाचे जमाती सल्लागार परिषदेचे तीन अनुसूचित जमाती सदस्य आणि जेथे जमाती सल्लागार परिषद नसेल तेथे राज्य शासनाद्वारे नामनिर्देशीत करावयाचे तीन अनुसूचित जमाती सदस्य;

(ज) आयुक्त, आदिवासी कल्याण किंवा समतूल्य असा सदस्य सचिव,

**१०. राज्यस्तरीय सनियंत्रण समितीची कार्य - राज्यस्तरीय संनियंत्रण समिती -**

(क) वनहक्कांना मान्यता देणे व ते निहित करणे या प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याचे निकष व निर्देशक तयार करील.

(ख) वनहक्कांना मान्यता देणे, त्यांची पडताळणी करणे व ते राज्यात निहित करणे यांच्या प्रक्रियेवर संनियंत्रण करील;

(ग) वनहक्क मान्य करणे, त्यांची पडताळणी करणे आणि ते निहित करणे यांचे प्रक्रियेचे संनियंत्रण करण्यासाठी ३ महिन्यातून किमान एकदा बैठक घेण्यात येईल, क्षेत्रीयस्तरावरील समस्यांचा विचार आणि निराकरण करण्यासाठी आणि या नियमांच्या जोडपत्र-पाचला जोडलेल्या नमुन्यात दाव्यांची स्थिती, या अधिनियमाअन्वये मान्य केलेल्या दाव्यांचा तपशील, त्यापैकी कोणते फेटाळण्यात आली असल्यास त्यांचे कारणे आणि प्रलंबित दाव्यांची स्थिती निश्चित झाल्यावर यांचा केंद्रसरकारला तिमाही अहवाल सादर करण्यात येईल. [१५]

(घ) या अधिनियमाच्या कलम ८ मध्ये नमूद केल्यानुसार कोणतीही अशी नोटीस प्राप्त झाल्यावर, अधिनियमाअन्वये, अशा

---

१३. नियम ८ (ज) मध्ये "आणि" हे शब्द समावेश करण्यात आले अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

१४. समावेश नियम ८ (झ) मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

१५. बदल नियम १० (ग) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

**" # "** नियम १० (ग) वनहक्कांना मान्यता देणे, त्यांची पडताळणी करणे व ते निहित करणे, यांच्या प्रक्रियेचा सहामाही अहवाल सादर करील व मुख्य अभिकरणाद्वारे मागविण्यात येतील अशी विवरणपत्रे व अहवाल मुख्य अभिकरणाला सादर करील.

प्राधिकरणाविरुद्ध यथोचित कृती करील.

(ङ) अधिनियमाच्या कलम ४ पोट-कलम (२) अन्वये पुनर्वसाहतीकरणावर संनियंत्रण करील.

(च) कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ड) आणि कलम ४ च्या पोट-कलम (८) मधील तरतुदींच्या अनुपालनांचे विनिर्दिष्टपणे संनियंत्रण ठेवण्यात येईल.[१६]

**११. ग्रामसभेद्वारे हक्क मागण्या दाखल करणे, त्या निर्धारित करणे व त्यांची पडताळणी करणे याची कार्यपद्धती -**

(१) ग्रामसभा -

(क) हक्क मागण्या मागवील आणि अशा हक्क मागण्या व नियमांच्या परिशिष्ट-एक मध्ये तरतूद केलेल्या नमुन्यात स्वीकारण्यासाठी वनहक्क समितीला प्राधिकृत करील व अशा हक्क मागण्या, त्या मागवल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या कालावधीत, नियम १३ मध्ये नमूद केलेल्या किमान दोन पुराव्यांसह स्वीकाराव्यात, परंतु असे की, ग्रामसभा, आवश्यक वाटल्यास, त्यासंबंधीची कारणे लेखी मंजूर करून हा तीन महिन्यांचा कालावधी वाढवू शकेल.

(ख) तिच्या सामूहिक वनसंपत्तीची निश्चिती करण्याच्या प्रक्रियेस सुरूवात करण्यासाठी, दिनांक निश्चित करील व तो लागू असलेल्या ग्रामसभांना कळवील आणि ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात परस्परव्याप्ती झाली असेल त्या ठिकाणी उप-विभागस्तरीय समितीला कळविल.

(२) वन हक्क समिती, ग्रामसभेला तिच्या पुढील कार्यामध्ये सहाय्य करील.

(एक) विनिर्दिष्ट स्वरूपातील हक्क मागण्या आणि अशा हक्क मागण्यांच्या पुष्ट्यर्थ पुरावा स्वीकारणे, त्याची पोच देणे व तो जतन करणे;

(दोन) हक्क मागण्या व पुरावे, तसेच नकाशे यांचा अभिलेख तयार करणे;

(तीन) वन हक्कांवर दावा सांगणाऱ्या मागणीदारांची यादी तयार करणे;

(चार) या नियमात तरतूद केलेल्या हक्क मागण्यांची पडताळणी करणे;

(पाच) ग्रामसभेपुढे, तिच्या विचारार्थ हक्क मागणीचे स्वरूप व व्याप्ती याबाबतचे त्यांचे निष्कर्ष सादर करणे.

(३) प्राप्त झालेल्या प्रत्येक हक्क मागणींची वनहक्क समितीकडून यथोचितरित्या लेखी पोच देण्यात येईल.

(४) वनहक्क समिती ग्रामसभेच्यावतीने “नमुना ख मधील सामूहिक वन हक्क” या मजकुराऐवजी “नमुना ख” मधील सामूहिक वन हक्क आणि नमुना ग मधील ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (झ) अन्वये सामूहिक वन संसाधनांचे “हक्क” दाखल करण्यात येईल.[१७]

(५) ग्रामसभा, पोट-नियम (२) च्या खंड (पाच) खालील निष्कर्ष प्राप्त झाल्यावर, वनहक्क समितीच्या निष्कर्षावर विचार करण्याकरिता पूर्वसूचना देऊन बैठक बोलविल, यथोचित ठराव संमत करून तो उपविभागस्तरीय समितीकडे पाठविल.

(६) ग्रामपंचायतीचा सचिव त्याची कर्तव्ये पार पाडताना ग्रामसभेचा सचिव म्हणूनही काम पाहील.

**१२. वन हक्क समितीकडून दाव्यांची पडताळणी करण्याची प्रक्रिया -**

---

१६. समावेश नियम १० (च) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

१७. बदल नियम ११ (४) मध्ये वनहक्क समिती, सामूहिक वनहक्कांकरिता, ग्रामसभेच्यावतीने या नियमाच्या जोडपत्र एकमधील नमुना खमध्ये हक्क मागण्या तयार करील, अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

“ # ” नियम ११ (४) सामूहिक वनहक्काकरिता नमुना ख.

(१) वनहक्क समिती, संबंधित मागणीदारास व वनविभागास योग्य सूचना दिल्यानंतर -

(क) जागेला भेट देईल व जागेवरच दाव्याचे स्वरूप, व्याप्ती व पुरावा यांचे प्रत्यक्ष पडताळणी करील आणि

(ख) मागणीदार व साक्षीदारांनी सादर केलेला आणखी कोणताही पुरावा किंवा अभिलेख स्वीकारील.

(ग) फिरते आदिवासी व भटक्या जमाती, एकतर वैयक्तिक सदस्यांमार्फत, सामूहिकरित्या किंवा पारंपरिक सामूहिक संस्थेद्वारे त्यांच्या हक्कांच्या निर्धारित करण्याकरिता केलेल्या हक्क मागणींची, जेव्हा अशी व्यक्ती, समूह किंवा त्यांचे प्रतिनिधी हजर असतील, तेव्हा पडताळणी करण्यात आली असल्याची खात्री करील.

(घ) आदिम, आदिवासी गट किंवा कृषी-पूर्व समूह यांच्या सदस्यांनी मग एक तर त्यांच्या समूहाद्वारे असो किंवा पारंपरिक समूह संस्थेद्वारे असो, त्यांच्या वसतिस्थानाचा हक्क निर्धारित करण्याकरिता केलेल्या मागणी हक्काची असे समूह किंवा त्यांचे प्रतिनिधी हजर असताना पडताळणी करण्यात आली, असल्याची खात्री करील.

(ङ) ओळखता येण्याजोगी सीमा चिन्हे दर्शवून, प्रत्येक हक्क मागणीच्या क्षेत्राचा सीमांकन नकाशा तयार करील.

(च) ज्येष्ठ नागरिक ज्यांना अशा सीमा आणि परंपरागत प्रवेशाबाबत चांगली माहिती आहे अशा ज्येष्ठ व्यक्तींसह ग्रामसभेच्या इतर सदस्यांबरोबर सामूहिक वन साधनसंपत्तीच्या परंपरागत सीमा निश्चित करण्यात येतील.

(छ) ओळखू येणाऱ्या सीमा चिन्हांसह सामूहिक वनसंपत्तीचा नकाशा तयार करण्यात येईल आणि नियम १३ च्या उपनियम २ मध्ये नमूद केलेल्या सबळ पुराव्यांद्वारे आणि त्यानंतर असे सामूहिक वनसंपत्तीचे दावे ग्रामसभेच्या साध्या बहुमताने ठराव संमत करून करण्यात येतील.

**स्पष्टीकरण :** सामूहिक वनसंपत्तीच्या सीमांकनामध्ये यांसारख्या सध्या अस्तित्वात असलेल्या वैध सीम राखीव वन, संरक्षित वन, राष्ट्रीय उद्याने आणि अभारण्ये यांचा समावेश असे आणि अशा सीमांकनामुळे समूहांच्या सामूहिक वनसाधनसंपत्ती वापर, संवर्धन आणि निरंतर वापर याबाबतच्या अधिकारांना निश्चित स्वरूप व मान्यता देण्यात येईल.[१८]

(२) वनहक्क समिती, त्यानंतर हक्क मागणीवरील तिचे निष्कर्ष नोंदविल आणि ग्रामसभेपुढे विचारार्थ सादर करील.

(३) जर दुसऱ्या गावाच्या परंपरागत किंवा रुढीगत हद्दींच्या बाबतीत परस्पर विरोधी हक्क मागण्या असतील किंवा जर वनक्षेत्राचा वापर, एकापेक्षा अधिक ग्रामसभांकडून केला जात असेल, तर संबंधित ग्रामसभांच्या वन हक्क समित्या अशा हक्क मागण्यांच्या उपभोगाच्या स्वरुपावर विचार करण्यासाठी एकत्र बैठक घेतील आणि संबंधित ग्रामसभांना त्यातील निष्कर्ष लेखी सादर करतील; परंतु, असे की, जर ग्रामसभेला परस्पराविरोधी हक्क मागण्याबाबत निर्णय घेता आला नाही तर, निर्णयाकरिता त्या उपविभागस्तरीय समितीकडे निर्देशीत करण्यात येतील.

(४) ग्रामसभा किंवा वनहक्क समिती यांनी माहिती, अभिलेख या दस्तऐवज मिळण्यासाठी लेखी विनंती केल्यावर संबंधित अधिकारी त्याची अधिप्रमाणीत प्रत ग्रामसभेकडे किंवा यथास्थिति, वनहक्क समितीकडे पाठविल आणि आवश्यक असल्यास, अधिकृत अधिकाऱ्यांद्वारे त्याचा अर्थ सुकर करण्यात येईल.

**१२. (क) वनहक्क दावे मान्य करण्याची प्रक्रिया :**

(१) वनहक्क समितीकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर वन आणि महसूल विभागाचे अधिकारी दाव्यांच्या पडताळणीदरम्यान आणि पुराव्यांच्या पडताळणीदरम्यान त्या ठिकाणी उपस्थित राहतील आणि कार्यवृत्तावर त्यांचे पदनाम, दिनांक व अभिप्राय असल्यास त्यांसह स्वाक्षरी करतील.

(२) ग्रामसभेने मान्य केलेल्या दाव्यांबाबत वन किंवा महसूल विभागाने, क्षेत्रीय पडताळणीदरम्यान त्यांचे प्रतिनिधी अनुपस्थित

१८. समावेश नियम १२ (च, छ) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

होते असा आक्षेप घेतल्यास असा दावा समितीद्वारे ज्याठिकाणी आक्षेप घेण्यात आला आहे त्याठिकाणच्या ग्रामसभेकडे पुनर्पडताळणीसाठी पुन्हा पाठविण्यात येईल आणि पडताळणी प्रक्रियेस प्रतिनिधीने पुन्हा उपस्थित राहण्यात कसूर केल्यास क्षेत्रीय पडताळणीबाबतचा ग्रामसभेचा निर्णय अंतिम राहील.

(३) ग्रामसभेने दाव्यांमध्ये फेरबदल अथवा ते फेटाळण्यात आल्यास किंवा उपविभागस्तरीय समितीद्वारे जिल्हास्तरीय समितीस अग्रेषित केलेल्या दाव्यांमध्ये फेरबदल करण्याची किंवा ते फेटाळण्याची शिफारस करण्यात आल्यास, दाव्यांवरील असा निर्णय किंवा शिफारस केल्याप्रकरणी असा निर्णय अथवा शिफारस, यथास्थिती उपविभागीय समिती अथवा जिल्हास्तरीय समितीकडे दाद मागणे शक्य व्हावे यासाठी दावेदारास व्यक्तीशः साठ दिवसांच्या कालावधीच्या आत, जो उपरोक्त समित्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार तीस दिवसांपर्यंत वाढविता येईल, त्याबाबत दावेदारास कळविण्यात येईल.

(४) अन्य कोणत्याही राज्यभिकरणास अथवा उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयास आक्षेप घ्यावयाचा असल्यास ते यथास्थिती उपविभागस्तरीय समिती अथवा जिल्हास्तरीय समितीपुढे अपिल दाखल करील, त्यावर दावेदारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर (संबंधित अभिकरणाचा प्रतिनिधीचा अनुपस्थितीत, असल्यास) समिती त्यावर निर्णय देईल.

(५) बाधित व्यक्तीला त्याच्या दाव्याच्या संबंधात कोणीतीही बाब सादर करण्यासाठी वाजवी संधी दिल्याखेरीज त्याचे अपिल निकाली काढता येणार नाही.

(६) ग्रामसभेचा निणर्य अथवा शिफारस अपूर्ण असल्याचे अथवा प्रथम दर्शनी जास्तीची तपासणी करणे आवश्यक आहे असे आढळल्यास उपविभागस्तरीय समिती अथवा जिल्हास्तरीय समिती अशा दाव्यात फेरबदल करण्याऐवजी किंवा तो फेटाळण्याऐवजी दावा ग्रामसभेकडे पुनर्विचारार्थ पाठविल.

(७) ग्रामसभेने आवश्यक कागदपत्रे आणि पुराव्यांसह दाव्याची शिफारस करणारा जो ठराव संमत केला असेल तो आणि उपविभागस्तरीय समितीने फेरबदलांसह अथवा फेरबदलांशिवाय कायम केला असेल मात्र जिल्हास्तरीय समितीने मान्य केला नसेल अशा प्रकरणी, जिल्हास्तरीय समिती यथास्थिती ग्रामसभा किंवा उपविभागस्तरीय समिती यांच्या शिफारशी न स्वीकारण्याबाबतची सविस्तर कारणे लेखीस्वरूपात नोंदवील आणि जिल्हास्तरीय समिती या सदर कारणांसह आदेशाची एक प्रत यथास्थिती दावेदार किंवा ग्रामसभा किंवा समूह यांना उपलब्ध करून देईल.

(८) कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) अन्वये मान्यता देण्यात करण्यात आलेल्या स्वतःच्या कसण्याकरिताचे वनहक्क हे शेतीपूरक बाबींसाठी उपयोगात आणल्या जात असलेल्या वनजमिनींसह जसे, जनावरे ठेवणे, उफाणणे आणि इतर कापणी पश्चात कार्यवाही, चक्री पद्धतीने पडीक, झाड पिके आणि उत्पादनांची साठवण यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत असतील.

(९) या नियमाच्या जोडपत्र-दोन, तीन व चारमध्ये नमूद केल्याप्रमाणे हक्क निश्चित करण्याची आणि मालकीहक्क प्रदान करण्याची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर, महसूल आणि वनविभाग अशाप्रकारे निहित करण्यात आलेल्या वनजमिनींचा अंतिम नकाशा तयार करील आणि संबंधित प्राधिकारी अशाप्रकारे निहित करण्यात आलेले वनहक्क संबंधित राज्याच्या कायद्यानुसार अभिलेखे अद्ययावत करण्यासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादा किंवा ३ महिन्यांचा कालावधीच्या आत, यापैकी जे अगोदर असेल, त्या कालावधीमध्ये यथास्थिति महसूल आणि वन अभिलेखामध्ये समाविष्ट करतील.

(१०) उपविभागीयस्तरीय समिती किंवा जिल्हास्तरीय समिती यांचा सर्व निर्णयात, ज्यामध्ये ग्रामसभेचे निर्णय किवा उपविभागीयस्तर समितीच्या शिफारशी यांमध्ये फेरबदल अथवा फेटाळणे यांचा समावेश असेल त्या सर्व अथवा यथास्थिति फेरबदल फेटाळण्याची सविस्तर कारणे नमूद केलेली असतील.

परंतु, कोणत्याही दाव्यांची शिफारस करणे अथवा ते फेटाळणे हे केवळ काही तांत्रिक अथवा प्रक्रियात्मक कारणांसाठी करण्यात येणार नाहीत.

परंतु, आणखी असे की, तालुका अथवा पंचायत अथवा वन बीट अथवा परिक्षेत्रस्तरावरील कोणत्याही समितीस (ग्रामसभा किंवा वनहक्क समिती सोडून) अथवा कोणत्याही श्रेणीतील कोणत्याही वैयक्तिक अधिकाऱ्यांस वनहक्कावरील कोणतेही दावे स्वीकारणे अथवा नाकारणे, त्यात फेरबदल करणे किंवा कोणत्याही दाव्यांवर निणर्य घेणे याबाबतचे अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

(११) उपविभागीयस्तरीय समिती अथवा जिल्हास्तरीय समिती दाव्यांवर निर्णय घेताना नियम १३ मध्ये नमूद विनिर्दिष्ट केलेले पुरावे

विचारात घेईल आणि दाव्याच्या विचारार्थ कोणत्याही विशिष्ट प्रकारच्या कागदपत्रांचा आग्रह करणार नाही.

**स्पष्टीकरण :**

(१) दंडाच्या पावत्या, अतिक्रमण केलेल्या याद्या, प्राथमिक अपराधाचा अहवाल, वन जमाबंदी अहवाल आणि तशाच प्रकारची कागदपत्रे, मग ती कोणत्याही नावाने ओळखली जाणारी असो पूर्वीच्या कार्यालयीन प्रक्रियेमुळे अथवा ती नसल्यामुळे तयार झालेली आहेत, ती कोणतेही दावे नाकारण्याचे एकमेव कारण असणार नाहीत.

(२) उपग्रहावरून घेतलेली छायाचित्रे आणि इतर तंत्रज्ञानाचा वापर हा इतर प्रकारच्या पुराव्यांना पूरक राहील आणि त्यांचा विचार यांच्याऐवजीचा पुरावा म्हणून करता येणार नाही.[१९]

**१२ (ख) सामूहिक वनहक्क दावे मान्य करण्याची प्रक्रिया :**

(१) जिल्हास्तरीय समिती वनहक्क कायद्याच्या कलम ३ च्या पोट-कलम १ च्या खंड (ङ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे वननिवासीमधील विशेषत: असुरक्षित जमाती समूहांची विशेष असुरक्षितता विचारात घेऊन यांची सुनिश्चिती करील की, संबंधित विशेषत: असुरक्षित जमाती समूहांच्या पारंपरिक संस्था यांच्याशी विचार विनिमय करून त्यांचे वसतिस्थानाचे अधिकारी मिळालेले आहेत आणि त्यांचे ते दावे हे त्यांच्या ग्रामसभांचे अस्थायी स्वरूप विचारात घेऊन जेथे आवश्यक तेथे त्यांच्या वसतिस्थानांच्या अधिकारांकरिताचे दावे म्हणून संबंधित ग्रामसभेपुढे सादर करण्यात येतील.

(२) जिल्हास्तरीय समिती कलम ३ च्या पोट-कलम (एक) च्या खंड (घ) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे गुरे चारणारा समुदाय, फिरस्ते आणि भटक्या समूहांचे दावे संबंधित ग्रामसभेपुढे सादर होणे सुकर करेल.

(३) जिल्हास्तरीय समिती याची सुनिश्चिती करेल की, सर्व गावांमधील वननिवासींचे कलम ३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (झ) शी संबंधित कोणत्याही सामूहिक वनसंपत्तीचे संरक्षण, पुनर्निर्माण किंवा संवर्धन किंवा व्यवस्थापन, जे वननिवासी निरंतर वापर करण्यासाठी पारंपरिकरित्या संरक्षण आणि संवर्धन करण्याकरिता आहेत, असे दावे मान्य करण्यात आले आहेत आणि हक्क देण्यात आले आहेत.

(४) एखाद्या गावामध्ये कोणत्याही प्रकारचे सामूहिक वनसंसाधनाचे हक्क मान्य करण्यात येणार नाहीत तेथे त्यांची कारणे जिल्हास्तरीय समितीच्या सचिवांकडून नमूद करण्यात येतील.

(५) कलम ३ च्या खंड (ज) मधील वनगावे, अभिलेखित केलेली नसेल अशी वसाहत यांच्या रुपांतरणामध्ये शाळा, आरोग्य सुविधा आणि सार्वजनिक ठिकाणे यांसारख्या सद्याच्या तसेच भविष्यातील सार्वजनिक उपयोगासाठी लागणाऱ्या जमिनीसह गावाच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये होणाऱ्या प्रत्यक्षात वापरलेली जमिनी, याचा समावेश असेल.[२०]

**१३. वन हक्क निश्चित करण्यासाठी पुरावा :**

(१) वन हक्कांना मान्यता देण्यासाठी व ते निहित करण्यासाठी इतर गोष्टींबरोबर पुढील गोष्टी अंतर्भूत असतील

(क) सार्वजनिक दस्तऐवज, राजपत्रे, जनगणना, सर्वेक्षण व समजोता अहवाल, नकाशे, उपग्रहीचे चित्रे, कार्ययोजना, व्यवस्थापन योजना, सूक्ष्म योजना, वन चौकशी अहवाल इतर वन अभिलेख, पट्टा किंवा भाडेपट्टा यापैकी कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या हक्कांचा अभिलेख यासारखे शासकीय अभिलेख, समित्या किंवा आयोगांचे शासनाने घटीत केलेल्या अहवाल, शासकीय आदेश, अधिसूचना, परिपत्रके, ठराव;

(ख) मतदार, ओळखपत्र, शिधावाटपपत्रिका, पासपोर्ट, घरपट्टीच्या पोच पावत्या, अधिवास प्रमाणपत्रे यासारखे शासनाने प्राधिकृत

१९. समावेश नियम १२ (क) मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

२०. समावेश नियम १२ (ख-५) मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

केलेले दस्तऐवज.

(ग) घर झोपड्या व जमिनीवर केलेल्या स्थायी सुधारणा, जसे समतलन, बांध बांधणे, रोधी बांध व तत्सम इतर भौतिक गुणविशेष ;

(घ) न्यायालयीन आदेश व न्याय निर्णय यांचा समावेश असलेले न्यायिकवत व न्यायिक अभिलेख;

(ङ) कोणत्याही वनहक्कांचा उपभोग दर्शविणाऱ्या आणि रूढिगत कायद्याचे बळ आणणाऱ्या रूढींचा व परंपरांचा भारतीय मानववंशशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेसारख्या नामांकित संस्थेने केलेला संशोधनात्मक अभ्यास व लेखांकन;

(च) भूतपूर्व प्रांतिक राज्य किंवा प्रांत किंवा अशा इतर मध्यस्थ संस्थांकडून मिळालेला कोणताही अभिलेख, यात नकाशे, हक्कनोंदी, विशेषाधिकार, सूट, अनुग्रह यांचा अंतर्भाव असेल;

(छ) प्राचीनत्व सिद्ध करणाऱ्या, विहिरी, दफनभूमि, पवित्र स्थळे यांसारख्या पारंपरिक रचना,

(ज) पूर्वीच्या भूमि अभिलेखात नमूद केलेली व्यक्तींच्या पूर्वजांचा माग काढणारी किंवा पूर्वीच्या काळी त्या गावातील कायदेशीर रहिवासी असल्याची ओळख पटविणारी वंशावळ;

(झ) मागणीदारखेरीज अन्य वडिलधाऱ्या माणसाचे लेखानिविष्ट कथन;

(२) " सामूहिक वनसंसाधन हक्क"[२१] पुराव्यात इतर गोष्टीबरोबर पुढील बाबींचा अंतर्भाव असेल :-

(क) सामूहिक हक्क जसे निस्तार - मग ते कोणत्याही नावाने संबोधले जात असोत;

(ख) पारंपरिक चराई मैदाने, मुळे व कंद, वैरण, वन्य खाद्यफळे व इतर गौण वनोत्पादने, मच्छिमार क्षेत्रे, सिंचन व्यवस्था, मनुष्य किंवा पशूंच्या वापरासाठी पाण्याचे स्रोत, औषधी वनस्पती गोळा करणाऱ्या वनस्पती व्यवसायींचे भूप्रदेश;

(ग) स्थानिक समूहाने बांधलेल्या रचनेचे अवशेष, पवित्र झाडे, देवराई, तळी किंवा नदीक्षेत्र, दफन किंवा दहन भूमी;

(घ) शासकीय अभिलेख किंवा संरक्षित वन किंवा गोचर किंवा गावांची इतर सार्वजनिक जमीन, निस्तारी वन, यासारखे सध्याच्या राखीव वनाचे असे पूर्वीचे वर्गीकरण;

(ङ) पारंपरिक शेतीची पूर्वीची किंवा सद्याची पद्धत.[२२]

(३) ग्रामसभा, उपविभागस्तरीय समिती आणि जिल्हास्तरीय समिती वनहक्क निर्धारित करताना वर नमूद केलेल्या बाबींपैकी एकाहून अधिक बाबी विचारात घेतील.

**१४. उपविभागीयस्तरीय समितीकडे केलेले विनंती अर्ज :-**

(१) ग्रामसभेच्या निर्णयाने पिडीत झालेली कोणतीही व्यक्ती ग्रामसभेने निर्णय दिल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, उपविभागस्तरीय समिती यांच्याकडे विनंती अर्ज सादर करील.

(२) उपविभागस्तरीय समिती सुनावणीच्या दिनांक निश्चित करील आणि विनंती अर्जदारास व संबंधित ग्रामसभेस सुनावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या किमान पंधरा दिवस आधी लेखी तसेच विनंती अर्जदाराच्या गावातील सोयीस्कर असलेल्या सार्वजनिक ठिकाणी नोटीस लावून त्याबाबत कळवील.

(३) उपविभागीयस्तरीय समिती - विनंती अर्ज दाखल करून घेईल किंवा तो फेटाळील, किंवा तो विनंती अर्ज संबंधित ग्रामसभेकडे पुर्नविचारार्थ पाठविल.

---

२१. बदल नियम १३ (२) अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

" # " नियम १३ (२) सामूहिक वनहक्क.

२२. समावेश नियम १३ (२-ड) मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

(४) संदर्भीय प्रकरण प्राप्त झाल्यावर तीस दिवसांच्या कालावधीच्या आत ग्रामसभा प्रकरणाचा ठराव संमत करील व उपविभागीयस्तरीय समितीकडे अग्रेषित करील.

(५) उपविभागीयस्तरीय समिती, ग्रामसभेचा ठराव विचारात घेईल व तो विनंती अर्ज स्वीकारल्याचा किंवा फेटाळल्याच्या सुमूचित आदेश संमत करील.

(६) प्रलंबित विनंती अर्जांना बाधा न आणता, उपविभागीयस्तरीय समिती, अन्य मागणीदारांच्या वनहक्कविषयक अभिलेख तपासून व पडताळून पाहील आणि तो संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांद्वारे जिल्हस्तरीय समितीला सादर करील.

(७) दोन किंवा त्याहून अधिक ग्रामसभांमध्ये विवाद झाल्यास कोणत्याही एका ग्रामसभेने किंवा उपविभागस्तरीय समितीने स्वत: केलेल्या अर्जावरून उपविभागीयस्तरीय समिती, विवाद सोडविण्याच्यादृष्टीने संबंधित ग्रामसभांची संयुक्त सभा बोलवील आणि तीस दिवसांच्या कालावधीत त्यातून परस्पर सामंजस्याने कोणताही मार्ग काढता न आल्यास, संबंधित ग्रामसभांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर विवादावर निर्णय घेईल आणि त्यावर समुचित आदेश देईल.

**१५. जिल्हास्तरीय समित्यांना विनंती अर्ज करणे :-**

(१) उपविभागीयस्तरीय समितीच्या निर्णयाने बाधित झालेली कोणतीही व्यक्ती, उपविभागस्तरीय समितीच्या निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, जिल्हास्तरीय समितीकडे विनंती अर्ज दाखल करील.

(२) जिल्हास्तरीय समिती, विनंती अर्जावरील सुनावणीसाठी दिनांक निश्चित करील आणि त्याबाबत विनंती अर्जदारास व संबंधित उपविभागस्तरीय समितीस लेखी कळवील, तसेच सुनावणीसाठी निश्चित केलेल्या दिनांकाच्या किमान पंधरा दिवस अगोदर विनंती अर्जदाराच्या गावातील सोयीस्कर सार्वजनिक ठिकाणी याबाबतची नोटीस लावून कळवील.

(३) जिल्हास्तरीय समितीला एकतर, विनंती अर्जास मान्यता देता येईल किंवा तो फेटाळता येईल किंवा तो पुनर्निर्णयार्थ संबंधित उपविभागस्तरीय समितीकडे पाठविता येईल.

(४) असा संदर्भीत विनंती अर्ज मिळाल्यावर, उपविभागस्तरीय समिती विनंती अर्जदाराचे आणि ग्रामसेभेचे म्हणणे ऐकून घेईल आणि त्यावर निर्णय घेईल आणि त्याबाबत जिल्हास्तरीय समितीला कळवील.

(५) त्यानंतर जिल्हास्तरीय समिती, विनंती अर्ज विचारात घेईल आणि त्यावर विनंती अर्ज स्वीकारल्याचा व फेटाळल्याचा समुचित आदेश देईल.

(६) जिल्हास्तरीय समिती मागणीदाराच्या वा मागणीदारांच्या वनहक्कांचे अभिलेख जिल्हाधिकारी किंवा जिल्हा आयुक्त यांच्याकडे शासनाच्या अभिलेखामध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी पाठवील.

(७) दोन किंवा त्यापेक्षा अधिक उपविभागीयस्तरीय समित्यांच्या आदेशांमध्ये विसंगती असल्यास, जिल्हास्तरीय समिती, स्वत:च संबंधित उपविभागस्तरीय समित्यामधील विसंगतीचा मेळ घालण्याच्यादृष्टीने त्यांची संयुक्त सभा बोलवील आणि जर त्यातून कोणताही परस्पर संमत मार्ग काढता न आल्यास, जिल्हास्तरीय समिती, संबंधित उपविभागस्तरीय समित्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर विवाद अभिनिर्णित करील आणि समुचित आदेश देईल.

**१६. वनहक्क दावे धारकांना दावे मंजूरी नंतरचे सहाय्य आणि सहयोग.**

राज्य शासन वननिवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी यांच्या उन्नतीसाठी त्यांच्या विभागांमर्फत विशेषत: आदिवासी आणि समाज कल्याण, पर्यावरण आणि वन, महसूल, ग्रामविकास, पंचायती राज आणि इतर विभाग यांचेमार्फत या गोष्टींची सुनिश्चिती करेल की, शासनाच्या सर्व योजना जमीन सुधार, जमिनीची उत्पादन क्षमता, मूलभूत सुविधा आणि इतर उपजीविकेशी संबंधित उपाययोजनांसह या अशा दावेदारांना आणि ज्यांचे हक्क या कायद्यानुसार मान्य करण्यात आणि निहित करण्यात आले आहेत, अशा समूहांना पुरविण्यात येत आहेत.[२३]

**डॉ. बचित्तर सिंग, सह सचिव,**

(फा. क्र. १७०१४/०२/२००७-पीसी व व्ही (खंड - सात)

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) नियम - २००७.

**केंद्रीय जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार**

(फा. क्र. २३०११/३२/२०१०-खंड - दोन)

**डॉ. साधना राऊत, सह सचिव**

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) सुधारणा नियम, २०१२.

२३. समावेश नियम १६ मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

भारत सरकार

**जमाती कार्यमंत्रालय**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) नियम, २००८**

**जोडपत्र - (एक)**

**(पहा नियम ६ (झ))**

**नमुना - क**

**वनजमिनींच्या हक्कांसाठीच्या दाव्याचा नमुना**

(पहा **नियम ११ (१ ) (क))**

१. मागणीदाराचे नाव :

२. पतीचे / पत्नीचे नाव :

३. आईचे / वडिलांचे नाव :

४. पत्ता :

५. गाव :

६. ग्रामपंचायत :

७. तहसील / तालुका :

८. जिल्हा :

९. (क) अनुसूचित जमाती असल्याचे अधिकृत पुरावे. : होय / नाही.

(ख) पारंपरिक वननिवासी असल्याचे (जर पती / पत्नी अनुसूचित जमातीचे असल्यास (अधिकृत पुराव्याची प्रत जोडावी)) : होय / नाही.

१०. कुटुंबातील अन्य सदस्यांची नावे वयासह (अवलंबुन असणारी मुले व प्रौढ व्यक्ति यांच्यासह) :

**जमिनीवरील दाव्याचे स्वरूप :**

१. ताब्यात असलेल्या वन जमिनीची व्याप्ती :

(क) वसतिस्थान

(ख) स्वत: कसण्यासाठी काही असल्यास :
(पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (क))

२. विवादग्रस्त जमिनी, काही असल्यास, :
(पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (च))

३. पट्टा / भाडेपट्टा / अनुदान, काही असल्यास :
(पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (छ))

४. मूळस्वरूपात पुनर्वसनासाठी जमीन किंवा पर्यायी :
जमीन काही असल्यास, (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ड))

५. जमिनीच्या नुकसान भरपाईशिवाय जेथून विस्थापित :
झाले आहेत ती जमीन (पहा अधिनियमाचे कलम ४ (८))

६. वन गावातील जमिनींची व्याप्ती काही असल्यास :
(पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ज))

७. अन्य कोणतेही पारंपरिक हक्क, काही असल्यास :
(पहा अधिनियमाचे कलम ३(१) (झ))

८. पुष्ठ्यर्थ पुरावा (पहा नियम १३) :

९. कोणतीही अन्य माहिती :

**मागणीदाराची ( मागणीदारांची )**

स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा.

भारत सरकार

**जमाती कार्यमंत्रालय**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) नियम, २००८**

**नमुना - ख**

**सामूहिक हक्कासाठीच्या दाव्याचा नमुना**

**(पहा नियम ११ (१ ) (क) व (४))**

१. मागणीदाराचे / मागणीदारांचे नाव :
   (क) वननिवासी अनुसूचित जमातीचा समूह : होय / नाही
   (ख) इतर जमाती वननिवासींचा समूह : होय / नाही

२. गाव :

३. ग्रामपंचायत :

४. तहसील / तालुका :

५. जिल्हा :

**लाभ घेतलेल्या सामूहिक हक्कांचे स्वरूप**

१. निस्तार यासारखे समूहिक हक्क, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ख)) :

२. गौण वनोत्पादनावरील हक्क, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ग)) :

३. सामूहिक हक्क :
   (क) वापर किंवा हक्कदारी असलेले (मासे, जलनिकाय),काही असल्यास :
   (ख) चराई, काही असल्यास :
   (ग) भटके व फिरते आदिवासी यांच्याकरिता पारंपरिक साधनांची सुगमता, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३ ( १ ) (छ))

४. पीटीजी व कृषक - पूर्व समूहांसाठी वसतिस्थान व वस्ती यांची सामूहिक भूधारणा पध्दती, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (ङ)) :

५. जैविक विविधता, बौध्दिक संपत्ती व पारंपरिक ज्ञान यांच्या हक्कांची सुगमता, काही असल्यास, (*पहा* अधिनियमाचे कलम ३ (१) (ट)). :

६. अन्य पारंपरिक हक्क, काही असल्यास (पहा अधिनियमाचे कलम ३ (१) (झ)) :

७. पृष्ठ्यर्थ पुरावा (पहा नियम १३) :

८. कोणतीही अन्य माहिती

**मागणीदाराची / मागणीदारांची**

स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा.

**नमुना - ग** [२४]

**सामुदायिक वनसंसाधन हक्कासाठी दाव्याचा नमुना**

**(अधिनियम कलम ३ (१) (झ) आणि नियम ११ (१) आणि ४ (क) पहा)**

१. ग्राम / ग्रामसभा :

२. ग्रामपंचायत :

३. तहसील / तालुका :

४. जिल्हा :

५. ग्रामसभा सदस्यांची नावे (अनुसूचित जमाती / इतर पारंपरिक वननिवासी याबाबतची स्थिती प्रत्येक सदस्याच्या नावासमोर दर्शविणारे स्वतंत्र प्रपत्र सोबत जोडावे.) दावा दाखल करण्यासाठी अनुसूचित जमाती / इतर पारंपरिक वननिवासी यांची थोडी उपस्थितीही दावा दाखल करण्यासाठी पुरेशी आहे.

आम्ही, खाली स्वाक्षरी करणारे या ग्रामसभेचे रहिवासी असा ठराव करतो की, खाली नमूद आणि सोबतच्या नकाशात दर्शविलेले क्षेत्र हे आमच्या सामूहिक वनसंसाधनांचे आहे. ज्यावर आम्ही कलम ३ (१) (झ) नुसार आमच्या हक्कांना मान्यता देण्याचा दावा करीत आहोत.

(सामूहिक वनसंसाधनाचा नकाशा सोबत जोडण्यात यावा, ज्यामध्ये स्थान, गावाच्या पारंपरिक किंवा रूढीजन्य सीमांच्या आतील भूमि चिन्ह किंवा गुराखी समूहांच्या बाबतीत कुरणांचा हंगामी वापर जे सदर समूहास पारंपरिकरित्या उपलब्ध आहेत, आणि जे ते निरंतर वापरासाठी पारंपरिकरित्या संरक्षित, पुनर्जिवित, संवर्धित आणि व्यवस्थापित करीत आहेत. या सीमा सद्याच्या कायदेशीर सीमांशी मिळत्या-जुळत्या असणे आवश्यक नाही याची कृपया नोंद घ्यावी.)

६. खसरा / कम्पार्टमेंट संख्या (संख्यांना) असल्यास आणि माहिती असल्यास :

७. सीमांना लागून असलेली गावे :

(i)

(ii)

(iii)

(यामध्ये इतर काही गावांबरोबर संसाधन आणि जबाबदारी विभागण्यासंबंधीची माहिती समाविष्ट केली जाऊ शकते.)

८. पुष्टेत्तर देण्यासाठी पुराव्यांची यादी (कृपया नियम १३ पहा).

**दावेदार (दावेदारां) चा / चे स्वाक्षरी / अंगठा :**

२४. समावेश नियम ११ (४) मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

भारत सरकार

**जमाती कार्यमंत्रालय**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) नियम, २००८**

**जोडपत्र - (दोन)**

(पहा **नियम, ८ (ज))**

**ताब्यात असलेल्या वनजमिनीचा मालकी हक्क**

१. वनहक्कधारकांचे नाव / नावे (पती / पत्नीसह) :

२. आई / वडिलांचे नाव :

३. अवलंबून असणाऱ्यांची नावे :

४. पत्ता :

५. गाव / ग्रामसभा :

६. ग्रामपंचायत :

७. तहसील / तालुका :

८. जिल्हा :

९. अनुसूचित जमाती आहे की / इतर पारंपरिक वननिवासी आहे :

१०. क्षेत्र :

११. खासरा / खंड क्र. यांच्यासह ठळक सीमाचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन :

हे हक्क वंशपरंपरागत आहेत परंतु अधिनियमाच्या कलम ४च्या पोट-कलम (४) अन्वये अन्यसंक्राम्य किंवा हस्तांतरणीय नाहीत. :

आम्ही खालील सही करणार, याद्वारे महाराष्ट्र शासन यांच्यासाठी व त्यांच्यावतीने, वरील वनहक्क कायम करण्यासाठी, सही करीत आहोत.

**विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक** **जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी**

**जिल्हाधिकारी / उपायुक्त**

भारत सरकार

**जमाती कार्यमंत्रालय**

**अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्य करणे) नियम, २००८**

**जोडपत्र - (तीन)**

(पहा **नियम ८ (ज))**

१. सामूहिक वनहक्कधारकाचे नाव / धारकांची नावे :

२. गाव / ग्रामसभा :

३. ग्रामपंचायत :

४. तहसील / तालुका :

५. जिल्हा :

६. अनुसूचित जमाती आहे की / इतर पारंपरिक वननिवासी आहे. :

७. सामूहिक हक्कांचे स्वरूप :

८. शर्ती काही असल्यास :

९. रूढीप्राप्त सीमांसह / किंवा खासरा / खंड क्रमांक यासह ठळक सीमाचिन्हे दर्शवून केलेले सीमांचे वर्णन :

**सामूहिक वनहक्कधारकांचे नाव / (धारकांची नावे)**

१.

२.

३.

आम्ही खालील सही करणारे, महाराष्ट्र शासन यांच्यासह व त्यांच्यावतीने, सामूहिक वनहक्कांच्या उपरोल्लिखित धारकांना शीर्षकात उल्लेखिल्याप्रमाणे वनहक्क कायम करण्यासाठी आमच्या स्वाक्षऱ्या करीत आहोत.

**विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक,** **जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी,**

**जिल्हाधिकारी / उपायुक्त**

## जोडपत्र - चार [२५]

## सामुदायिक वनसंसाधनांचे हक्कपत्र

**(नियम ८ (झ) पहा)**

१. ग्राम / ग्रामसभा :

२. ग्रामपंचायत :

३. तहसील / तालुका :

४. जिल्हा :

५. अनुसूचित जमाती / इतर पारंपरिक वननिवासी अनुसूचित जमाती समूह व इतर पारंपरिक वननिवासी समूह / दोन्ही. :

६. प्रमुख भूमि चिन्हाने आणि खसरा / कम्पार्टमेंट क्रमांकासह पारंपरिक सीमांसह सीमांचे वर्णन. :

सदर क्षेत्रात या समूहांना अधिनियमाच्या कलम ३ उपकलम (१) खंड (झ) नुसार निरंतर वापरासाठी या (नाव नमूद करावे) सामूहिक वनसंसाधनाचे ज्याचे ते पारंपरिकरित्या संवर्धन आणि संरक्षण करित आहे संरक्षण, पुनर्जिवन, परिरक्षण आणि व्यवस्थापन करण्याचा हक्क असेल. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम व त्या अंतर्गत तयार केलेले नियम यामधील अटीव्यतिरिक्त इतर अटी या हक्कांवर लादता येणार नाहीत.

आम्ही स्वाक्षरी करणारे, शासनासाठी आणि शासनाच्यावतीने उपरोक्त नमूद ग्रामसभा / समूह (समूहांना) देण्यात येणाऱ्या हक्कपत्रामध्ये नमूद सामूहिक वनसंसाधनांचे हक्क (नाव नमूद केल्याप्रमाणे आणि नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत, परिमाणापर्यंत, क्षेत्रापर्यंत यापैकी जे लागू असेल ते) देणे सुनिश्चित करित आहोत.

**( विभागीय वन अधिकारी / उपवनसंरक्षक )** **( जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी )**

**जिल्हाधिकारी / उपायुक्त**

२५. समावेश नियम १० (ग) मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

**१. जोडपत्र - पाच [२६]**

**त्रैमासिक अहवाल सादर करण्याचे प्रारूप**

**(नियम १० (ग) पहा)**

| | | |
|---|---|---|
| १. | राज्याचे नाव | |
| २. | दाव्यांची स्थिती | |
| | (क) वैयक्तिक हक्क | |
| | ● दाखल झालेले | |
| | ● स्वीकारलेले | |
| | ● अमान्य केलेले | |
| | ● प्रलंबित | |
| | ● अमान्य झाल्याची कारणे, उदाहरणासह | |
| | ● सूचविलेले सुधारात्मक उपाय | |
| | ● इतर निरीक्षणे | |
| | ● वनक्षेत्राची व्याप्ती (हेक्टरमध्ये) | |
| | ● अधिनियमाचे कलम ३ (१) (क) अन्वये वन आणि महसूल<br>● अभिलेखात अद्ययावत नोंदी करण्याची स्थिती (हेक्टरमध्ये) | |
| | (ख) सामुहिक वनहक्क | |
| | ● दाखल झालेले | |
| | ● स्वीकारलेले | |
| | ● अमान्य केलेले | |
| | ● प्रलंबित | |
| | ● वनक्षेत्राची व्याप्ती (हेक्टरमध्ये) | |
| | ● अधिनियमाचे कलम ३ (१) (ख) ते ३ (१) (ठ) अन्वये वन आणि<br>● महसूल अभिलेखात अद्ययावत नोंदी करण्याची स्थिती (हेक्टरमध्ये) | |
| | ● अमान्य झाल्याची कारणे उदाहरणासह | |
| | ● सुचविलेले सुधारात्मक उपाय | |
| | ● इतर निरीक्षणे | |
| | (ग) व्यवस्थापित केल्या जाणाऱ्या सामूहिक वनसंसाधनांचा तपशिल आणि कोणाद्वारे | |
| | (घ) चांगल्या उल्लेखनीय बाबी (काही असतील तर) | |
| | (ङ) अधिनियम कलम ३ (२) नुसार खुले केलेले वनक्षेत्र | |
| | (च) इतर काही शेरे | |

**अध्यक्ष**
**राज्यस्तरीय संनियंत्रण समिती.**

**सदस्य सचिव,**
**राज्यस्तरीय संनियंत्रण समिती.**

२६. समावेश नियम १० (ग) मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ (अधिसूचना क्र. जी. एस. आर. क्र. ६६९ (ई), दिनांक ६ सप्टेंबर २०१२), नुसार सुधारित नियम केले.

आर/२३३-११-२०२३

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे

२०१२०१२०८३१४८१४२००१

**अनूसुचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ नुसार पात्र दावेदारांची सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी नोंद घेताना अनुसरावयाची कार्यपध्दती.........**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. एस-१०/२०११/प्र.क्र.१७५/फ-३**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक : २ जानेवारी, २०१२.**

**परिपत्रक :-**

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या अंतर्गत सन २००८ च्या नियमावलीनुसार उपरोक्त अधिनियमान्वये प्राप्त दाव्यांतील हक्क निर्धारणाची प्रक्रिया सुरु आहे. प्राप्त दाव्याच्या अनुषंगाने दाव्यांचे संस्करण किंवा निराकरणाबाबत जिल्हास्तरीय समितीने अंतिम आदेश पारित केल्यानंतर नियम १५ (६) नुसार हक्कांची नोंद घेण्यासंदर्भात पुढील तरतूद आहे.

The District Level Committee shall send the record of forest rights of the claimant or claimants to the District Collector or District Commissioner for necessary correction in the records of the Government.

२. वनहक्क पात्र प्रकरणात महसूल अभिलेख्यामध्ये नोंद घेतांना विविध जिल्हयांमध्ये वेगवेगळ्या पध्दती अवलंबण्यात येत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. या नोंदीबाबत संपूर्ण राज्यामध्ये एकसुत्रता असणे गरजेचे आहे. पात्र वन हक्काच्या नोंदी महसूल अभिलेख्यात कशा रितीने घ्याव्यात याबाबत मार्गदर्शन देण्यासाठी केंद्र शासनास विनंती केली असता केंद्र शासनाच्या आदिवासी विषयक मंत्रालयाने त्यांच्या कडील पत्र क्रमांक F-17014/02/2007-PC&V(Vol.VII) (pt), dated 4th November, 2011 अन्वये खालीलप्रमाणे स्पष्टीकरण केले आहे.

Scheduled Tribes and Other Traditional Forest Dwellers (Recognition of Forest Rights) Act, 2006 only seeks to recognize and vest the forest rights and occupation in forest land in forest dwelling Scheduled Tribes and other traditional forest dwellers who have been residing in such forests for generations but whose rights could not be recorded. The Act does not confer ownership rights on forest land to the forest dwellers after recognition and vesting of their forest rights.

३. केंद्र शासनाच्या उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने हक्क प्राप्त दाव्यांच्या नोंदी ७/१२ अभिलेख्यातील इतर हक्क या रकान्यात करण्यात यावेत. तसेच याच रकान्यात अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियमाच्या कलम ४ (१) नुसार प्रदान करण्यात आलेला हक्क वारसागामी असेल मात्र अन्य संक्राम्य किंवा हस्तांतरणीय नाही असेही स्पष्टपणे नमूद करावे. विवाहीत व्यक्तीच्या बाबतीत नवरा बायको या दोघांच्याही नावाने संयुक्तपणे नोंद घ्यावी आणि

एकाच व्यक्तीचे प्रमुख असलेल्या कुटूंबाच्या बाबतीत एकाच प्रमुखाच्या नावे नोंद करण्यात यावी व थेट वारस नसेल तर वारसा हक्क निकटतम नातेवाईकास देण्यात यावा. तसेच इतर हक्कात अशी नोंद घ्यावी की, बँक कर्ज घेता येईल व कर्जाची नोंद इतर हक्कात घेता येईल.

४. ७/१२ अभिलेख्यात कब्जेदार सदरी महाराष्ट्र शासन (वने) अशी नोंद करावी.

५. वन हक्क मान्य दाव्यांच्या नोंदी हया महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ मधील तरतूदींनुसार घेण्यात याव्यात.

६. सदर परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार वन हक्क मान्य झालेल्या दाव्यांच्या नोंदी सदर जमीनींच्या ७/१२ सदरी घेण्यात याव्यात.

७. सदरचे शासन परिपत्रक महसूल विभाग व आदिवासी विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

( रत्नाकर गायकवाड )
मुख्य सचिव
महाराष्ट्र राज्य

प्रति,

१. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व विभागीय आयुक्त, (६ प्रती)
३. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक.
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर, पश्चिम बोरीवली व नाशिक
७. सर्व जिल्हाधिकारी (३५ प्रती)
८. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व
९. सर्व उपसंचालक, भूमी अभिलेख (१० प्रती)
१०. सर्व जिल्हा निरिक्षक, भूमी अभिलेख (३० प्रती)
११. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
१२. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे स्वीय सहायक.
१३. प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
१७. निवडनस्ती ~~फ-~~३ कार्यासन.

M-2470-134
D: Govt. Resolution.lwp

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८, सुधारित नियम २०१२ अंतर्गतच्या अभिलेखामध्ये घ्यावयाच्या अहस्तांतरणीय नोंदीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः वहका-२०१५/प्र.क्र.५२/ज-१अ**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: - **०१ जून, २०१५**

**वाचा :-**

१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६
२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) नियम २००८
३) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) सुधारित नियम २०१२
४) आदिवासी विकास विभागाचे कार्यालयीन आदेश क्र.वहका-२०१०/प्र.क्र.१६४/का.१४,दि.२२ आक्टोबर,२०१०.
५) जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे क्र. २३०११/०६/२०१४ FRA दि.३.३.२०१४.

**प्रस्तावना :-**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ दिनांक ३१/१२/२००७ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आला असून त्याखाली तयार करण्यात आलेले, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) नियम, २००८ हे दिनांक १/१/२००८ पासून अंमलात आलेले आहेत.

महाराष्ट्र शासनाकडून आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची आदिवासी विकास विभागाचे संदर्भाधीन क्र.४ येथे नमूद कार्यालयीन आदेश दि. २२/१०/२०१० अन्वये या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी "नोडल अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर कायद्याची योग्यरितीने अंमलबजावणी होण्याकरीता गांव पातळीवर ग्रामसभा व हक्क समित्या, उपविभागीय स्तरावर उपविभागीय समित्या, जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यस्तरावर अंमलबजावणीच्या आढाव्यासाठी राज्यस्तरीय संनियंत्रण समिती स्थापन करण्यांत आलेली आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि त्या खालील नियम, २००८ व सुधारीत नियम, २०१२ नुसार पात्र अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोघांचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर कायद्यांतर्गत अंतिमरीत्या दावा मंजूर झालेल्या वैयक्तिक अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी लाभार्थी यांच्या वनहक्क धारणाधिकाराशी संबंधित जमिनीची मोजणी करुन, त्यासंबंधित अभिलेखात उचित नोंदी घेतल्या जातात.

जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी त्याचे पत्र क्र. २३०११/०६/२०१४-FRA दि.३.३.२०१४ अन्वये मंजूर वैयक्तिक वन हक्क दाव्यांची नोंद संबंधित अभिलेखात करतांना त्यात जातीची नोंद

घेण्याबाबत व सामूहिक जमिनीची वर्गवारी निहाय गाव नकाश्याची नोंद घेण्याच्या सूचना देण्यांत आल्या आहेत. त्यास अनुसरुन क्षेत्रीय महसुली प्राधिकारी व सक्षम प्राधिकारी यांना अधिक स्पष्टीकरणात्मक सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वन हक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ नियम, २००८ व सुधारित नियम, २०१२ नुसार पात्र "अनुसूचित जमाती" व "इतर पारंपारिक वन निवासी" यांना उक्त अधिनियमाच्या, कलम ३ (१) नुसार वैयक्तिक वनहक्क धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. महाराष्ट्र जमिन महसूल संहिता,१९६६ च्या तरतूदीनुसार, अशा लाभार्थ्यांच्या अधिकारांविषयी संबंधित अभिलेख यामध्ये नोंदी घेण्याबाबत क्षेत्रीय महसुली प्राधिकारी व सक्षम प्राधिकारी यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. उक्त कायद्यान्वये वैयक्तिक वनहक्क धारणाधिकार अंतिमत: मंजूर करण्यात आलेल्या अनुसूचित जमाती या प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या धारणाधिकारांविषयी संबंधित अभिलेख (उदा. गाव नमुना नं ७/१२ किंवा यथास्थिती वन विभागाचा संबंधीत अभिलेख) यामध्ये " महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ अन्वये अहस्तांतरणीय" अशी तसेच "वन हक्क कायद्याखालील पात्र लाभार्थी" अशी नोंद घेण्यांत यावी.

२. उक्त कायद्यान्वये वैयक्तिक वनहक्क धारणाधिकार अंतिमत: मंजूर करण्यात आलेल्या इतर पारंपारिक वन निवासी या लाभार्थ्यांच्या धारणाधिकारांविषयी संबंधित अभिलेख (उदा. गाव नमुना नं ७/१२ किंवा यथास्थिती वन विभागाचा संबंधीत अभिलेख) यामध्ये "वन हक्क कायदा पात्र लाभार्थी", अशी नोंद घेण्यांत यावी.

०२. सदर शासन परिपत्रक आदिवासी विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६०११७५३१६८६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Manukumar Srivastava

Digitally signed by Manukumar Srivastava
DN: c=IN, o=ALL INDIA SERVICE, ou=IAS, postalCode=110001, st=NEW DELHI, cn=Manukumar Srivastava
Date: 2015.06.09 19:02:22 +05'30'

**मनु कुमार श्रीवास्तव**
**प्रधान सचिव (महसूल)**

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.

४. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
७. मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
८. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
१४. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१८. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१९. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी.
२०. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर,अमरावती,
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक.
२२. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
२४. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२२. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
२३. महासंचालक माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२४. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्या.अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. निवड नस्ती (कार्यासन ज-१अ) महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ सुधारणा नियम २०१२ नुसार पात्र दावेदारांची सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी नोंद घेण्यासाठी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, नियमपुस्तिका खंड ४ मध्ये गाव नमुना ७-ई व नमूना १२-ई चा नव्याने समावेश करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः -जमीन-२०२६/प्र.क्र.८५/जमीन-०१अ**
१ ला मजला, मंत्रालय, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १० जुलै, २०२६

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र.एस-१०/२०११/प्र.क्र.१७५/फ-३, दिनांक ०२.०१.२०१२
२) महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्रमांक एस-१०/२०१६/प्र.क्र.४१७/फ-३, दिनांक ०२.११.२०१६
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.०८/ज-१, दिनांक २४.०३.२०२३
४) महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक संकिर्ण-२०२३/प्र.क्र.०८/ज-१, दिनांक १६.०५.२०२३
५) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक वहका-२०२३/प्र.क्र.२१८/का-१४, दिनांक १३.०३.२०२४
६) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एस-१०/२०२६/प्र.क्र.१७०/वने-०३(फ-३), दिनांक २३.०४.२०२६

प्रस्तावना

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८, सुधारणा नियम २०१२ ची अंमलबजावणी ही आदिवासी विभागाकडून करण्यात येते. सदर अधिनियमांतर्गत पात्र दावेदार यांच्या नावाची नोंद सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी घेतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत वन विभागाकडून संदर्भाधीन क्र. १) अन्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत वनहक्क प्राप्त दाव्यांच्या नोंदी गाव नमुना नं ७ अधिकार अभिलेखातील 'इतर हक्क' या स्तंभाखाली करण्यात येतात. तसेच याच स्तंभात 'अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६, चे कलम ४ (१) अन्वये प्रदान करण्यात आलेला हक्क वारसागामी असेल मात्र संक्राम्य किंवा हस्तांतरणीय नाही' असेही स्पष्टपणे नमूद करण्यात येते.

तथापि, वनहक्क प्राप्त दाव्यांच्या नोंदी म्हणजेच वनहक्क धारकांच्या नोंदी गाव नमुना नं ७ अधिकार अभिलेखातील 'इतर हक्क' या स्तंभाखाली करण्यात येत असल्याने आणि त्याच्या पिकांची नोंद करण्यासाठी सुविधा उपलब्ध नसल्यामुळे सदर खातेदारांना ॲग्रीस्टॅक (Agri stack) योजने अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक प्राप्त करणे, (Farmer ID), कृषी विभागाच्या इतर शासकीय योजनांचा लाभ न मिळणे, पीक कर्ज न मिळणे इत्यादी अडचणीसंह शासनाच्या विविध योजनांचा लाभ न मिळणे इ. अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. त्यानुषंगाने शासनाकडून संदर्भाधीन क्र.२) व ५) अन्वये निर्देश देण्यात आले आहेत. तसेच वनहक्क प्राप्त दावेदारांच्या नोंदी ७/१२ अभिलेखात घेण्यासाठी मा. मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन क्र. ३) येथील शासन निर्णयान्वये “अभ्यास समिती” नियुक्त करण्यात आली आहे. सदर समितीच्या बैठकीमध्ये वेळोवेळी निर्देश देण्यात आले होते.

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९.१२.२०२५ रोजी पार पडलेल्या सुकाणु समितीच्या बैठकीतील सुचनेनुसार मध्यप्रदेश, ओडिशा राज्याच्या अधिकार अभिलेखाच्या नोंदीचा जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.रा.), पुणे यांच्या कार्यालयाकडून अभ्यास करण्यात आला. वनहक्क प्राप्त दाव्यांच्या नोंदी म्हणजेच वनहक्क धारकांच्या व सदरील क्षेत्रावरील पिकांच्या नोंदी करण्यासाठी नव्याने स्वतंत्ररित्या दुय्यम अधिकार अभिलेख तयार करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मध्ये नवीन नियम ३.१ समाविष्ठ करून वनहक्क धारकांसाठी स्वतंत्रपणे नव्याने गाव नमुना नं ७-ई (७-E) आणि त्यासोबत पिकांचा नोंदवही गाव नमुना नं १२ई (१२ E) या नमून्यांना मान्यता देण्याची व त्यानुषंगाने नोंदी घेण्याकरीता क्षेत्रीय यंत्रणांना सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मध्ये नवीन नियम ३.१ समाविष्ठ करून वनहक्क धारकांसाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब नुसार स्वतंत्रपणे नव्याने गाव नमुना नं ७-ई (७-E) आणि त्यासोबत पिकांचा नोंदवही गाव नमुना नं १२ई (१२ E) या नमून्यांना शासन मान्यता देण्यात येत आहे.

०२. वन क्षेत्राच्या महसूली अभिलेख ७/१२ मधील भोगवटादार/कब्जेदार संदर्भाधीन क्रमांक ६ येथील दिनांक २३.०४.२०२६ रोजीच्या शासन परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांनुसार नोंदी घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.

०३. ज्या प्रकरणांमध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ४(१) अन्वये वन निवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांच्या वन हक्कांना मान्यता देण्यात येवून त्याबाबतच्या नोंदी गाव नमूना ७/१२ अभिलेखात घेण्यात आल्या आहेत, अशा प्रकरणी

दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंत गाव नमुना क्र.७-ई तसेच पिकांच्या नोंदीसाठी गाव नमुना क्र.१२-ई तयार करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

०४. ज्या वनक्षेत्राचे अद्याप ७/१२ अभिलेख उपलब्ध नाहीत, अशा क्षेत्राचा वन विभाग व महसूल विभागाने दिनांक ३१ डिसेंबर, २०२६ अखेर संयुक्त सर्वे करून सदर वन जमिनीचे ७/१२ अभिलेख तयार करण्याची कार्यवाही करावी.

०५. ज्या जमिनींचे ७/१२ उपलब्ध नाही, अशा वनपट्टाधारकांच्या बाबतीत वन विभागाकडून वनपट्ट्यावर कंपार्टमेंट क्रमांक नमूद करण्यात आलेले आहेत. अशा प्रकरणांमध्ये संबंधित कंपार्टमेंटच्या जमाबंदीचा प्रस्ताव वन विभागाने भूमी अभिलेख विभागास सादर करावा. सदर प्रस्तावाच्या आधारे, भूमी अभिलेख विभागाकडून जमाबंदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी. त्यानंतर महसूल विभागामार्फत विहित प्रक्रियेनुसार गाव नमुना क्र. ७-ई (७-E) तसेच पिकांच्या नोंदीसाठी गाव नमुना क्र.१२-ई (१२-E) तयार करण्यात यावेत.

०६. अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ४(१) अन्वये वन निवासी अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी यांच्या वन हक्कांना मान्यता देऊन ते निहित केल्यानंतर, त्याची नोंद अधिकार अभिलेखात स्वतंत्ररित्या गाव नमुना क्र.७-ई मध्ये करण्यात यावी. तसेच, पिकांची नोंद गाव नमुना क्र.१२-ई मध्ये करण्यात यावी. अशा नोंदी करतांना जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडील उपलब्ध मूळ दस्ताऐवज/अभिलेख यामधील नोंदीचा आधार घेण्यात यावा.

०७. उक्त गाव नमुना ७-ई मध्ये वनहक्क धारकांची नावे दाखल करून "इतर अधिकार" या स्तंभात पुढीलप्रमाणे शेरा नमूद करण्यात यावा:-

> ***"अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ कलम ४(१) अन्वये प्रदान करण्यात आलेला हक्क वारसागामी असेल मात्र अन्य संक्राम्य किंवा हस्तांतरणीय नाही."***

०८. गाव नमुना क्र. १२-ई (वनहक्क धारकांसाठी पिक नोंदवही) तपशील यामध्ये गाव नमुना क्र. १२-ई मध्ये वनहक्क धारकांच्या पिकांची नोंद विधिवत करण्यात आल्यानंतर, अशा नोंदीस अधिकृत पिक नोंद म्हणून ग्राह्य धरण्यात यावे. व संबंधित वनहक्क धारकांना इतर शेतकऱ्यांप्रमाणेच कृषी विभागाच्या अनुदान योजना, पीक विमा योजना, कर्ज सवलती / पीक कर्ज, नैसर्गिक आपत्ती भरपाई, Farmer ID आधारित योजनासंह सर्व कृषी व इतर शासकीय योजनांचा लाभ देण्याची जबाबदारी ही संबंधित प्रशासकीय विभागाची राहिल.

०९. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब मध्ये मान्यता देण्यात आलेले गाव नमुना नं हा ७-ई (७-E) आणि पिकांचा नोंदवही गाव नमुना नं १२ई (१२ E) हे दोन्ही दुय्यम अधिकार अभिलेख असल्याने यामधील नोंदीमुळे संबंधितांचा कोणताही मालकी हक्क निर्माण होणार नाही.

१०. ज्या प्रयोजनासाठी वनहक्क दावा मान्य करून वनपटट्याचे वापट करण्यात आले आहे, त्याच प्रयोजनासाठी वनहक्क दाव्यांतर्गत जमिनीचा वापर करण्यात यावा.

११. महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ मध्ये वनहक्क धारकांसाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ व परिशिष्ट-ब नुसार स्वतंत्रपणे नव्याने गाव नमुना नं हा ७-ई (७-E) आणि त्यासोबत पिकांचा नोंदवही गाव नमुना नं १२ई (१२ E) या नमून्यांचा समावेश करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून यथावकाश करण्यात येईल.

१२. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभाग तसेच वन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१०१२५८०७१९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department,
2.5.4.20=637145FD393D6D5C713E94E6DA7BC6BEE23011448B7FC64D13863 0B9C76AE7A2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975 955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2026.07.10 12:59:18 +05'30'

**(संजय धारुरकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम)) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्री.व यु.कल्याण, अ.वि. आणि औकाफ विभाग), यांचे सचिव
४. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

१०. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. मा. मंत्री (आदिवासी), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. मा. मंत्री (कृषी), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१३. सर्व मा. मंत्री व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१४. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद सदस्य
१६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. सर्व सहसचिव/उपसचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२०. सर्व विभागीय आयुक्त
२१. आयुक्त, कृषी महाराष्ट्र राज्य, पुणे
२२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
२३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे
२४. सर्व मुख्य वन संरक्षक
२५. सर्व जिल्हाधिकारी
२६. सर्व उप वनसंरक्षक
२७. निवडनस्ती (जमीन-०१अ)

## महसूल विभाग, शासन निर्णय क्रमांक-जमीन-२०२६/प्र.क्र.८५/जमीन-०१अ, दिनांक १० जुलै, २०२६ सोबतचे परिशिष्ट-अ

<table>
<tr><td colspan="7">महाराष्ट्र शासन<br>गाव नमूना सात-ई<br>( वनहक्क धारकांचे अधिकार अभिलेख पत्रक )<br>महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम १९७१ यातील नियम ३.१ अन्वये<br>गाव----------(LGD Code) तालुका--------- जिल्हा---------------<br>भूमापन क्रमांक व उपविभाग----------<br>भूधारणा पध्दत:- ( महाराष्ट्र शासन वन विभाग )</td></tr>
<tr><td colspan="2">क्षेत्र, एकक व आकारणी हे.आर.</td><td>वनहक्क खाते क्रमांक</td><td>वनहक्क धारकाचे नाव</td><td>वैयक्तीक वनहक्क दावा वाटपाचे प्रयोजन</td><td>क्षेत्र</td><td>फेरफार क्रमांक----</td></tr>
<tr><td colspan="2"></td><td></td><td></td><td></td><td></td><td>इतर अधिकार<br>“अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ कलम ४(१) अन्वये प्रदान करण्यात आलेला हक्क वारसागामी असेल मात्र अन्य संक्राम्य किंवा हस्तांतरणीय नाही”<br><br>बोजा-<br><br>प्रलंबित फेरफार क्र.<br><br>शेवटचा फेरफार क्रमांक.<br><br>दिनांक------</td></tr>
<tr><td colspan="2"></td><td></td><td></td><td></td><td></td><td>सीमा आणि भूमापन चिन्हे</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण क्षेत्र</td><td colspan="5"></td></tr>
<tr><td></td><td colspan="6">जुने फेरफार क्रमांक -------</td></tr>
</table>

महसूल विभाग, शासन निर्णय क्रमांक -जमीन-२०२६/प्र.क्र.८५/जमीन-०१अ, दिनांक १० जुलै, २०२६
सोबतचे - परिशिष्ट-ब

गाव नमूना बारा-ई (पिकांची नोंदवही)

महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम १९७१ यातील नियम २९

गाव----------(LGD Code) तालुका--------- जिल्हा---------------

| गट क्रमांक व उपविभाग | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | हंगाम | वनपट्टे यांचा खाते क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल संचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरुप | क्षेत्र | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

अनुसूचित जमाती तथा इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अनुसार संबंधितांना वन हक्कांचे टायटल्स प्रदान करण्याबाबत घ्यावयाची काळजी.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- एस-१०/२०१२/प्र.क्र.२६८/फ-३.
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- १७ जानेवारी, २०१३

## परिपत्रक

अनुसूचित जमाती तथा इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अनुसार अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपरिक वन निवासी या वर्गवारीत मोडत असलेल्या व्यक्तींकडून प्राप्त होणाऱ्या दाव्यांपैकी पात्र प्रकरणी वन हक्कांचे टायटल्स प्रदान करणे अपेक्षित आहे. उक्त दोन्ही प्रकारच्या दावेदारांची पात्रता ठरविण्याकरिता या अधिनियमांमध्ये निकष ठरविण्यात आलेले आहेत.

२. उक्त अधिनियमाची महाराष्ट्र राज्यात अंमलबजावणी करताना ज्या अनुसूचित जमाती महाराष्ट्र राज्यातील अधिसूचित आहेत, फक्त त्याच जमातींचे दावेदार वन हक्कांच्या टायटल्ससाठी पात्र ठरतात. तथापि, दिनांक १५ डिसेंबर, २०१२ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गडचिरोली येथे झालेल्या बैठकीत असे निदर्शनास आले की, काही ठिकाणी ज्या दावेदारांना वन हक्कांचे टायटल्स प्रदान करण्यात आलेले आहेत, त्या व्यक्ती महाराष्ट्रातील अधिसूचित अनुसूचित जमातींपैकी नाहीत किंवा उक्त अधिनियमानुसार परिभाषित इतर पारंपरिक वन निवासी या श्रेणीत बसत नाहीत. त्यामुळे अशा व्यक्तींना वन हक्कांचे टायटल्स प्रदान करणे उक्त अधिनियम आणि वन (संवर्धन) अधिनियम, १९८० या दोन्ही कायद्यांमधील तरतुदींचा भंग करणारे असून, असे टायटल्स प्रदान करण्यास सहाय्यभूत प्राधिकारी उक्त दोन्ही कायद्यांप्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र ठरतात.

३. उक्त पार्श्वभूमीवर अनुसूचित जमाती तथा इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व प्राधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत :-

१) महाराष्ट्रातील अधिसूचित अनुसूचित जमातींव्यतिरिक्त इतर जमातींच्या व्यक्तींना वन हक्कांचे टायटल्स प्रदान केले जाणार नाहीत याची सर्वांनी कटाक्षाने दक्षता घ्यावी.

२) महाराष्ट्रातील अधिसूचित अनुसूचित जमातींव्यतिरिक्त इतर जमातींच्या व्यक्तींना टायटल्स प्रदान केलेल्या प्रकरणांच्या सर्व संबंधित जिल्हास्तरीय समित्यांनी आढावा घेऊन उक्त कायद्याच्या विपरीत कुठलाही वनहक्क कायम करु नये.

३) इतर पारंपरिक वन निवासी व्यक्तींच्या संदर्भात देखील उक्त अधिनियमाखाली विनिर्दिष्ट केलेल्या निकषांच्या अधीन राहूनच निर्णय घेतले जातील, याची सर्वांनी दक्षता घ्यावी.

सदरचे परिपत्रक आदिवासी विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(प्रवीण परदेशी)
प्रधान सचिव (वने)

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रायल, मुंबई.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य नागपूर.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) सर्व.

विभागीय आयुक्त (सर्व).

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), सर्व.

मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर.

मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा व्याघ्र प्रकल्प, नागपूर.

मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, मेळघाट.

मुख्य वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई.

आयुक्त, आदिवासी विकास विभाग, आदिवासी विकास भवन, गडकरी चौक, नाशिक.

जिल्हाधिकारी (सर्व).

उपवनसंरक्षक (प्रा.) सर्व.

उप वनसंरक्षक (वन्यजीव) सर्व.

मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) सर्व.
निवडनस्ती फ-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

------

अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन कायद्याची मान्यता) अधिनियम-२००६ व नियम-२००८ सुधारणा नियम २०१२ च्या नगर परिषदा/नगर पालिका व महानगर पालिका क्षेत्रात अंमलबजावणी बाबत..

**महाराष्ट्र शासन,**
**आदिवासी विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र.वहका-२०१५/प्र.क्र.६१/का-१४**
**मंत्रालय, मुंबई**
**दिनांक: ०८ सप्टेंबर, २०१५.**

**वाचा** - १. अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम २०१२.
२. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे पत्र क्र. TRTI /FRA /Municipal area / ४६० dt. ०१/१२/२००९.
३. जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली पत्र No.१७०१४/०२/२००७-PC & V (VOI. VII) (PT) dt. ०४ March २०१०.
४. जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील पत्र. No. १९०२०/०२/२०१२-FRA, dt.१२/४/२०१३ & dt.२९/०४/२०१३.
५. जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील पत्र.No.१९०२०/०२/२०१२-FRA (VOI. VII) dt.५/३/२०१५.

**प्रस्तावना:-**

वनहक्क कायद्याची ठळक वैशिष्टे

१) अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ दिनांक ३१/१२/२००७ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आला असून त्याखाली तयार केलेले नियम २००८ हे दिनांक १/१/२००८ पासून अंमलात आलेले आहेत.

२) सदर कायद्याची योग्यरितीने अंमलबजावणी होण्याकरीता गांव पातळीवर १५००२ ग्रामसभा वनहक्क समित्या, उपविभागीय स्तरावर ९४ उपविभागीय समित्या, जिल्हास्तरावर २८ जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. तसेच राज्यस्तरावर आढाव्यासाठी राज्यस्तरीय संनियत्रण समिती स्थापन करण्यांत आलेली आहे.

३) वनहक्क कायद्यातील कलम ३ (१) नुसार वैयक्तिक वनहक्कांतर्गत दावेदारास कमाल ४ हेक्टर जमीन धारण करण्याचा अधिकार आहे तर सामूहिक वनहक्कांतर्गत निस्तार हक्क, गौणवनोपजाचे अधिकार, पाणवठयातील मत्स्य व्यवसाय, चराई इ. हक्क प्राप्त झालेले आहेत.

४) कलम ३ (२) नुसार सार्वजनिक प्रयोजनास्तव १३ वेगवेगळ्या सुविधांसाठी वनजमीन मिळण्याचा हक्क आहे.

५) वनहक्क कायद्यांतर्गत कलम ४ (३) नुसार अनुसूचित जमाती धारकांची दिनांक १३ डिसेंबर, २००५ पूर्वी वैध दावेदारी व इतर वननिवासी यांच्या बाबतीत १३ डिसेंबर, २००५ पूर्वी किमान तीन पिढ्यांपासून (७५ वर्षे) त्यांचे वास्तव्य व उपजिविका असणे गरजेचे आहे.

६) नियम १३ मध्ये नमूद केलेल्यापैकी २ पुरावे दाव्यापुष्ठर्थ सादर करणे आवश्यक आहे.

७) वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीकरिता नोडल ऑफिसर म्हणुन आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

नोडल अधिकारी

८) सदर कायद्याच्या अंमलबजावणीसाठी ग्रामीण भागात वनहक्कांचे स्वरुप व व्याप्ती ठरविण्याची प्रक्रिया सुरु करण्यासाठी ग्रामसभा हे प्राधिकरण आहे. ग्रामसभा दावे प्राप्त करुन, त्याची पडताळणी करुन, मागणीचे क्षेत्र निश्चित करणारा नकाशा तयार करुन ठराव संमत करुन सदर दावा उपविभाग स्तरीय समितीकडे पाठविण्यात येतो.

वनहक्क निहीत करण्याची कार्य पध्दती व प्राधिकरणे

९) ग्रामसभेने संमत केलेले निर्णय उपविभाग स्तरीय समितीकडून तपासून वनहक्काचे अभिलेख तयार करुन तो अंतिम निर्णयासाठी जिल्हा स्तरीय समितीकडे पाठविण्यात येतो.

१०) उपविभाग स्तरीय समितीने तयार केलेल्या वनहक्कांच्या अभिलेखावर विचार करुन जिल्हा स्तरीय समितीकडून अंतिम मान्यता देण्यात येते. वनहक्कांच्या अभिलेखा वरील जिल्हा स्तरीय समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक असतो.

११) वनहक्क मान्यता देण्याच्या व ते विहित करण्याच्या प्रक्रियेचे संनियंत्रण करण्याकरिता एक राज्यस्तरीय सनियंत्रण समिती कार्यरत आहे.

१२) ग्रामसभेच्या निर्णयामुळे अथवा उपविभाग स्तरीय समितीच्या निर्णयामुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती अनुक्रमे उपविभागीय स्तरीय समिती व जिल्हास्तरीय समितीकडे अपिल करु शकते. व्यथित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय अपिल निकाली काढले जाणार नाही. वनहक्क धारकांने सादर केलेल्या वनहक्क मागणीच्या क्षेत्रामध्ये दावा फेटाळणे अथवा फेरफार करावयाचे झाल्यास संबधित प्राधिकरणाने लेखी आदेशात कळविणे बंधनकारक आहे.

व्यथित व्यक्तीला अपिलाची संधी

१३) वनहक्क कायदा, २००६ नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२ नुसार तसेच केंद्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार वनहक्क कायद्याची अंमलबजावणी ग्रामीण भागात पार पाडण्यात येत आहे.

जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार यांचे निर्देश

अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम २००८ नुसार वनहक्क कायद्याची अंमलबजावणी महानगरपालिका क्षेत्रात करता येत नाही असे जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून कळविण्यात आले होते. तथापि वरील सुचना रद्द करण्यात आल्याचे व नगरपालिका क्षेत्रात वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करता येऊ शकेल असे जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून दि.२९.०४.२०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यासअनुसरुन काही राज्ये / केंद्र

शासित प्रदेशांनी केंद्रिय जनजाती मंत्रालयाकडे नगरपालिका क्षेत्रात वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन मागितले होते.

त्यानुसार जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून दि. ०५/०३/२०१५ च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशानुसार वनहक्क कायद्याची अंमलबजावणी नगरपालिका क्षेत्रात करण्यासाठी वनहक्कांचे स्वरुप व व्याप्ती ठरवण्याची प्रक्रिया सुरु करण्यासाठी ग्रामीण भागात ज्याप्रमाणे “ग्रामसभा” हे प्राधिकरण आहे, त्याप्रमाणे नगरपालिका क्षेत्रासाठी “ग्रामसभा” प्राधिकरणाच्या समकक्ष प्राधिकरण स्थापन करण्याची तसेच अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांना त्यानुसार कार्यवाही पार पाडण्याबाबत सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय:-**

जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी त्यांचे क्र. १९०२०/०२/२०१२-FRA (Vol II) दि. ०५ मार्च, २०१५ चे ज्ञापनान्वये स्पष्ट करण्यात आले आहे की, नागरी / नगरपालिकांच्या क्षेत्रातही वनहक्क कायदा लागू आहे.

२. वनहक्क कायद्यांतर्गत काही राज्ये / केंद्र शासित प्रदेशांनी केंद्रीय जनजाती कार्य मंत्रालय यांच्याकडे नागरी / नगर पालिका क्षेत्रात वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करण्याबाबत मार्गदर्शन मागितले होते. त्यानुसार वनहक्क कायदा कलम १२ अन्वये केंद्रीय जनजाती कार्य मंत्रालयाने पुढील प्रमाणे निर्देश दिले आहेत.

३. राज्य घटनेच्या भाग IX-A कलम २४३ Q अन्वये राज्यांनी नगर पंचायत, नगर परिषद, महानगर पालिका स्थापन करण्याची तरतुद आहे.

नगरपालिका क्षेत्रात वनहक्कांची प्रक्रिया सुरु करणारे प्राधिकरण (वार्ड समिती)

३.१ नागरी क्षेत्रात वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वनहक्क कायदा, वनहक्क नियम व त्या अंतर्गत दिलेले मार्गदर्शन, स्पष्टीकरण यांच्या नुसार “ग्रामसभा” या संज्ञेचा अर्थ राज्य घटनेच्या कलम २४३(S) अंतर्गत स्थापित केली असल्यास वॉर्ड समिती, आणि वॉर्ड समिती स्थापन केली नसल्यास वसाहतींमध्ये आजही वास्तव्य करीत असलेल्या आणि स्पष्टपणे ओळखता येण्यासारख्या त्या वसाहतींमधील प्रौढ रहिवाशांचा समूह असा असेल, आणि जर असा स्पष्टपणे ओळखता येणारा समुह नसेल तर मोहल्ला सभा किंवा पाडा किंवा टोला यापैकी जो लहान असेल तो असेल.

आणखी असे की, नगरपंचायत किंवा इतर संक्रमण क्षेत्रात ग्रामसभा म्हणजे तत्कालिन पाडा/ टोला / वाडी/ वसाहत / पारंपारिक गांव या मधील प्रौढ रहिवाशांचा समूह असेल.

३.२ वरील समूह वनहक्क कायद्याचे कलम ६ च्या अंतर्गत वैयक्तिक आणि सामूहिक किंवा दोन्ही वनहक्कांचे स्वरुप आणि व्याप्ती निर्धारित करण्याची प्रक्रीया करेल. तसेच सदर समूह वनहक्क कायदा, वनहक्क नियम व मार्गदर्शक सुचना इ. मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे ग्रामसभांच्या कार्याचेही निर्वहन करेल. तसेच सदर समूह

वनहक्क कायद्याच्या कलम ५ अन्वये दिलेल्या जबाबदाऱ्या, नियम ४ मध्ये दिलेली कर्तव्ये आणि नियम २ (ड: ) प्रमाणे वनहक्क समिती (FRC) गठीत करण्याची जबाबदारीही पार पाडेल.

३.३ वनहक्क कायदा कलम ६(३) अन्वये स्थापित करण्यात आलेल्या उपविभागीय स्तरीय समितीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील नगरपालिका क्षेत्रातील असे सर्व दावे स्विकारून, विचार करून खालील परिच्छेद ३.५ मध्ये केलेल्या बदलांच्या अधिन राहुन निर्धारीत केले पाहीजे.

नगरपालिका क्षेत्रात उपविभागीय स्तरीय समितीची रचना

३.४ वनहक्क कायद्याच्या कलम ६(५) अन्वये स्थापित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीने त्यांच्या जिल्ह्यातील नगरपालिका क्षेत्रातील सर्व दाव्यांवर विचार करून खालील परिच्छेद ३.५ मध्ये केलेल्या बदलांच्या अधिन राहुन निर्धारीत केले पाहिजे .

जिल्हास्तरीय समिती

३.५ नगरपालिका क्षेत्रात उपविभागीय आणि जिल्हास्तरीय समित्यांची रचना खालील प्रमाणे असेल.

(अ) नगर पालिका क्षेत्रात वनहक्क कायदा नियम ५ (ग) अंतर्गत उपविभागीय स्तरीय समितीमध्ये समाविष्ट असलेल्या पंचायत राज संस्थांच्या तीन प्रतिनिधींऐवजी नगरपरिषदा /नगरपालिका / महानगरपालिका यांनी नामनिर्देशीत केलेले सदस्य, उपविभागीय स्तरीय समितीमध्ये घेण्यात यावेत. त्यापैकी किमान दोन अनुसूचित जमातीचे असावेत किंवा आदिम जमातीतील असावेत. आणि जेथे अनुसूचित जमाती नसतील तेथे दोन सदस्य हे प्राधान्याने इतर पारंपारिक वन निवासी असावेत आणि एक सदस्य महिला असावी.

नगरपालिका क्षेत्रात उपविभागीय स्तरीय समितीची रचना

आणखी असेही की, जिल्ह्यात जर एका पेक्षा जास्त नगरपालिका आहेत तेथे विविध नगरपालिका क्षेत्रांमधुन आदिवासी लोकसंख्येच्या उतरत्या क्रमानुसार सदस्य नामनिर्देशीत करण्यात यावेत.

(ब) नगरपालिका क्षेत्रामध्ये वनहक्क कायदा नियम ७ (ग) मध्ये नमुद जिल्हास्तरीय समितीच्या जिल्हा पंचायतीच्या ३ सदस्यांऐवजी त्या जिल्ह्यातील नगरपरिषदा/ नगरपालिका /महानगरपालिका यांनी नामनिर्देशीत केलेले तीन सदस्य असावेत, त्यापैकी किमान दोन हे प्राधान्याने वननिवासी असलेले अनुसूचित जमातीचे असावेत किंवा आदिम जमातीचे असावेत आणि जेथे अनुसूचित जमातीचे सदस्य उपलब्ध नाहीत तेथे प्राधान्याने दोन सदस्य इतर पारंपारिक वननिवासी असावेत आणि एक सदस्य महिला असावी.

नगरपालिका क्षेत्रात जिल्हा स्तरीय समितीची रचना

जेथे जिल्ह्यात एका पेक्षा जास्त नगरपरिषदा/ नगरपालिका /महानगरपालिका आहेत तेथे विविध नगरपालिका क्षेत्रामधुन आदिवासी लोकसंख्येच्या उतरत्या क्रमानुसार सदस्य नामनिर्देशीत करण्यात यावे.

३.६ जेथे नगरपरिषद / नगरपालिका / महानगरपालिका या जिल्हा स्तरावर आहेत किंवा अनेक जिल्ह्यांच्या मिळुन बनलेल्या आहेत तेथे जिल्ह्यातील उपविभागीय स्तरीय समिती यांचा सल्ला घेण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

राज्यस्तरीय समितीची कार्ये

३.७ वनहक्क कायद्याच्या कलम ६ (७) व वनहक्क कायदा नियम ९ अन्वये स्थापित राज्य स्तरीय सनियंत्रण समिती हे नगरपालिका क्षेत्रातील वनहक्क दावे मंजुर करण्याच्या व सुपूर्द करण्याच्या प्रगतीवर नियमित रित्या देखरेख ठेवेल आणि त्या संदर्भातील अहवाल केंद्रीय जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करेल आणि नियम १० मध्ये नमुद इतर कार्येही नगरपालिका क्षेत्रात करेल.

३.८ वनहक्क कायदा, वनहक्क नियम, मार्गदर्शक सुचना, स्पष्टीकरणे याव्दारे उपविभागीय स्तरीय समिती , जिल्हास्तरीय वनहक्क समिती व राज्य संनियंत्रण समिती यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार, कर्तव्ये हे योग्य त्या फेरफारासह नगरपालिका क्षेत्रासाठीही लागु राहतील.

४. उपरोक्त शासन निर्णयातील मुद्या क्र. ३.५ येथे नमूद केल्याप्रमाणे उपविभागीय स्तरीय समिती व जिल्हास्तरीय समितीमध्ये त्या जिल्ह्यातील नगर परिषदा /नगरपालिका / महानगरपालिका यांनी नामनिर्देशीत करावयाच्या तीन सदस्यांच्या नियुक्तीची कार्यवाही संबंधित उपविभागीय स्तरीय समिती व जिल्हास्तरीय समितीने प्राधान्याने करण्यात यावी व नगरपरिषदा / नगरपालिका / महानगरपालिकांकडून नामनिर्देशनाने करावयाच्या सदर तीन सदस्यांच्या नियुक्तीची कार्यवाही होईपर्यंतच्या कालावधीत अंमलबजावणी यंत्रणांकडून दावेदारांचे दावे निर्धारित करण्याच्या प्रक्रीयेस खिळ बसणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

५. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र राज्य यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या राज्यातील सर्व नगर परिषदा / नगरपालिका/ महानगरपालिका यांनी नागरी / नगरपालिका क्षेत्रात वनहक्क अधिनियमाची अंमलबजावणी तातडीने करण्यासाठी जनजाती कार्य मंत्रालयाच्या निर्देशानुसार उपरोक्त परिच्छेद ३.५ मधील दिलेल्या सूचना तसेच अ.क्र. ०४ येथील सूचनांच्या अनुषंगाने आवश्यक निर्देश संबंधित यंत्रणांना देण्याची कार्यवाही करावी. व याबाबतचा एकत्रित प्रगती अहवाल जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली होणाऱ्या राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या आगामी बैठकीत सादर करण्यात यावा.

६. तरी उपरोक्त सुचनांचे पालन करून सर्व संबंधित अंमलबजावणी यंत्रणांनी नागरी / नगरपालिका क्षेत्रातील वनहक्क दावे निर्धारीत करण्याची प्रक्रिया त्वरीत सुरू करण्यात यावी व याबाबतचा मासिक अहवाल नोडल अधिकारी, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांजकडे पाठविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१५०९०८१६२०५५४७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Prabhakar Bapurao Gawade

Digitally signed by Prabhakar Bapurao Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prabhakar Bapurao Gawade
Date: 2015.09.08 16:30:49 +05'30'

**( प्रभाकर बा. गावडे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१ मा.राज्यपाल यांचे सचिव
२ मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३ मा.मंत्री, (महसूल) यांचे खाजगी सचिव
४ मा.मंत्री, (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
५ मा.राज्यमंत्री, ( महसूल) यांचे खाजगी सचिव
६ मा.राज्यमंत्री, (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव
७ मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
८ मा.प्रधान सचिव (महसूल), मंत्रालय, मुंबई
९ मा. प्रधान सचिव (ग्राम विकास), मंत्रालय, मुंबई.
१० मा. प्रधान सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई.
११ मा. प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई.
१२ मा. सचिव (आदिवासी विकास विभाग), मंत्रालय, मुंबई
१३ मा. सचिव (वने), मंत्रालय, मुंबई.
१४ आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
१५ आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१६ सर्व विभागीय आयुक्त/ उपायुक्त ( महसूल) नाशिक.
१७ सर्व जिल्हाधिकारी/ अपर जिल्हाधिकारी
१८ सर्व आयुक्त, महानगरपालिका
१९ सर्व अप्पर आयुक्त, आदिवासी विकास
२० सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा
२१ सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका
२२ सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२३ सर्व सह सचिव / उप सचिव, कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२ निवड नस्ती (कार्या-१४), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मध्ये विनिदिष्ट केलेल्या तरतुदींचे तंतोतंत पालन करुन वनहक्क दाव्यांची पडताळणी करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः याचिका-२०१६/प्र.क्र. १२४/का-१४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक:- ११ नोव्हेंबर, २०१६.**

<u>वाचा</u> :- अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वत:च्या उपजीविकेकरिता शेती कसण्यासाठी वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क; निस्तार सारखे हक्क; गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क; पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्कदार असणे; निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहेत.

२. मात्र, वनहक्क निश्चित करतांना उक्त अधिनियम व नियमांमध्ये विनिदिष्ट केलेल्या तरतूदींचा विसंगत अर्थ काढून दाव्यांची पडताळणी चुकीच्या पध्दतीने होत असल्याचे उदा. वनहक्क दावे मंजूर करण्यासाठी पुरावा म्हणून वन विभागाकडून दंडाच्या पावतीचा आग्रह धरणे, भोगवटयाखाली असलेल्या वन जमिनीपैकी कमाल ४ हेक्टरपेक्षा कमी जमिनीचा ताबा मिळणे, अपिल अर्जावर अंतिम निर्णय होण्याआधीच वन विभागामार्फत अतिक्रमण हटविले जाणे, वनहक्क समितीच्या उपस्थितीत महसूल आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत प्रत्यक्ष स्थळ पाहणी न होणे, वर्षानुवर्षे वन विभागाकडे दावे प्रलंबित राहणे इत्यादी कारणांमुळे अनेक वनहक्क धारकांवर अन्याय होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

३. उपरोक्त बाबी विचारात घेता, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मध्ये विनिदिष्ट केलेल्या तरतुदींचे तंतोतंत पालन करुन काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने पुढीलप्रमाणे सुस्पष्ट सूचना देण्यात येत आहेत.

(i) वनहक्क निश्चित करण्यासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ मधील नियम १३ च्या उपनियम ३ मध्ये "ग्रामसभा, उपविभागस्तरीय समिती आणि जिल्हास्तरीय समिती वनहक्क निर्धारित करतांना वर नमूद केलेल्या बाबींपैकी एकाहून अधिक बाबी विचारात घेतील." अशी तरतूद आहे. त्यामुळे नियम १३ मध्ये विनिदिष्ट केलेल्या पुराव्यांपैकी किमान २ पुरावे विचारात घ्यावेत आणि नियम १२(क)(११) मधील स्पष्टीकरणाप्रमाणे दाव्याच्या विचारार्थ कोणत्याही प्रकारच्या ( उदा. दंडाच्या पावत्या, अतिक्रमण केलेल्या यादया, प्राथमिक अपराधाचा अहवाल, वनजमाबंदी अहवाल इ. ) कागदपत्रांचा आग्रह धरु नये. प्रस्तुत कागदपत्रांअभावी ज्यांचे दावे अपात्र ठरविले असतील अशा अपात्र दाव्यांचा फेरविचार करावा. तसेच नवीन वनहक्क दावे सादर केल्यास ते दाखल करुन घ्यावेत.

(ii) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ मधील कलम २(ण) मध्ये विनिदिष्ट केल्यानुसार दिनांक १३ डिसेंबर, २००५ पूर्वी किमान तीन पिढयांपासून ( पिढी याचा अर्थ २५ वर्षाचा कालखंड ) वनांत राहणारा आणि उपजिविकेसाठी वनजमिनीवर अवलंबून असणाऱ्या व नियम १३ मध्ये विनिदिष्ट केलेल्या पुराव्यांपैकी किमान २ पुरावे सादर केलेल्या **इतर पारंपारिक वन निवासी दावेदारांचे** दावे अमान्य करु नयेत.

(iii) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ मधील नियम १५ अन्वये अपिल केलेल्या अर्जावर जिल्हास्तरीय समितीमार्फत जोपर्यंत अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत वन विभागाने दावेदाराच्या भोगवटयातील वनभूमीवरील अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करु नये.

(iv) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ मधील कलम ३(१)(क) मध्ये विनिदिष्ट केलेली व प्रत्यक्ष भोटवटयाखाली / ताब्यात असलेली कमाल ४ हेक्टरच्या मर्यादेपर्यंतची वनजमिन पात्र वनहक्क दावेदारांसाठी मंजूर करण्यांत यावी.

(v) वनहक्क दावा दाखल केलेल्या मागणीधारकाकडे केवळ वडिलोपार्जित महसूली जमीन असून त्याच्याकडे उपजिविकेचे साधन असल्याचा आक्षेप घेऊन वनहक्के दावे अमान्य करण्यांत येऊ नयेत.

(vi) जिल्हास्तरीय समितीकडे वनहक्क दावे प्राप्त झाल्यापासून कमाल ६ महिन्यांच्या आत अंतिम निर्णय घ्यावा. कोणत्याही परिस्थितीत जिल्हास्तरीय समितीकडे ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी वनहक्क दावे प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता जिल्हास्तरीय समितीने घ्यावी.

(vi) जिल्हास्तरीय समितीस प्राप्त झालेल्या वनहक्क दाव्यांवर जलदगतीने अंतिम निर्णय घेणे सुकर व्हावे, याकरिता वनहक्क समितीने त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या वनहक्क दाव्यांची पडताळणी करतांना नियम १२(१) नुसार संबंधित मागणीदाराच्या जागेला प्रत्यक्ष भेट दयावी व त्या जागेवरच दाव्यांचे स्वरुप, व्याप्ती व पुरावा याची पडताळणी करावी.

उक्त नियम १२(क)(१) नुसार वनहक्क समितीकडून सूचना प्राप्त झाल्यावर वन आणि महसूल विभागाचे अधिकारी यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहावे आणि प्राप्त वनहक्क दाव्याच्या अनुषंगाने पुराव्यांची पडताळणी करुन खात्री करावी.

(vii) तालुका सामुहिक वनहक्क व्यवस्थापकांनी वनहक्क दावेदार असलेल्या प्रत्येक गावामध्ये प्रत्यक्ष जाऊन वनहक्क दाव्यांबाबत उदभवलेल्या अडचणीसंदर्भात विचारणा करावी तसेच त्यागावातील पात्र /अपात्र दावे तसेच अपिल दाखल केलेल्या दाव्यांच्या तपशिलासह प्रत्येक महिन्याला केलल्या प्रकरणाची माहिती जिल्हा सामुहिक वनहक्क व्यवस्थापकास सादर करावी. जिल्हा सामुहिक वनहक्क व्यवस्थापकाने याबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्यास आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना सादर करावा.

४. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी "नोडल एजन्सी" म्हणून याप्रकरणी वेळोवेळी आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१६१११११६५४४१३४२४ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prabhakar Bapurao Gawade

Digitally signed by Prabhakar Bapurao Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prabhakar Bapurao Gawade
Date: 2016.11.11 16:57:28 +05'30'

**( प्रभाकर बा. गावडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४ सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५ सचिव, (ग्राम विकास ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
७. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
८. प्रधान मुख्य वन संरक्षक ( वन बल प्रमुख ) महाराष्ट्र राज्य, नागपूर
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. सर्व जिल्हाधिकारी.
११. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर,अमरावती,
१२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
१३. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१४. सर्व तालुका सामुहिक वनहक्क व्यवस्थापक
१५. सर्व जिल्हा सामुहिक वनहक्क व्यवस्थापक
१६. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्या.अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
१५. निवड नस्ती.(का.१४) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

**अनुसूचित जमाती व पारंपारिक वननिवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम २००६ चे नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ ची काटेकोर अंमलबजावणी करुन वनहक्क दावे व अपीले यांचा निपटारा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : वहका-२०१८/प्र.क्र.१३३/का-१४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : - २८ डिसेंबर, २०१८

**वाचा:-**
(१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२.
(२) आदिवासी विकास विभाग,शासन परिपत्रक क्रमांक :वहका-२०१८/प्र.क्र.४३/का-१४, दि. ११ मे, २०१८
(३) आदिवासी विकास विभाग,शासन परिपत्रक क्रमांकःयाचिका-२०१६/प्र.क्र.१२४/का-१४, दि. ११ नोव्हेंबर, २०१६
(४) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. एस-१०/२०१६/प्र.क्र.४१७/फ-३, दि.०२ नोव्हेंबर, २०१६

**शासन परिपत्रक :-**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम , २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३(१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वत:च्या उपजीविकेकरिता शेती कसण्यासाठी वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क; निस्तार सारखे हक्क; गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क; पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्कदार असणे; निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहे.

२. उक्त अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता ) अधिनियम , २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन प्रलंबित वनहक्क दावे व अपीले यांचा निपटारा करण्यासाठी संदर्भ क्र. २ येथील परिपत्रकान्वये “वनमित्र मोहीम” सुरू करण्यात आलेली आहे. तसेच अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मधील तरतूदींची तंतोतंत पालन करून वनहक्क दाव्यांची पडताळणी करणेबाबत संदर्भ क्र. ३ अन्वये सविस्तर सुचना देण्यात आल्या आहेत. संदर्भ क्र. २ अन्वये राबविण्यात येत असलेल्या “वनमित्र मोहीमेच्या” कार्यवाहीच्या अनुषंगाने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचेकडून जिल्हानिहाय व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी आढावा घेण्यात येत आहे.

३. प्रस्तुत “वनमित्र मोहीमे” अंतर्गत अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम , २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अन्वये मोठया प्रमाणावर दावे व अपिले निकाली काढले जात असताना, पडताळणी प्रक्रियेमध्ये व दाव्यांच्या किंवा अपिलाच्या निकालानंतर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीमध्ये काही उणिवा/त्रुटी असल्याचे तसेच वन विभागामार्फत तांत्रिक कारण देवून दावे/अपिले अमान्य करण्यात येत असल्याचे शासनाच्या निर्दशनास आले आहे. सदर उणिवांच्या/ त्रुटींची

पुर्तता करून अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन दावे व अपिले यांचा निपटारा करण्याबाबत मा. मुख्यंमत्री महोदय यांनी निर्देश दिले आहेत या निर्देशाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सविस्तर सुचना प्रसूत करण्यात येत आहेत.

१. वनहक्क कायद्यांतर्गत केवळ तांत्रीक कारणे देवून दावे/ अपिले नामंजूर करण्यात येवू नयेत. वन विभागाकडून अशाप्रकारे तांत्रीक कारणास्तव दावे नांमजूर करण्याचे प्रमाण जास्त असल्याने वन विभागाच्या संबधित अधिकाऱ्यांना अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मधील तरतूदींबाबत विशेष प्रशिक्षण देण्यात यावे.

२. लाभार्थ्याच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेले कमाल ४ हेक्टरच्या मर्यादेत क्षेत्र मंजूर करावे.

३. मान्य करण्यात आलेल्या वनपट्टयाचे प्रमाणपत्र व ७/१२ उतारा लाभार्थ्यास तात्काळ उपलब्ध करून द्यावा. प्रत्यक्ष जमिनीची मोजणी करून संबधित लाभार्थ्यांचा पोटहिस्सा नमूद करून स्वतंत्र ७/१२ उतारा देण्यात यावा.

४. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अंतर्गत वैयक्तीक वनहक्कधारकास प्राप्त झालेले प्रमाणपत्र व ७/१२ उताऱ्याच्या आधारावर बँकाकडून मिळणारी कर्जे तसेच इतर शासकीय योजनांतर्गत प्राप्त होणाऱ्या लाभासाठी पात्र आहेत याची नोंद घेण्याबाबत महसूल व वन विभागाच्या संदर्भ क्र. ४ येथील परिपत्रकान्वये निर्देश दिले असून ज्या जिल्ह्यांमध्ये वैयक्तिक वनहक्कधारकांना बँकाकडून कर्जे मिळण्यास अडचणी येत आहेत किंवा शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही, अशा प्रकरणी जिल्हाधिकारी यांनी संबधित बँकेस आवश्यक सुचना देवून लाभार्थ्यांच्या अडचणी दूर कराव्यात व त्यांना कर्जे तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यास उपाययोजना आखाव्यात.

५. उपविभागीय स्तरीय तसेच जिल्हास्तरीय समितीमध्ये असलेल्या अशासकीय सदस्यांनी बैठकीदरम्यान दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने अंतिम निर्णय घेताना त्या सुचना विचारात घ्याव्यात.

६. ज्या वैयक्तीक वनहक्क धारकांना जमिनीचे पट्टे प्राप्त झाले आहेत, त्यांना जमिन सुधारणा, शेतीपुरक व्यवसाय व उत्पन्न वाढीच्या योजनांचा प्राधान्यांने लाभ द्यावा. शासनाच्या कृषी व पदुम विभाग, आदिवासी विकास विभाग, ग्राम विकास विभागा इ. मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांकरीता लाभार्थी निवड करताना वैयक्तीक वनहक्क धारकांना प्राधान्य देण्यात यावे.

२. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अंतर्गत कार्यवाही अचूकरित्या पुर्ण होईल याकडे लक्ष देऊन संबंधित विभागीय आयुक्त यांनी यापुर्वी संदर्भाधीन परिपत्रकांन्वये दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने व उपरोक्त सुचनांच्या अनुषंगाने उक्त अधिनियमाच्या अंमलबजावणीचा पंधरवाडी आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना सादर करावा.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८१२२८१७१०३५०८२४ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Mahadu Raut

Digitally signed by Pandurang Mahadu Raut
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=136cc102e03660c61e3577e800c6ed b8125d21d6c9d7742a980d024e919fa85c, cn=Pandurang Mahadu Raut
Date: 2018.12.28 17:19:20 +05'30'

**( पांडुरंग म. राऊत )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव

२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. मंत्री ( सर्व ) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री ( सर्व ) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५) मा. मंत्री , आदिवसी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानमंडळ, विधानभवन,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
८) मा. संसद सदस्य ( सर्व )
९) मा. विधिमंडळ सदस्य ( सर्व )
१०) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव ( महसूल ) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव (कृषि ) कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) सचिव (पदुम ) कृषि व पदूम विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, (ग्राम विकास ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१७) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
१८) प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१९) सर्व विभागीय आयुक्त.
२०) सर्व जिल्हाधिकारी
२१) अपर आयुक्त, आदिवासी विकास , ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
२२) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
२३) सर्व उपविभागीय आधिकारी
२४) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२५) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
२६) निवड नस्ती.(का.१४) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारित नियम २०१२ अंतर्गत दाखल केलेल्या धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवासक्षेत्रातील वनहक्क दाव्यांचा निपटारा करण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

**आदिवासी विकास विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : वहका-२०१९/ प्र.क्र.१८६/का.१४**

मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १० जानेवारी, २०२०

<u>वाचा</u> :-१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारित नियम २०१२

२) प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) नागपूर याचे आदेश क्र.डेस्क-२३ (२)सर्व्हे/ डब्ल्यूएल/१३५/२६४८/२०१८-१९,दि.२३/१०/२०१८

३) प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) नागपूर याचे आदेश क्र.डेस्क-२३ (२)सर्व्हे/ डब्ल्यूएल/१३५/३६००/२०१८-१९,दि.११/०१/२०१९

४) प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) नागपूर याचे आदेश क्र.डेस्क-२३ (२)सर्व्हे/ डब्ल्यूएल/१३५/३७८६/२०१८-१९,दि.२४/०१/२०१९

५) आदिवासी विकास विभाग,शासन परिपत्रक क्र.सीडब्ल्यूएच-२०१९/ अनौ.सं.क्र.२४/प्र.क्र.५३(भाग-१)/का.१४,दि.२६/११/२०१९

६) मा.उच्च न्यायालय,खंडपीठ मुंबई यांचे दि.१८ डिसेंबर,२०१९ रोजीचे आदेश

<u>प्रस्तावना</u> :-

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ नियम २००८ व सुधारित नियम २०१२ नुसार धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील)वन्यजीव अधिवास निश्चित व अधिसूचित करणे, मूळ अधिवासातील धोकाग्रस्त वन्यजीवांची यादी घोषित करणे व अशा वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करणे यासंदर्भात मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे जनहित याचिका क्र.१३१/२०१४ (वनशक्ती पब्लीक ट्रस्ट व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) दाखल करण्यात आली आहे.

२. सदर जनहित याचिके प्रकरणी मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे दि.१८.१२.२०१९ रोजी सुनावणी झाली. सदरील सुनावणीवेळी संदर्भ क्र. ६ अन्वये मा.उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

“ 12. We shared the anxiety of both, the petitioners and the applicant. In the event any applications, which have to be made so as to protect the rights under section 3 of the Act of the dwellers, if not made uptill now, we grant three months time to make the same. If these applications are received and they are found to be in order, the claims raised shall be dealt with and

decided strictly in accordance with law. Similarly, all claims already received and pending at the initial stage shall also be decided within this period. We also expect the appellate authority, which may have been approached by those claims have been rejected partially or fully, to deal with the appeals expeditiously and take a decision thereon within the above mentioned duration.”

३. उपरोक्त प्रमाणे मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेता, धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास क्षेत्रातील दाखल न झालेले दावे प्राप्त करुन घेणे व त्यावर निर्णय घेणे, ग्रामसभांकडे/उपविभागीयस्तरीय समिती/ जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे प्रलंबित असलेले दावे निकाली काढणे आणि उपविभागीय समितीने नाकारलेल्या सर्व दावे व अपील प्रकरणांची जिल्हास्तरीय समितीने दखल घेऊन पुन्हा तपासणी करुन वनहक्काबाबत नियम ८ प्रमाणे ३ महिन्यात अंतिम निर्णय घेणे आवश्यक आहे. वास्तविक, धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास संदर्भात प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) नागपूर यांचे दि.२३.१०.२०१८, दि. ११.०१.२०१९ व दि.२४.०१.२०१९ च्या आदेशान्वये महाराष्ट्रातील एकूण ५५ संरक्षित धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास क्षेत्र घोषित करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत ५५ संरक्षित धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास क्षेत्रातील दाव्यांसदर्भात सर्वप्राथम्याने निर्णय घेण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. सबब, संबंधित क्षेत्रातील जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,जिल्हास्तरीय वनहक्क समिती यांनी उक्त ५५ धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास अंतर्गतच्या गावांमधील सर्व वैयक्तिक व सामुहिक वनहक्क दाव्यांवर कालबध्द पध्दतीने अंतिम निर्णय घेण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यासंदर्भातील सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार,मा.उच्च न्यायालय,खंडपीठ मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र.१३१/२०१४ (वनशक्ती पब्लीक ट्रस्ट व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर) प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ मुंबई यांनी दि.१८ डिसेंबर, २०१९ रोजी दिलेले आदेश विचारात घेता, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) नागपूर) यांनी संदर्भ क्र. २, ३ व ४ येथील आदेशान्वये घोषित केलेल्या महाराष्ट्र राज्यातील ५५ धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास अंतर्गत असलेल्या गावांची यादी वन विभागातील संबंधित अधिकाऱ्यांनी उप विभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द करुन अशा गावांमधील सर्व वैयक्तिक व सामुहिक वनहक्क दाव्यांवर अंतिम निर्णय होण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यानुसार खालीलप्रमाणे कालबध्द पध्दतीने कामकाज करावे.

| अ.क्र. | करावयाच्या कामाचा तपशील | कालावधी | कार्यन्वयीन यंत्रणा |
|---|---|---|---|
| १. | वन विभागातील अधिकाऱ्यांनी संरक्षित धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास क्षेत्रातील<br>i. गावाचे नांव व त्याचे क्षेत्रफळ,<br>ii. गावांतील लोकसंख्या व कुटुंबसंख्या, यांची संपूर्ण माहिती संबंधित ग्रामस्तरीय समिती,उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करणे. | १५ दिवस | वन विभाग |
| | (iii) वन विभागाकडे उपलब्ध असलेले सबंधित गावांचे शासकीय अभिलेख (POR), अतिक्रमणधारकांची यादी इ. माहिती ग्रामस्तरीय समिती, उप विभागीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना उपलब्ध करुन देणे. | १ महिना | वन विभाग |
| २. | वनहक्क कायदा, २००६ अंतर्गत वरीलपैकी ज्या गावांनी ग्रामस्तरीय वनहक्क समिती स्थापन केली नसेल, अशा गावांमध्ये ग्रामस्तरीय समिती गठण करणे व त्यांच्यासाठी प्रशिक्षण आयोजित करणे. | १ महिना | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,<br>गट विकास अधिकारी, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे, समन्वयक संबंधित जिल्हाधिकारी |
| ३. | धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास अंतर्गत असलेल्या गावांतील ग्रामपंचायत व ग्रामसभांचे आयोजन करुन वनहक्क दावे दाखल करणेबद्दल जाणीव करुन देणे. | १५ दिवस | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( ग्रामपंचायत ) |
| ४. | ग्रामस्तरीय वनहक्क समिती /उपविभागीयस्तरीय समिती/ जिल्हास्तरीय वनहक्क समितीकडे सध्या प्रलंबित असलेले दावे व अपीले यांचा संबंधित समिती स्तरावर निर्णय घेणे. | २ महिने | सबंधीत ग्रामस्तरीय वनहक्क समिती /<br>उपविभागीयस्तरीय समिती /<br>जिल्हास्तरीय वनहक्क समिती |
| ५. | उपविभागस्तरीय समितीने नाकारलेले दावे व अपील प्रकरणांची जिल्हास्तरीय समितीने स्वाधिकारे दखल घेऊन पुर्नविलोकन करुन अंतिम निर्णय घेणे. | ३ महिने | उपविभागीयस्तरीय समिती /<br>जिल्हास्तरीय वनहक्क समिती |

२. उपरोक्त विवरणपत्रातील अ.क्र. १ येथे नमूद केल्यानुसार, संरक्षित धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास क्षेत्रातील (i) गावाचे नांव व त्याचे क्षेत्रफळ, (ii) गावांतील लोकसंख्या व कुटुंबसंख्या, (iii) वन विभागाकडे उपलब्ध असलेले सबंधित गावांचे शासकीय अभिलेख (POR) ( नियम १३ मध्ये विनिदिष्ट केलेल्या पुराव्यांव्यतिरिक्त ), अतिक्रमणधारकांची यादी इ. माहितीची निकड विचारात घेता, सदर माहिती वन विभागातील क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी संबधित ग्रामस्तरीय समिती, उप विभागीय अधिकारी व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व जिल्हाधिकारी कार्यालय यांना १५ दिवसांच्या आत उपलब्ध करुन द्यावी.

३. धोकाग्रस्त (अतिसंवेदनशील) वन्यजीव अधिवास क्षेत्रातील संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी कालबध्द कार्यक्रमाप्रमाणे मोहिम स्वरुपात वनहक्काचे निर्णय देण्यासाठी आवश्यक ते नियोजन करावे. संदर्भ क्र.५ अन्वये निश्चित केल्यानुसार संबंधित प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी आवश्यकतेनुसार पाठपुरावा करुन उक्त कार्यवाहीबाबतचा अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, आयुक्तालय, नाशिक व शासनास तसेच fra.act05@gmail.com वर दर १५ दिवसांनी सादर करावा.

४. सदर कार्यवाही करिता आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक यांना “नोडल अधिकारी” म्हणन नियुक्ती करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२००११०१५२३४९३७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Laxmikant Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=413beeca50b65438c7a037917ccf1f24d8ca684b65640df6372ea731ffac4dfc, serialNumber=e714bbcd4d43c6782884c7e7a2091f9f1edc1d97ebb542c48b98fb8c8bdd6cf4, cn=Laxmikant Gopalrao Dhoke
Date: 2020.01.10 15:03:11 +05'30'

**(ल.गो.ढोके)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति**

१. मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
६. मा. राज्यमंत्री,आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य,मंत्रालय,मुंबई यांचे खाजगी सचिव
७. मा.विरोधी पक्षनेता,विधानमंडळ,विधानभवन,विधानमंडळ सचिवालय,मुंबई
८. मा.संसद सदस्य (सर्व)
९. मा.विधीमंडळ सदस्य (सर्व)
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
११. अप्पर मुख्य सचिव, (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव, (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

१६. प्रधान मुख्य वन संरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य,नागपूर
१७. सर्व विभागीय आयुक्त
१८. सर्व जिल्हाधिकारी.
१९. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
२०. सर्व उपविभागीय अधिकारी
२१. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती,
२२. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२३. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्या. अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
२४. निवड नस्ती.(का.१४)आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२ ची परिणामकारक अंमलबजावणी करणेसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः वहका-२०२१/प्र.क्र.५०/का-१४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- ०३ मार्च, २०२१

<u>वाचा</u> :- १) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२.
२) जन जाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे अ.शा.पत्र क्र. २३०११/०१/२०१९-FRA, दिनांक १५ जानेवारी, २०१९
३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.वहका-२०१९/प्र.क्र.१८६/का.१४, दि.१० जानेवारी, २०२०

**प्रस्तावना :-**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे ) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वत:च्या उपजीविकेकरिता शेती कसण्यासाठी वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क; निस्तार सारखे हक्क; गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क; पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्कदार असणे; निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहेत.

वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी आदिवासी व इतर वनपट्टे धारकांना वनहक्क प्रमाणपत्र वाटप करणे, दावे मंजूर केलेल्या जमिनीची मोजणी करणे, ७/१२ उतारे तात्काळ देणे याविषयांबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.११.०२.२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या जनजाती सल्लागार परिषदेमध्ये चर्चा झाली. त्यानुषंगाने वनहक्क कायद्याची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

१. वन हक्क दावे विहित कालावधीत निकाली काढण्यासाठी तसेच वैयक्तिक व सामूहिक दावे मान्य केल्यानंतर दावेदारांना वनहक्क प्रमाणपत्र वाटप, दाव्यांची जमीन मोजणी, वैयक्तिक दाव्यांचा ७/१२ वाटप यासाठी जिल्हाधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यात कालबध्द मोहिम हाती घ्यावी.
२. वनहक्क कायदा २००६ अंतर्गत दावेदाराच्या कब्ज्यात असणारे क्षेत्र व दावेदाराने मागणी केलेले क्षेत्र याचा विचार करून क्षेत्र मंजूर न करता कमी क्षेत्र मंजूर करण्यात येत असल्याचे दिसून येते त्याअनुषंगाने वनहक्क धारकांना नियमानुसार क्षेत्र मंजुर करण्यात यावे.

३. जिल्हास्तरीय वनहक्क समिती व उपविभागस्तरीय वनहक्क समिती यांच्या नियमित बैठका घेण्यात याव्यात.

४. जिल्हास्तरीय वनहक्क समिती व उपविभागस्तरीय वनहक्क समिती यांच्या बैठकास वनअधिकारी उपस्थित राहतील याची दक्षता घेण्यात यावी.

५. अतिसंवेदनशील वन्यजीव अधिवास क्षेत्रातील (CWH) दावे केंद्र शासनाच्या निदेशाप्रमाणे त्वरित निकाली काढणे आवश्यक असून अतिसंवेदनशील वन्यजीव अधिवास क्षेत्रातील वैयक्तिक, सामुहिक वनहक्क दावे, पुनर्विलोकनाची प्रकरणे निकाली काढण्यात यावीत.

६. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्र.१०९/२००८ मधील आदेशाच्या अनुषंगाने राज्यातील अमान्य करण्यात आलेले २२,५०९ दावे व अपिल यांची अभ्यासगटाव्दारे तपासणी करून पुनर्विलोकन करण्याबाबत वेळोवेळी जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आलेले आहे. सदर प्रकरणांचे पुनर्विलोकन करताना कागदपत्रे तपासणी करून योग्य निर्णय घेण्यात यावा तसेच अमान्य केलेल्या प्रकरणांची उचित कारणे नमूद करावीत.

७. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी वनहक्क प्रकरणांचा निपटारा करणे, टायटल्स प्रदान करणे, मोजणी करणे व ७/१२ देणे इत्यादीच्या संदर्भात राबविण्यात येणा-या मोहिमेचे सनियंत्रण करावे व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना योग्य त्या सुचना देऊन त्यांच्याकडून पाठपुरावा करण्यात यावा. उपरोक्त मोहिमेचा अहवाल दरमहा आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना उपलब्ध करून द्यावा.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०३०३१५३८१३३२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Laxmikant Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=413beeca50b65438c7a037917ccf1f24d8ca684b65640df6372ea731ffac4dfc, serialNumber=e714bbcd4d43c6782884c7e7a2091f9f1edc1d97ebb542c48b98fb8c8bdd6cf4, cn=Laxmikant Gopalrao Dhoke
Date: 2021.03.03 15:42:11 +05'30'

( ल. गो. ढोके )

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. मंत्री , आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री ( सर्व ) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानमंडळ, विधानभवन,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
७) मा. राज्यमंत्री ( सर्व ) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
८) मा. संसद सदस्य ( सर्व )
९) मा. विधिमंडळ सदस्य ( सर्व )
१०) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
११) अपर मुख्य सचिव ( महसूल ) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई

१३) अपर मुख्य सचिव (ग्राम विकास ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१६) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१७) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
१८) सर्व विभागीय आयुक्त
१९) सर्व जिल्हाधिकारी
२०) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
२१) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२२) सर्व उपविभागीय अधिकारी
२३) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२४) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२५) निवड नस्ती.(का.१४) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

----////----

**अनु.जमाती व इतर पारंपारिक निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम २०१२ अंतर्गत प्रलंबित वैयक्तिक वनहक्क दावेदारांची अतिक्रमण निष्कासित न करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक - एस-१०/२०२२/प्र.क्र.२४३/फ-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- २८ नोव्हेंबर, २०२२

वाचा :

१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२.

२) आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्र. याचिका २०१६/प्र.क्र.१२४/का-१४, दिनांक ११/११/२०१६.

अनु.जमाती व इतर पारंपारिक निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम २०१२ च्या कलम ३(१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर कायद्याची सुयोग्य अंमलबजावणी होण्याकरिता तसेच वनहक्क निश्चित करण्यासाठी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) सुधारणा नियम, २०१२ मधील नियम ६ अन्वये राज्यात ग्रामसभा वनहक्क समित्या, उप विभागीय समित्या तसेच जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. सदर समित्यांव्दारे नियम १३ मध्ये विनिर्दिष्ट केलेले पुरावे व अन्य तद्नुषंगिक तरतूदी विचारात घेऊन वनहक्क निर्धारित करण्याची कार्यवाही करण्यात येते.

२. तथापि, निदर्शनास आले आहे की, कार्यबाहुल्यामुळे दाव्यांची छाननी प्रक्रिया दिर्घकाळ पर्यंत प्रलंबित रहात आहे. जिल्हास्तरीय समितीकडे वनहक्क दावे प्राप्त झाल्यापासून कमाल ६ महिन्यांच्या आत अंतिम निर्णय घ्याव्या, अशा सूचना उक्त संदर्भ क्र. २ च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. वनहक्क दावे पडताळणीची प्रक्रिया सुरु असताना वनभूमीमधून निष्कासीत करण्यात येत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर निर्देशित करण्यात येते की, अशा जमिनींवर वनहक्क दावे दाखल असल्याची खातरजमा झाल्यास वनहक्क कायद्याच्या कलम ४ (५) मधील तरतूदींचे पालन करण्यात यावे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२२११२८१७२२४२८३१९ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVIKIRAN SABAJI GOVEKAR

Digitally signed by RAVIKIRAN SABAJI GOVEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=b00b3ae6f82b447bdd60190209f1258e170f8f617d261f81e6281dfbfdf28c0d, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B752370B557D0A3E58B4B069230BC54F6A13D04798D2EE7A3F1C7DCC5655271C, cn=RAVIKIRAN SABAJI GOVEKAR
Date: 2022.11.28 17:25:41 +05'30'

**(डॉ. रविकिरण गोवेकर )**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रति,**

मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई-३२.
अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व मुख्य वनसंरक्षक
सर्व जिल्हाधिकारी
आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत वैयक्तिक वन हक्क प्राप्त धारकास बँकांकडून कर्ज तसेच इतर शासकीय सवलतींचा फायदा मिळणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक एस-१०/२०१६/प्र.क्र.४१७/फ-३**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक :- ०२.११.२०१६**

मा. राज्यपाल महोदयांचे अध्यक्षतेखाली दि. १३ जुलै, २०१६ रोजी आदिवासी विकासांशी निगडीत विषयांसदर्भात झालेल्या बैठकीत नंदुरबार, धुळे, रायगड, गडचिरोली तसेच इतर काही जिल्हयांमध्ये काही ठिकाणी वनजमिनीची नोंद वनखंड क्रमांक (Compartment No.) च्या स्वरुपात असून अशा वनजमिनीबाबत ७/१२ उतारे जारी झाले नसल्याने तेथील वैयक्तिक वनहक्कधारक बँकांकडून मिळणारे कर्ज तसेच इतर शासकीय सवलतींपासून वंचित राहिले असल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर असे निर्देश देण्यात येत आहे की, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत वैयक्तिक वनहक्कधारक त्यास प्राप्त झालेल्या टायटल्सच्या आधारावर बँकांकडून मिळणारी कर्जे तसेच इतर शासकीय योजना अंतर्गत प्राप्त होणाऱ्या लाभासाठी पात्र रहातील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०१६११०३१०५८०६३८१९ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f3a3acfdb19b03628a399a9a8c3aed13feb739d7b8bfdb181d6ec461d4505a7e, cn=Virendra R Tiwari
Date: 2016.11.03 11:02:25 +05'30'

**वीरेंद्र तिवारी**
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

**प्रत :-**

१) प्रधान सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-०३२.
२) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-०३२.
३) सचिव, सहकार विभाग, मंत्रालय, मुंबई-०३२.

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
५) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक व वन्यजीव), (सर्व)
६) विभागीय आयुक्त, (सर्व)
७) जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक.
९) जिल्हाधिकारी (सर्व)
१०) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, (सर्व)
११) उप वनसंरक्षक (सर्व)
१२) अपर आदिवासी आयुक्त, (सर्व)
१३) जिल्हा उप निबंधक, जिल्हा मध्यवती सहकारी बँक, (सर्व)
१४) निवड नस्ती (फ-३)

--------

अनु.जमाती व इतर पारंपारिक निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम २०१२ अंतर्गत मंजूर वैयक्तिक वनपट्ट्यांवर विहीर बांधणे अनुज्ञेय असल्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : एस-१०/२०२१/प्र.क्र.६०४/फ-३**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक- २० जुन, २०२३.

**वाचा :**

१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२.

२) जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार यांचे अ.शा.पत्र क्र.२३०११/०१/२०१९-FRA, दिनांक १५.०१.२०१९.

३) जनजातीय कार्य मंत्रालय आणि पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल मंत्रालय, भारत सरकार यांचे संयुक्त अ.शा.पत्र क्र.२३०११/२५/२०२१-FRA, दिनांक ६.०७.२०२१.

४) मा.महाधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांचे क्र.AG/२६५/२०२१, दिनांक २८.०७.२०२१ चे अभिमत.

५) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१२/जमीन/ FRA-१०/प्र.क्र.२००८-०९/३५८, दिनांक १०.०१.२०२२.

६) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१२/ जमीन/FRA-११/प्र.क्र.०१/२०२१-२२/१३६, दिनांक २२.०७.२०२२.

**परिपत्रक-**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३(१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर अधिनियमाच्या नियम २००८ आणि सुधारीत नियम, २०१२ च्या नियम १६ अन्वये आदिवासींना वनहक्क मान्य करण्यात आलेल्या पट्ट्यांमध्ये शासनाच्या सर्व योजना, शेतीचा विकास, आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी व शेतीची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असणारे संसाधन निर्माण करणे इत्यादी हक्क कायद्यानुसार प्रदान करण्यात आले आहेत.

२. पात्र वनपट्टेधारकांना पिण्याच्या उद्देशाने किंवा शेतीपूरक कामांसाठी खात्रीशीर आणि कायमस्वरूपी पाण्याच्या स्त्रोताची आवश्यकता आहे. पाण्याच्या स्त्रोताच्या उपलब्धतेमुळे कायदेशीर शेतीपुरक कामे करणे वनपट्टेधारकांना सुलभ होणार आहे. यास्तव, पाण्याचा स्त्रोत निर्माण करण्याच्या हेतूने वनपट्टेधारकांना त्यांच्या मंजूर वनपट्टयामध्ये राज्याच्या भूजल धोरणाच्या अधीन राहून शासकीय योजनांतील विहिरींच्या निकषांनुसार विहिर बांधणे अनुज्ञेय राहील.

३.  सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०६२०१८२०४७५८१९ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

APARNA SUHAS UPASANI

(अपर्णा उपासनी)
कार्यासन अधिकारी
महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री, (वने) यांचे खाजगी सचिव
५. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधान भवन, मुंबई.
७. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
११.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२.सर्व विभागीय आयुक्त.
१३.सर्व मुख्य वनसंरक्षक
१४.सर्व जिल्हाधिकारी
१५. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
१६. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१७. निवडनस्ती.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता ) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम, २०१२ अंतर्गत राज्यातील वनहक्क धारकांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देणेबाबत.

## महाराष्ट्र शासन

### आदिवासी विकास विभाग

**शासन निर्णय क्रमांकः वहका -२०२३/प्र.क्र.२१८/का-१४**

आदिवासी विकास विभाग, मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि.१३ मार्च,२०२४

**वाचा:**

१. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारित नियम २०१२.
२. जनजाती कार्य मंत्रालय यांचे दि.१५/१/२०१९ रोजीचे पत्र
३. आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र.वहका-२०२१/प्र.क्र.१८७/का-१४,दि.१२/९/२०२२
४. जनजाती सल्लागार परिषद दि.११/१०/२०२३ रोजी पार पडलेली बैठक.
५. मा.मंत्रिमंडळाची दि.११/०३/२०२४ रोजी पार पडलेली बैठक.

**प्रस्तावना -**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ दि.३१.१२.२००७ पासून राज्यात लागू करण्यात आला असून सदर कायद्याची अंमलबजावणी दि.०१.०१.२००८ पासून राज्यात करण्यात येत आहे. सदर अधिनियमाच्या कलम ३ (१) अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर अधिनियमाच्या नियम १६ अनुसार व वनहक्क धारकांना सर्व योजनांची लाभ देण्याची तरतूद असतांना देखील वनहक्क धारकांना विविध विभागाच्या शासकीय योजनांचा लाभ देतांना भारतीय वन अधिनियमांतील तरतूदींची अडचण येत असल्याने वन विभागाकडून त्यास प्रतिबंध करण्यात येतो. त्यामुळे वनहक्क धारकांना विविध योजनांचा लाभ देण्यासाठी लोकप्रतिनिधी,विविध संघटना यांचेकडून वारंवार मागणी करण्यात येते. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता ) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम, २०१२ मधील नियम १६ अन्वये वनहक्क दावे मंजूरीनंतर वनहक्क धारकांना सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्याची तरतूद असून ओरिसा राज्यात सर्व शासकीय योजनांचा लाभ वनहक्क धारकांना देण्यात येत असल्याने याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर करण्याबाबत दि.११/१०/२०२३ रोजी पार पडलेल्या जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकित निर्देश देण्यात आले होते. त्यास अनूसरून वनहक्क धारकांना सर्व शासकीय योजनांचा लाभ अनूज्ञेय करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय -**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता ) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारीत नियम, २०१२ मधील नियम १६ अनुसार राज्यातील वनहक्क धारकांना सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा. वनहक्क धारकांना **सोबत जोडलेल्या विवरणपत्रा मध्ये नमूद केलेल्या सर्व शासकीय योजनां व कामांचा लाभ देण्यात यावा. तसेच सोबत जोडलेल्या विवरणापत्रा व्यतिरिक्त अन्य अनुज्ञेय अशा सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा** वनहक्क धारकांना योजना/कामे यांचा लाभ देतांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. वनहक्क धारकांमध्ये ते ज्या शासकीय योजनांच्या लाभास पात्र आहेत त्याबाबत जनजागृती करण्यात यावी .
२. ज्या योजनांचे लाभ वनहक्कधारकांना त्यांच्या मागणीनुसार वैयक्तिक रित्या देणे शक्य आहे,अशा योजनांचा लाभ विनाविलंब वनहक्क धारकांना देण्यात यावा.
३. सामुहिकरित्या शासकीय योजनांचे लाभ वनहक्क धारकांना मिळण्याच्या दृष्टीने वनपट्टे दिलेल्या वनहक्क धारकांचे क्षेत्रनिहाय समूह (Cluster) तयार करण्यात यावेत.
४. क्षेत्रनिहाय समूह तयार केल्यावर वनहक्क धारकांच्या मागणीनुसार ज्या योजनांचा लाभ एकत्रितरित्या वनहक्क धारकांना देणे शक्य आहे, त्याबाबत कालबद्ध आराखडा तयार करून विविध शासकीय योजनांचे लाभ अभिसरणाच्या माध्यमातून वनहक्क धारकांना देण्यात यावेत.
५. उपरोक्त नमूद सामुहिकरित्या शासकीय योजनांचे लाभ देण्याच्या अनुषंगाने कालबद्ध आराखडा तयार करण्याची कार्यवाही आदिवासी विकास विभागाच्या वाचा येथील अनु.क्र.३ मधील दि.१२/९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सामुहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या तालुका स्तरीय कन्व्हर्जन्स समितीने करावी.
६. सदर आराखड्यास मान्यता देण्याची कार्यवाही आदिवासी विकास विभागाच्या वाचा येथील अनु.क्र.३ मधील दि.१२/९/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सामुहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीने करावी.
७. वनहक्क धारकांना ज्या शासकीय योजनांचे लाभ देण्यास काही अडचणी उद्भवत असतील,अशा प्रकरणी अडचणींचे निराकरण जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील गठीत केलेल्या जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीने त्वरीत

करुन अशा योजनांचे लाभ वनहक्क धारकांना मिळतील याची खातरजमा करावी.

**सदर शासन निर्णय हा दि.११/३/२०२४ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२४०३१४१०४८४९१०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SATISH VITHALRAO KOVE

Digitally signed by SATISH VITHALRAO KOVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=e13b027a7b550970150cf7dc69d276db3b1a6ebe3f71610fb5e8ff55b1676c8a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=CE18732734BA0742D7712775E8F0AD400558E8748375399762FD447C3E9AC1EB, cn=SATISH VITHALRAO KOVE
Date: 2024.03.14 11:03:43 +05'30'

**(सतीश वि.कोवे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई.
२. मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
**१३.६** महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजीच्या ओनर्स प्लॉटच्या संख्येनुसार "**परिशिष्ट-अ**" प्रमाणे तिन्ही हंगामात मिळून रु.८१,८३,९६,२५०/- (अक्षरी रुपये एक्याऐंशी कोटी त्र्याऐंशी लाख शह्याण्णव हजार दोनशे पन्नास) इतका खर्च दरवर्षी अपेक्षित आहे. सदर खर्चाच्या ६० टक्के निधी केंद्र शासन डिजिटल ॲग्रिकल्चर मिशन योजनेतून उपलब्ध करुन देणार आहे. उर्वरीत ४० टक्के हिस्सा राज्य शासनाचा राहील. सदरचा निधी कृषि विभागाने जमाबंदी आयुक्त यांना दरवर्षी उपलब्ध करुन द्यावा. तसेच, प्रशिक्षण, प्रचार-प्रसिद्धी, कार्यालयीन खर्च, संगणक प्रणाली विकसन व अनुषंगिक खर्च आणि भविष्यात ओनर्स प्लॉटच्या संख्येत वाढीमुळे होणारी खर्चात वाढ इत्यादी खर्चास मान्यता देण्याचे अधिकार सुकाणू समितीस राहील.

**१४. भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे** (Geo- Referenced Land Parcel Cadastral Map) **यांचा माहिती संचः-**

महाराष्ट्र राज्यामध्ये भूसंदर्भाकीत भूभाग असणारे गाव नकाशे हे सर्वे क्रमांकांच्या माहितीसह उपलब्ध आहेत. सदर भूसंदर्भाकीत गाव नकाशे सद्यस्थितीत पिकपहाणीसाठी वापरण्यात येतात. 'ई मोजणी २.०' या नवीन मोजणीच्या Software प्रणालीचा वापर करुन जे भूभाग नव्याने मोजण्यात येतील त्यांचे भूसंदर्भ देखील या गाव नकाशांमध्ये समाविष्ट करण्याचे कामकाज महसूल व वन विभागाने करावे. यासाठी वेगळ्या खर्चाची आवश्यकता नाही.

१५. सदर योजनेंतर्गत Data Creation च्या अनुषंगाने आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सूचना महसूल व वन विभागाने निर्गमित कराव्यात. तसेच Data Usage च्या अनुषंगाने आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शासन मान्यतेने निर्गमित कराव्यात.

१६. शेतकरी माहिती संच, माहिती निर्मिती कक्ष व माहिती वापर कक्ष यासाठी आवश्यक मनुष्यबळ व त्यांचे मानधन, कार्यालयीन खर्च, प्रशिक्षण, प्रचार-प्रसिद्धी, संगणक प्रणाली विकसन, क्लाऊड सेवा, योजना मोहिम स्वरुपात राबविणे इत्यादी बाबींसाठी आवश्यक निधी सुकाणू समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात येईल. यासाठी आवश्यक निधी केंद्र शासनाच्या

PM-KISAN योजनेच्या Administrative Fund मधून जमाबंदी आयुक्त व आयुक्त, कृषि यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

१७. ॲग्रिस्टॅक (डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर फॉर ॲग्रीकल्चर) या योजनेचे महत्व व उपयुक्तता लक्षात घेऊन उपरोक्त योजना राज्यात निश्चित कालबद्ध पद्धतीने राबविण्यासाठी आणि जिल्ह्यातील विविध विभागातील अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१८. ॲग्रिस्टॅक योजनेसंदर्भात केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देश, मार्गदर्शक सूचना इत्यादीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत महसूल/कृषि विभाग यांच्या स्तरावरुन क्षेत्रिय कार्यालयांना कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत.

१९. ॲग्रिस्टॅक योजनेसाठी कृषि विभाग हा नोडल विभाग असेल. तर जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे हे सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य नोडल अधिकारी असतील.

२०. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४९५/२०२४/कार्यासन १४३१, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३६५/२०२४/व्यय-१, दिनांक ०७.१०.२०२४ अन्वये प्राप्त अभिप्रायांनुसार तसेच मा.मंत्रीमंडळाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

२१. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२४१०१४०८५९४०८००१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUJATA MANOJ SAUNIK

Digitally signed by SUJATA MANOJ SAUNIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=04f6ff0d1ef522f4e19358cfac66e30d146fa47249c32a356455a756d05ec1a9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F49173DCDA3F795FF41A69777F5A6C2DED24F621CD434ABBB169565D1ABDAA1F, cn=SUJATA MANOJ SAUNIK
Date: 2024.10.14 13:50:59 +05'30'

**( सुजाता सौनिक )**

**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

६. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
७. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधीपक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधानमंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद/विधानसभा सदस्य
१०. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक
११. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. संचालक, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, महाराष्ट्र, मुंबई
१३. संचालक लेखा व कोषागारे, मुंबई
१४. सर्व विभागीय आयुक्त
१५. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१६. जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७. अधिदान व लेखा अधिकारी, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई
१८. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
१९. महालेखापाल (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर
२०. सर्व जिल्हाधिकारी
२१. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी
२२. संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. सर्व विभागीय कृषि सह संचालक, महाराष्ट्र राज्य
२५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२६. सर्व तहसिलदार
२७. उप सचिव (सर्व), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२८. अवर सचिव / कक्ष अधिकारी (२-अे, ११-अे, १४-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. निवडनस्ती -१० अे.

******

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१५७/१०-अे, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२४ सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट-अ

| एकूण गावांची संख्या | एकूण ओनर्स प्लॉट संख्या | खरीप | रब्बी | उन्हाळी | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| | | रु. ५ प्रमाणे मानधन (x ५) | रु. ५ प्रमाणे मानधन (x ५) | रु. ५ प्रमाणे मानधन (x ५) | एकूण (x १५) |
| ११,११५ | २५० | १,३८,९३,७५० | १,३८,९३,७५० | १,३८,९३,७५० | ४,१६,७१,२५० |
| १०,४११ | ५०० | २,६०,२७,५०० | २,६०,२७,५०० | २,६०,२७,५०० | ७,८०,८२,५०० |
| १०,४५८ | १,००० | ५,२२,९०,००० | ५,२२,९०,००० | ५,२२,९०,००० | १५,६८,७०,००० |
| ४,७८४ | १,५०० | ३,५८,८०,००० | ३,५८,८०,००० | ३,५८,८०,००० | १०,७६,४०,००० |
| ४,८२० | ३,००० | ७,२३,००,००० | ७,२३,००,००० | ७,२३,००,००० | २१,६९,००,००० |
| १,३९७ | ४,५०० | ३,१४,३२,५०० | ३,१४,३२,५०० | ३,१४,३२,५०० | ९,४२,९७,५०० |
| ५४८ | ६,००० | १,६४,४०,००० | १,६४,४०,००० | १,६४,४०,००० | ४,९३,२०,००० |
| २४४ | ७,५०० | ९१,५०,००० | ९१,५०,००० | ९१,५०,००० | २,७४,५०,००० |
| १२३ | ९,००० | ५५,३५,००० | ५५,३५,००० | ५५,३५,००० | १,६६,०५,००० |
| १९७ | १०,००० | ९८,५०,००० | ९८,५०,००० | ९८,५०,००० | २,९५,५०,००० |
| | | **२७,२७,९८,७५०** | **२७,२७,९८,७५०** | **२७,२७,९८,७५०** | **८१,८३,९६,२५०** |
| | | | | Central Govt. ६०% | **४९,१०,३७,७५०** |
| | | | | State Govt. ४० % | **३२,७३,५८,५००** |

******

**नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग ( महाराष्ट्र समृध्दी महामार्ग )**
**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अंतर्गत मंजूर झालेल्या वन जमिनीचा मोबदला निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वहका-२०१८/अनौस.१३/प्र.क्र. ५७ /का-१४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १३ जून, २०१८

<u>वाचा</u> :- अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२.

<u>प्रस्तावना :-</u>

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे ) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वत:च्या उपजीविकेकरिता शेती कसण्यासाठी वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क; निस्तार सारखे हक्क; गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क; पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्कदार असणे; निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहेत.

२. नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाकरीता ( महाराष्ट्र समृध्दी महामार्ग ) प्रस्तावित वळतीकरण करावयाच्या जमिनींमध्ये खाजगी जमीन तसेच राखीव व संरक्षित वन जमिनीव्यतिरीक्त उक्त अधिनियमान्वये प्राप्त झालेल्या वनपट्ट्यांचाही समावेश होत आहे. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ च्या तरतूदीअन्वये मंजूर झालेल्या वनजमीनीचे क्षेत्र एखाद्या सार्वजनिक प्रकल्पाने बाधीत झाले तर, अशा वनहक्कधारकास कोणत्या दराने मोबदला दिला जावा, याबाबत सदर अधिनियमामध्ये कोणतीही तरतूद समाविष्ट केलेली नाही. त्यामुळे नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग ( महाराष्ट्र समृध्दी महामार्ग ) या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या वनहक्कधारकांना मोबदला देण्याच्या अनुषंगाने समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार, नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग ( महाराष्ट्र समृध्दी महामार्ग ) या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या वनहक्कधारकांना मोबदला देण्याच्या अनुषंगाने प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखालील पुढीलप्रमाणे समिती स्थापन करण्यांत येत असून सदर समितीची संरचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २ | सह सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सह अध्यक्ष |
| ३ | डॉ. निरज हातेकर, संचालक ,मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था ,मुंबई, | सदस्य |
| ४ | श्री. शेखर गायकवाड, संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे | सदस्य |
| ४ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे | सदस्य |
| ५ | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पूणे | सदस्य सचिव |

२. उक्त समिती अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ मधील तरतूद विचारात घेऊन नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग ( महाराष्ट्र समृध्दी महामार्ग ) या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या वनहक्कधारकांना मोबदला देण्यासंदर्भातील अहवाल दिनांक १५ जुलै, २०१८ पर्यंत शासनास सादर करील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०६१३१४५६५५९२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pandurang Mahadu Raut

Digitally signed by Pandurang Mahadu Raut
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Tribal Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=136cc102e03660c61e3577e800c6edb8125d21d6c9d7742a980d024e919fa85c, cn=Pandurang Mahadu Raut
Date: 2018.06.13 14:59:21 +05'30'

**( पांडुरंग म. राऊत )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४ प्रधान सचिव ( महसूल ) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५ प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव ( मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. सचिव ( वने ) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
११. प्रधान मुख्य वन संरक्षक ( वन बल प्रमुख ) महाराष्ट्र राज्य, नागपूर
१२. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे
१३. सर्व विभागीय आयुक्त,
१४. श्री. शेखर गायकवाड, संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१५. डॉ. निरज हातेकर, संचालक ,मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था ,मुंबई,
१६. सर्व जिल्हाधिकारी.
१७. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर,अमरावती,
१६. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१७. निवड नस्ती.(का.१४) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम, २००६ अंतर्गत प्राप्त वैयक्तिक वन हक्क पट्टेधारकांना भूमिसंपादन अधिनियम, २०१३ मधील तरतूदींनुसार जमिन संपादित करताना भूसंपादन अधिनियमान्वये देण्यात येणारी नुकसान भरपाईची रक्कम व अन्य पुनर्वसन व पुनर्वसाहत विषयक लाभ निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग,**

**शासन परिपत्रक, क्र.वजधो-२०२२/प्र.क्र.८६/अ-२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक:- २६.०९.२०२३

**वाचा:-** १. शासन पत्र समक्रमांक दि.८.०३.२०२३

२. शासन निर्णय क्रं.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.०८/ज-१अ, दि.२४.०३.२०२३

**प्रस्तावना :-**

अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी यांना "अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६" या अधिनियमाखाली वनपट्टे देण्यात आलेले आहेत. तथापि, राज्यात विविध सार्वजनिक प्रकल्पांसाठी अशा वनपट्टेधारकांकडील जमीन भूसंपादित होत असतांना त्यांना द्यावयाच्या नुकसानभरपाई संदर्भात यापुर्वी शासनाकडे विचारणा करण्यात आली होती. त्यावेळी संदर्भाधीन क्र.१ येथे नमुद शासन पत्र दि.८.०३.२०२३ अन्वये "अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत प्राप्त वैयक्तिक वनहक्क धारक यांना भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम-३ (C) नुसार भूधारक ठरत आहेत. त्यामुळे भूधारक म्हणून अनुज्ञेय असणारे सर्व लाभाकरीता ते पात्र ठरत आहेत." असे धोरणात्मक दिशानिर्देश देण्यात आले आहेत.

०२. दरम्यानच्या कालावधीत, "अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक व वन निवासी (वनहक्काची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम- २०१२ च्या राज्यातील अंमलबजावणीच्या" अनुषंगाने शासन निर्णय दि.२४.०३.२०२३ अन्वये गठीत मा.मंत्री, महसूल यांच्या अध्यक्षतेखालील

अभ्यास समितीची दि.१६.०५.२०२३ रोजीच्या बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये वन पट्टेधारकांना भूसंपादनाचा मोबदला/नुकसान भरपाईची रक्कम देताना अडचणी येत असल्याबाबतची चर्चा झाली. सदर बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने मा. मंत्री (महसूल) यांनी दिलेल्या निर्देशाबाबत या बैठकीचे इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे. सदर इतिवृत्तामध्ये विषयाधीन मुद्यांसंदर्भात पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत:-

"सदर शासन पत्र दि.८.०३.२०२३ च्या अनुषंगाने पुढील सविस्तर मार्गदर्शक सूचना (जसे की, मोबदला कसा व किती द्यावा वगैरे) महसूल व वन विभागाने निर्गमित कराव्यात" असे निर्देशित करण्यात आले. त्यानुषंगाने, सर्वंकष विचारविनिमय करुन उपरोक्त विषयासंदर्भात क्षेत्रीय महसूली अधिकारी व प्राधिकारी यांना वैयक्तिक वनहक्क धारक यांनी धारण केलेल्या वनपट्ट्यांच्या जमिनी संपादित करताना देय होणाऱ्या नुकसान भरपाई संदर्भात दिशा निर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :-</u>**

राज्यातील विविध प्रकल्पाकरीता भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये वनहक्क धारकांच्या, वनपट्टयांच्या जमिनी संपादित करताना, त्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाई व अन्य देय लाभ यासंदर्भात सर्व संबंधित क्षेत्रीय महसूली अधिकारी, प्राधिकारी यांना याव्दारे पुढीलप्रमाणे दिशा निर्देश देण्यात येत आहेत:-

१. अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत प्राप्त वैयक्तिक वनहक्क धारक यांना भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम-३ (C) नुसार "भूधारक" ठरत आहेत. त्यामुळे "भूधारक" म्हणून अनुज्ञेय असणारे सर्व लाभाकरीता ते पात्र ठरत आहेत.

२. ज्याअर्थी, भूसंपादन अधिनियमानुसार भूधारकास त्याच्या संपादित होणाऱ्या जमीनीपोटी मिळणारी नुकसानभरपाईची रक्कम तसेच अन्य पुनर्वसन विषयक व पुर्नवसाहत विषयक लाभ अनुज्ञेय ठरतात. आणि ज्याअर्थी, वैयक्तिक वनहक्क धारक यांना भूधारक म्हणून मान्यता देण्याबाबत शासनाकडून स्पष्टता करण्यात आली आहे. त्याअर्थी, वैयक्तिक वनहक्क धारकांनी अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक व वन निवासी (वन हक्क मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत धारण केलेल्या जमिनी भूसंपादन अधिनियमान्वये संपादित करताना भूसंपादन अधिनियमान्वये देण्यात येणारी नुकसान भरपाईची रक्कम व अन्य पुनर्वसन व पुनर्वसाहत विषयक लाभ देण्यात यावेत.

०२. सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

०३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्र २०२३०९२६१७४९०६६७१९ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

MANIK VITTHAL DHAMALE

Digitally signed by MANIK VITTHAL DHAMALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=56ec16312a634dd1d6237d2d17aa0f5fb47d9a2353765a9688e57f460b5271d9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D2C09929ACAFC324A4E5E44875953A3AEF77C004844BEE29381808FC25AAC97F, cn=MANIK VITTHAL DHAMALE
Date: 2023.09.26 17:52:08 +05'30'

**( माणिक ढमाले )**
**कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह व जलसंपदा) यांचे सचिव उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई
४. मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई
५. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१०.अ.मु.स. (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.प्रधान सचिव (वने, भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१६.उप सचिव (भूसंपादन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१७.व्यवस्थापकीय संचालक सिडको, सिडकोभवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मंबई
१८. मा.महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
१९.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई
२०.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
२१.सर्व विभागीय आयुक्त
२२.सर्व जिल्हाधिकारी

२३.प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र,भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई.

२५. प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर प्रादेशिक कार्यालय, नागपूर-४४००३३

२६.महाव्यवस्थापक (भूमि व सर्वेक्षण), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या.,मुंबई

२७.संचालक, नगर रचना, पुणे

२८.सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा)

२९.निवडनस्ती (अ-२)

अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत सामुहिक वनहक्क (CFR) क्षेत्रांवर जमीन संपादन प्रकरणी जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतूदी विचारात घेऊन सामुहिक वनहक्क स्थानांतरणाची कार्यपद्धती निश्चित करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :वहका-२०२४/प्र.क्र.१०५ (E-१३१६५४४)/का-१४**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक: २८ नोव्हेंबर, २०२५**

**वाचा-**

१) अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वनवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६,नियम,२००८ व सुधारित नियम,२०१२.
२) जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३
३) मा.महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग प्र.क्र.४४०६/१३/०३/२०२४
४) मुख्य सचिव यांचेकडील दि.१०/१०/२०२५ रोजी आयोजित बैठकिचे दि.०३/११/२०२५ रोजी निर्गमित केलेले इतिवृत्त

**प्रस्तावना :-**

मा.महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांच्याकडे अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागातील सामूहिक वनहक्क प्राप्त गावे अतिसंवेदनशिल वन्यजीव अधिवास क्षेत्रात येत असल्याने सदर गावांचे पुनर्वसन करणे व त्या गावांना मोबदला देणे याबाबत प्रकरण क्र.४४०६/१३/०३/२०२४ दाखल आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे झालेल्या सुनावणी दरम्यान सामुहिक वनहक्क जमीन संपादन प्रकरणी धोरण निश्चिती संदर्भात विचारणा करण्यात आली, त्यास अनुसरुन संपादित होणा-या सामुहिक वनहक्क (CFR) क्षेत्रातील गावांना योग्य भूसंपादन मोबदला, त्यांचे पुनर्वसन व पुनर्वसिती करण्यासाठी धोरण ठरविण्याच्या अनुषंगाने विविध विभागांशी चर्चा करण्यासाठी मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि.१०.१०.२०२५ रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

(१) "भूमी संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" मधील तरतुदीनुसार सामुहिक वनहक्क क्षेत्राबाबत पुनर्वसनाचे लाभ देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने नियमाचे प्रारूप तयार करून ते वन विभागाकडील भुसंपादन शाखेकडे अभिप्रायार्थ पाठवावे.

(२) "भूमी संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३" च्या तरतूदी महाराष्ट्रातील ज्या कायद्यांना लागू नाहीत, त्यांचेबाबत संबंधित विभागाकडे सदर कायद्यांमध्ये सामुहिक वनहक्क क्षेत्राच्या पुनर्वसनाबाबत संबंधित विभागाने प्रावधान करण्याबाबत आदिवासी विकास विभागामार्फत संबंधित विभागांना कळविण्यात यावे.

२. अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी समुदायांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांचे जीवनमान सुधारणा, तसेच वनक्षेत्रातील विकास, संवर्धन व व्यवस्थापन यांना एकत्रितपणे पुढे नेणे हे शासनाचे धोरणात्मक उद्दिष्ट आहे. अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ अंतर्गत ग्रामसभांना सामुहिक वनसंपत्तीवरील हक्क मान्य केले गेले आहेत. हे हक्क केवळ भौतिक संसाधनांवरील प्रवेशापुरते मर्यादित नसून, कायमस्वरूपी व परंपरागत वापर, संरक्षण, संवर्धन, व्यवस्थापन, आणि नैसर्गिक संसाधनांवर आधारित उपजीविका या संपूर्ण अधिकार साखळीशी निगडित आहेत.

राज्यातील काही क्षेत्रांमध्ये वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत अभयारण्य, राष्ट्रीय उद्याने, टायगर रिझर्व इत्यादी संवेदनशील क्षेत्रांची नोंद आहे. अशा क्षेत्रांमध्ये पर्यावरणीय संतुलन, जैवविविधता संरक्षण व वन्यजीव संरक्षण ही अत्यंत आवश्यक बाब आहे. त्याच वेळी स्थानिक आदिवासी व वननिवासी समुदायांचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि उपजीविकेवर आधारित हक्क देखील कायद्याद्वारे मान्य करण्यात आले आहेत. या दोन्ही संविधानिक व कायदेशीर दायित्वांचा समतोल राखत उपाययोजना करणे आवश्यक आहे.

तसेच राज्यातील काही भागांमध्ये राष्ट्रीय/राज्यस्तरावरील विकास प्रकल्पांची अंमलबजावणी आवश्यक असते. अशा प्रकल्पांसाठी सामुहिक वनहक्क प्राप्त जमीन आधिग्रहण केली जात असतांना, संबंधित हक्कग्रस्त समुदायांवर उपजीविका, सामाजिक रचना, सांस्कृतिक वारसा व पर्यावरणीय संतुलन यांचा परिणाम होऊ शकतो. या परिस्थितीत जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदींनुसार सुसंगत नुकसानभरपाई, पुनर्वसन, पुनर्स्थापना, लाभवाटप, सहभाग,आणि दीर्घकालीन उदरनिर्वाह सुरक्षा सुनिश्चित करणे गरजेचे आहे.

उपरोक्त पार्श्वभूमीवर जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतुदी व अनुसूचित जमाती आणि इतर

पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२ मधील तरतुदी विचारात घेऊन मान्य असलेल्या अथवा मान्यतेच्या प्रक्रियेत असलेल्या सामुहिक वनहक्क दाव्यांच्या प्रकरणी सामुहिक वनहक्कांच्या अधिकारांचे स्थानांतरणासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ मधील कलम ४(२) अनुसार , जोपर्यंत हक्कांची मान्यता व हस्तांतरण पूर्ण होत नाही, ग्रामसभेची स्वतंत्र, पूर्वसूचित आणि सुस्पष्ट संमती (Free, Prior and Informed Consent - FPIC) मिळत नाही, सह-अस्तित्व वैज्ञानिकदृष्ट्या अशक्य असल्याचे सिद्ध होत नाही, आणि पुनर्वसन स्वेच्छेने व उपजीविकेच्या संरक्षणासह होत नाही – तोपर्यंत कोणत्याही अधिकार धारकांचे वन्यजीव अधिवासांमधून (Critical Wildlife Habitats - CWHs) स्थलांतर करता येणार नाही.

२. तसेच, जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम ४२ मध्ये खालील प्रमाणे तरतुदी आहेत.

*(१) प्रभावित क्षेत्रांतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना उपलब्ध असलेले सर्व लाभ, त्यामध्ये आरक्षणाचे लाभही समाविष्ट असून, ते पुनर्वसन क्षेत्रातही कायम राहतील.*

*(२) जेव्हा अनुसूचित जमातींच्या प्रभावित कुटुंबांचे पुनर्वसन पाचवी अनुसूची मधील अनुसूचित क्षेत्रे किंवा सहावी अनुसूची मधील आदिवासी क्षेत्रांमधून बाहेरील भागात पुनर्वसन केले जाते, तेव्हा या कायद्यांतर्गत त्यांना मिळणाऱ्या सर्व वैधानिक संरक्षणांची, हक्कांची आणि लाभांची अंमलबजावणी पुनर्वसन क्षेत्रातही केली जाईल. हे पुनर्वसन क्षेत्र पाचवी अनुसूची मधील अनुसूचित क्षेत्र किंवा सहावी अनुसूची मधील आदिवासी क्षेत्र नसले तरीही ही तरतूद लागू राहील.*

*(३) अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वनवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ (२००७ चा क्र. २) अंतर्गत समुहिक हक्क निश्चित झाले असल्यास, जमिनीच्या संपादनामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तीस त्या समुहिक हक्कांतील त्यांच्या वाट्याच्या प्रमाणात, त्याची किंमत आर्थिक स्वरूपात देण्यात येईल."*

३. उपरोक्त कायद्याच्या विविध कलमांच्या आधाराने, जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ४२ (१), ४२ (२) व ४२ (३) मधील तरतुदीनुसार केवळ शेवटचा पर्याय म्हणून अनुसूचित क्षेत्रातील जमीन संपादन करण्यात यावी.

४. जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ लागू असलेल्या प्रकरणी वन्यजीव संवर्धन उपाययोजना अथवा विविध राष्ट्रीय/ राज्यस्तरीय विकास प्रकल्पांकरिता संपादित करण्यात येणाऱ्या ग्रामसभा मान्य असलेल्या अथवा मान्यतेच्या प्रक्रियेत असलेल्या सामुहिक वनहक्क क्षेत्राच्या प्रकरणी भरपाई, पुनर्वसन, उपजीविका संरक्षण व संवर्धन व्यवस्थापनासाठी जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ कायद्यातील कलम ४२ (१), ४२ (२) व ४२ (३) मधील तरतुदी विचारात घेऊन सामुहिक वनहक्क क्षेत्र आधिग्रहण करणे क्रमप्राप्त असल्यास प्रथम तेथील सामुहिक वनहक्क प्रस्थापित झालेले असल्याची खात्री करण्यात यावी. त्यानंतर सामुहिक वनहक्क स्थानांतरणाबाबत खालील प्रमाणे कार्यपद्धती अवलंबविण्यात यावी.

**(अ) पर्याय १: Land for Land (जमिनीच्या बदल्यात जमीन)**

१. सामुहिक वनहक्क क्षेत्रातील वन जमीन आधिग्रहण केल्यानंतर सामुहिक वनहक्कांच्या मिळणा-या लाभाच्या समप्रमाणात पर्यायी वनजमीन संबंधित ग्रामसभा/समुदायास देण्यात यावी.
२. नव्याने देण्यात आलेल्या पर्यायी वन जमिनीवर वनहक्क कायद्यांतर्गत मान्य करण्यात आलेले सर्व हक्क/ अधिकार अबाधित ठेवण्यात यावेत.
३. समुदायास वनहक्क कायद्यानुसार पूर्वी प्रदान केलेले सर्व हक्क/ अधिकार, जसे की गौण वनोपज संकलन व व्यवस्थापन, चराई हक्क, तलावातील मासेमारी, मौसमी साधनसंपत्तीचे उपयोजन तसेच इतर पारंपरिक हक्क नव्याने प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे क्रमप्राप्त आहे व त्यासाठी काही कालावधी लगण्याची शक्यता नाकारता येत नाही, ही बाब विचारात घेता अशा आवश्यक उपाययोजना करण्यासाठी किमान पाच वर्षांचा आर्थिक सहाय्य कालावधी निश्चित केला जावा व त्याप्रमाणे आर्थिक सहाय्य रकमेची तरतूद संबधित अधिग्रहण यंत्रणेद्वारे करण्यात यावी.

**(ब) पर्याय २: Land for Land + Monetary Value (जमिनीच्या बदल्यात जमीन + आर्थिक मोबदला)**

१. जेथे पर्यायी वन जमिन ही, अधिग्रहित करण्यात येणाऱ्या सामुहिक वनहक्क क्षेत्रापासून मिळणा-या लाभापेक्षा कमी प्रमाणात लाभ देत असेल अशा प्रकरणी पर्यायी वन जमिनीवर वरील पर्याय **(अ)** मध्ये नमूद २ व ३ नुसार कार्यपद्धती अवलंबविण्यात यावी.
२. अधिग्रहित सामुहिक वनहक्क क्षेत्रातील जमीन अधिग्रहणामुळे वनहक्क कायद्यानुसार वरीलप्रमाणे पर्यायी वन जमिन/हक्क प्रदान करतांना होणा-या नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून, त्या नुकसानाची भरपाई संबधित ग्रामसभेला योग्य आर्थिक मोबदला देऊन करण्यात यावी.

**(क) पर्याय ३: Land for Monetary Value (जमिनीच्या बदल्यात आर्थिक भरपाई)**

१. जेथे पर्यायी वन जमिन बाधित सामुहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभेस देता येणार नाही अशाप्रकरणी; जमीन संपादन प्रक्रियेमुळे समुदायाचे वनहक्क कायद्यानुसार प्रदान असलेले गौण वनोपज संकलन व व्यवस्थापन, चराई हक्क, तलावातील मासेमारी, मौसमी साधनसंपत्ती तसेच इतर सामुहिक हक्क/अधिकार यांचे होणारे नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करण्यात यावे. जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम ४२(३) नुसार, अशा होणा-या नुकसानीची विस्थापित व्यक्तीस त्यांच्या पूर्वीच्या सामुहिक हक्कातील प्रत्यक्ष वाट्याच्या प्रमाणात योग्य आर्थिक भरपाई देण्यात यावी.

**(ड)** वर नमूद भरपाई रक्कम व अनुषंगिक आर्थिक सहाय्य रक्कम देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जमीन अधिग्रहण (जमीन संपादन) यंत्रणेची राहील.

**(इ)** जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील कलम १०५ व १०५ A अन्वये ज्या प्रकरणी सदर कायद्याच्या तरतुदी लागू नाही, अशा प्रकरणी संबंधित विभागांनी सामुहिक वनहक्क जमिन अधिग्रहण करतांना वनहक्क कायद्यातील तरतुदी विचारात घेऊन मान्य असलेल्या अथवा मान्यतेच्या प्रक्रियेत असलेल्या सामुहिक वनहक्क स्थानांतरणाची कार्यपद्धती ठरविण्याबाब योग्य त्या तरतूदी कराव्यात.

**(ई)** सामुहिक वनहक्क स्थानांतरणाच्या अनुषंगाने वर नमूद सगळ्या बाबींची अंमलबजवणी तसेच वाजवी नुकसान भरपाई संदर्भात नमूद सर्व प्रक्रिया संबधित जिल्हाधिकारी यांचे मार्फत पार पाडल्या जातील.

**५.** सदर शासन निर्णय हा वने व भूसंपादन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक२०२५११२८१६५२३३२९२४ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY BALKRISHNA WAGHMARE

Digitally signed by VIJAY BALKRISHNA WAGHMARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=f732949950f551f77488d97adf63b1be835f3a8db6f43554c249546fe680b629, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=46023E62FC39A04680C22E8800D4B44643940A8C497578686120DE5067362274, cn=VIJAY BALKRISHNA WAGHMARE
Date: 2025.11.28 16:54:50 +05'30'

**(विजय वाघमारे)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन,मुंबई

२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई

३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
८) मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
९) मा. मंत्री , आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
१०) मा. मंत्री ( सर्व ) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
११) मा.राज्यमंत्री,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
१२) मा.राज्यमंत्री (सर्व) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१३) मा. संसद सदस्य ( सर्व )
१४) मा. विधिमंडळ सदस्य ( सर्व )
१५) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१६) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१७) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१८) सर्व विभागीय आयुक्त
१९) आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक
२०) आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण,संस्था,पुणे.
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) मुख्य वनसंरक्षक,मंडळ सर्व
२३) अपर आयुक्त, आदिवासी विकास , ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती
२४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२५) उप वनंसरक्षक सर्व
२६) संचालक,राज्य पेसा कक्ष ,पुणे.
२७) सर्व उपविभागीय अधिकारी
२८) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
२९) सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
३०) निवड नस्ती.(का.१४) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई-३२

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ मधील नियम ४ (१) (ङ) अन्वये सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती (CFRMC) गठीत करणे व चालविण्याकरिता मार्गदर्शक तत्वे तयार करणे.....**

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः वहका-२०१४/प्र.क्र.६६/का-१४**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक:- २४ जून, २०१५.

<u>वाचा-</u>

१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८, सुधारित नियम २०१२.

<u>प्रस्तावना -</u>

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६, नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोन्हींचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत.

यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना **वैयक्तिक वनहक्क** अंतर्गत स्वत:च्या उपजीविकेकरिता वनजमिनी धारण करणेचा, त्यामध्ये राहणेचा व **सामूहिक वनहक्कांतर्गत** निस्तार सारखे हक्क, गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क, पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविणे, इत्यादी हक्क आहेत.

अधिनियम २००६ मधील कलम ३ (१) (झ) अन्वये निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुर्ननिर्माण, संवर्धन, विनियमन व व्यवस्थापन करण्याचा हक्क, कलम ३ (१) (ट) अन्वये जैविक विविधतेत प्रवेश, बौध्दीक मालमत्ता व पारंपारिक ज्ञान मिळविण्याचा सामुहिक हक्क व कलम ५ च्या तरतूदींनुसार वन्य जीवन, वन जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी, सामाजिक वनाचे स्त्रोत मिळविण्याच्या मार्गाचे विनियमन करणे यासाठी ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयाचे अनुपालन केले जात असल्याची खात्री करणे इत्यादी बाबींच्या अंमलबजावणीसाठी वनहक्क कायद्यातील

तरतुदींनुसार समिती स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यास अनुसरुन पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

**नियम ४ (१) (ङ) अन्वये सामूहिक वनहक्क समितीची स्थापना (CFRMC)**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६, नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ मधील कलम ३ (१) (झ) नुसार निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरित्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्रोताचे संरक्षण, पुर्ननिर्माण, संवर्धन किंवा व्यवस्थापन करणे, कलम ५ नुसार वन्य जीवन, वन व जैविक विविधता यांचे संरक्षण करण्यासाठी व नियम ४ (१) (च) च्या तरतूदींनुसार कर्तव्ये पार पाडण्यासाठी ग्रामसभा तिच्या सदस्यांमधून नियम ४ (१) (ङ) अन्वये एक समिती गठीत करील. संबंधित ग्रामसभेंतर्गत नियम ४ (१) (ङ ) नुसार स्थापन केलेल्या समितीला **"सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती" (CFRMC)** असे संबोधण्यात यावे. सदर समितीचे **संनियंत्रन** व नियंत्रण ग्रामसभा करेल.

ग्रामसभेतील सामूहिक वन संपत्तीचे संवर्धन व व्यवस्थापन योजना तयार करणे, नैसर्गिक साधन संपत्तीच्या व्यवस्थापनातून प्राप्त होणारा महसूल तसेच शासनाकडून प्राप्त होणारा निधी यांचे बँक खात्यामार्फत संनियंत्रण करणे, जमाखर्चाचे लेखे व लेखापरीक्षण ठेवणे इ. प्रशासकीय बाबी पार पाडण्याकरीता सदर समिती ही वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी **ग्रामसभेची कार्यकारी समिती असेल.**

**२. वनहक्क कायद्यातील अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम, २०१२ व जनजाती कार्य मंत्रालय, भारत सरकार, यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती (CFRMC) आपली कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडेल.**

**ग्रामसभेची व्याख्या**

३. या संदर्भात " ग्रामसभा म्हणजे अधिनियम कलम २(छ) व (२) (त) नुसार गावातील सर्व प्रौढ सदस्यांची मिळुन बनलेली ग्रामसभा आणि पंचायत नसलेल्या राज्यांच्या बाबतीत पाडे, टोले, व अन्य पारंपारिक ग्रामसंस्था आणि महिलांचा पुर्ण व अनिर्बंध सहभाग असलेल्या निर्वाचित ग्राम समित्या " असाव्यात.

**४. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीसाठी वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीसाठी सहाय्यकारी मार्गदर्शक सूचना:-**

**समितीसाठी मार्गदर्शक सूचना**

१) सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती ही ग्रामसभेतील वनहक्क धारकांमधून सर्व वनहक्क धारकांचे प्रतिनिधीत्व करणारी समिती असेल. त्यामध्ये किमान ५ व कमाल ११ सदस्य असावेत. बैठकीची गणपुर्ती सर्व सदस्य संख्येच्या अर्ध्यापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्य संख्येने होईल परंतू, उपस्थित सदस्यांच्या किमान एक-तृतियांश इतक्या महिला असतील.

२) सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती त्यांच्या सदस्यांमधून एक अध्यक्ष, एक सचिव व एक खजिनदार यांची बहुमताने निवड करेल, यापैकी एक पदाधिकारी महिला असेल. अध्यक्ष हा अनुसूचित जमातीचा असावा.

३) सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीच्या बैठकीची सूचना अध्यक्ष / सचिव यांचे स्वाक्षरीने निर्गमित करतील.

४) सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीची तातडीची बैठक बोलावयाची झाल्यास गावांमध्ये ड्रम वाजवून / दवंडी अर्धा तास अगोदर देण्यात यावी.

५) सचिव मागील बैठकीत झालेल्या इतिवृत्तास मान्यता घेतील तसेच इतिवृत्तातील मुद्यांवर केलेल्या कार्यवाहीची सदस्यांना माहिती देतील.

**५. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन ( CFRMC ) समितीची कामे:-**

**सामुहिक वन हक्क व्यवस्थापन ( CFRMC ) समितीची कामे**

१) अधिनियम २००६ मधील कलम ५ मध्ये दर्शविलेली कर्तव्ये ग्रामसभेच्या मान्यतेने पार पाडणे.

२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांच्या फायद्यासाठी ग्रामसभेच्या मान्यतेने सामूहिक वन संपत्तीचे निरंतर व समसमान व्यवस्थापन करण्यासाठी नियम ४ (१) (च) मधील तरतूदीनुसार सामूहिक वन संपत्तीचे संवर्धन करण्याची व तिचे व्यवस्थापन करण्याची योजना तयार करेल.

३) वन विभागाच्या सूक्ष्म योजना, चालू योजना ( working plan ) किंवा व्यवस्थापन योजनांबरोबर अशा संवर्धन व व्यवस्थापन योजनांचे, समितीला आवश्यक वाटेल अशा फेरबदलांनिशी एकत्रिकरण करणे.

४) सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या क्षेत्रातील वन व्यवस्थापन, जमिन आणि पाणी यांचा परिणामकारक आराखडा तयार करणे.

५) कायद्याचे उल्लंघन होऊ नये आणि त्याची अंमलबजावणी खात्रीशीर होण्यास ग्रामसभेच्या मान्यतेने आणि वनहक्क कायद्याशी सुसंगत अशी नियमावली करणे.

६) वाहतूक परवाना, उत्पादनांच्या विक्रीपासूनचे उत्पन्न किंवा व्यवस्थापन आराखडयात बदल करण्याशी संबंधित सर्व निर्णयांना मान्यता देणे.

७) केंद्र शासनाने १२ गौणवनोपजाची किमान आधारभूत किंमती (MSP) आधारे खरेदीची यंत्रणा राज्यात स्थापन करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार समितीने वनोपजाची किमान आधारभूत किमंतीपेक्षा कमी दराने विक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी.

८) ग्रामसभेतील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनातून प्राप्त होणारा महसूल तसेच शासनाकडून प्राप्त होणारा निधी याचे बँक खात्यामार्फत संनियंत्रण करणे.

९) वनहक्काशी संबंधित कामे, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणे व त्यास ग्रामसभेची मान्यता घेणे.

१०) ग्रामसभेचे निर्देश व निर्णयानुसार कामे करणे.

११) कामाची प्रगती, निधी व इतर बाबतीत ग्रामसभेला अहवाल सादर करणे.

१२) समितीचे सर्व दप्तर व अनुषंगीक कागदपत्रांचे जतन करणे व जमा खर्चाचे लेखे ठेवणे.

१३) वनहक्क कायदा, शासन निर्णय आणि धोरणाचे वाचन करुन ग्रामसभेस माहिती देणे अथवा प्रशिक्षण देणे.

१४) सामुहिक वन जैविक विविधता यांचे रजिस्टर अद्यावत ठेवणे.

१५) समितीचे लेखे हाताळणे, समितीच्या बँक खात्यातुन ग्रामसभेच्या मान्यतेने ठराव घेऊन निधी काढणे.

१६) समितीने हाती घेतलेल्या व पूर्ण केलेल्या कामांचा तपशिल ग्रामसभेमध्ये बोर्डावर दाखविणे.

१७) समितीने केलेल्या कामांचे फोटोग्राफ व इतर दस्ताऐवज ग्रामसभांमध्ये ठेवणे.

**६. सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती ( CFRMC ) ही वनहक्क कायद्यातील तरतूदींनुसार स्थापन करण्यात आलेली असल्याने सदर समितीची कोणत्याही संस्थेकडे नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा स्तरीय वनहक्क समिती यांनी सर्व बँकांना कोणत्याही अडथळयांशिवाय प्राथम्याने सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीच्या नावे बँक खाते उघडण्याबाबत बँकांना निर्देश द्यावेत.**

**जिल्हाधिकारी यांचे बँकांना निर्देश**

**७.** जिल्हास्तरीय वनहक्क समिती व उपविभागीय स्तरीय समितींनी त्यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत राज्यातील ग्रामसभा अंतर्गत स्थापन झालेल्या १५००२ ग्रामस्तरीय वनहक्क समित्यांच्या क्षेत्रात नियम ४ (१) (ङ) नुसार सदर सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती स्थापन झाल्याबाबतची खात्री करावी. तसेच नियम १२ ख (४) नुसार एखाद्या गावामध्ये कोणत्याही प्रकारचे सामुहिक वनसंसाधनाचे हक्क मान्य करण्यात येणार नाहीत त्यांची कारणे जिल्हा स्तरीय समितीच्या सचिवांकडून नमूद करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल नोडल अधिकारी, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडे पाठवावा.

**जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये**

**८. बँक खाते हाताळणे व वार्षिक लेखापरिक्षण:-**

१) सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समितीचे आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी समितीचे अध्यक्ष, सचिव व खजिनदार ज्यामध्ये एक महिला असावी, त्यांच्या संयुक्त नांवाने बँक खाते उघडण्यात यावे. यापैकी दोन पदाधिका-यांच्या स्वाक्षरीने बँकेचे व्यवहार ग्रामसभेच्या मान्यतेने हाताळण्यात येतील.

**बँक खाते हाताळणे व वार्षिक लेखापरिक्षण**

२) लेखाविषयक पुस्तके, धनादेश व इतर प्रशासकीय कामकाजाची कागदपत्रे ग्रामसभेच्या कार्यालयात ठेवण्यात यावीत. सर्व रक्कमांची प्रदाने समितीने घेतलेल्या ठरावानुसार व केवळ खातेवर (Account Payee) धनादेशाव्दारे करण्यात येतील.

४) संयुक्त खातेधारकांनी किती किरकोळ रक्कम बाळगावी याबाबत ग्रामसभेने नियम ठरवावेत.

५) सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती अंतर्गत होणाऱ्या सर्व व्यवहारांचे लेखे ग्रामसभा स्तरावर ठेवण्यात येतील. समितीच्या लेख्याचे लेखा परीक्षण (ऑडिट) जिल्हा परिषदेच्या स्थानिक लेखा निधीच्या लेखा परीक्षकाकडून होईल.

**समितीच्या बळकटी करणासाठी चालू योजनांचे लाभ**

९. जिल्हा स्तरीय वनहक्क समिती व उपविभागीय वनहक्क समिती यांनी सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीने ग्रामसभेच्या मान्यतेने हाती घेतलेल्या विकास आराखडयातील कामांची अंमलबजावणी करण्यासाठी तसेच त्यांच्या बळकटीकरणासाठी जिल्हयातील वेगवेगळया विभागांच्या विविध चालु योजनांचे लाभ सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समित्यांना देण्यांबाबत कार्यवाही करुन संनियंत्रण करावे.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे या समितीच्या स्थापना व कार्यान्वयासाठी नोडल एजन्सी म्हणून काम पाहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६२५१६५४०३४४२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suresh D Naik

Digitally signed by Suresh D Naik
DN: CN = Suresh D Naik, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Section Officer
Date: 2015.06.25 16:56:13 +05'30'

**( सु. द. नाईक )**
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
२. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

९. प्रधान सचिव (कृषी व पदुम), मंत्रालय, मुंबई.
१०. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१२.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
१३.सर्व जिल्हाधिकारी.
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद.
१५.अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर,अमरावती,
१६. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.नाशिक.
१७. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
१९.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर
२०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
२१. निवासी लेखा अधिकारी, मुंबई
२२.जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
२३.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२४.सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्या.अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२५.निवड नस्ती.(का.१४), आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

**अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८**

सामूहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीची स्थापना करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः वहका-२०१६/प्र.क्र.८२/का-१४**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२**
**दिनांक:- २८ जुलै, २०१६.**

वाचा -

१) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२.

२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. पेसा-२०१५/प्र.क्र.१९/का.१७, दि.२१/०४/२०१५.

३) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: वहका-२०१५/प्र.क्र.११०/का-१४, दि. ६ जानेवारी, २०१६

प्रस्तावना :-

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. यामध्ये अनुसूचित जमाती किंवा इतर पारंपारिक वननिवासी यांना स्वत:च्या उपजीविकेकरिता शेती कसण्यासाठी वनजमिनी धारण करण्याचा व त्यामध्ये राहण्याचा हक्क; निस्तार सारखे हक्क; गावाच्या सीमांतर्गत किंवा सीमेबाहेर पारंपारिकरीत्या गोळा केले जाणारे गौण वनोत्पादन गोळा करणे, त्याचा वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे यासाठी स्वामित्व हक्क; पाण्यामधील मत्स्य व अन्य उत्पादने, चराई करणे, पारंपारिक मोसमी साधनसंपत्ती मिळविण्यास हक्कदार असणे; निरंतर वापर करण्यासाठी पारंपारिकरीत्या संरक्षण व संवर्धन करण्यात आलेल्या कोणत्याही सामाजिक वनस्त्रोताचे संरक्षण, पुनर्निर्माण, संवर्धन, व्यवस्थापन करण्याचे हक्क इ. विविध वनहक्क प्राप्त झाले आहेत.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ व नियम, २००८ तसेच सुधारित नियम, २०१२ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याची विशेषत: या कायद्यांतर्गत कलम ३(१) खाली मंजूर करण्यात येणाऱ्या सामुहिक वनहक्कांचे ( CFR ) नियोजनबध्द पध्दतीने व्यवस्थापन करुन ग्रामसभेचे बळकटीकरण करण्याकरिता अशासकीय संस्थामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पावर संनियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे, योजनेचे मुल्यमापन करणे तसेच योजनेचा नियमित आढावा घेण्याकरिता दिनांक ०५/०३/२०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय सुकाणू समितीची ( State Level Steering Committee ) स्थापन करण्यात आली आहे.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ व नियम, २००८ आणि सुधारित नियम, २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) अन्वये मंजूर सामूहिक वनहक्कांचे UNDP-MOTA पथदर्शी प्रकल्पाच्या धर्तीवर संदर्भ क्र. ३ येथील दिनांक ६ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयातील "परिशिष्ट ब" मध्ये दर्शविलेल्या ठाणे जिल्हयातील १० गावांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे वन निकेतन, ठाणे या स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने तयार करण्याकरिता व "परिशिष्ट क" मध्ये दर्शविलेल्या रायगड जिल्हयातील १० गावांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे साकव पेण प्रकल्प, रायगड या स्वयंसेवी संस्थेच्या सहाय्याने तयार करण्याकरिता संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. आता उक्त ठाणे जिल्हयातील १० व रायगड जिल्हयातील १० गावांमधील व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर कार्यरत असलेल्या वेगवेगळया शासकीय यंत्रणांचे समन्वयन साधून एककेंद्राभिमुखता ( Convergence ) करण्याची गरज असल्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यास अनुसरुन पुढिलप्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहेत :-

**शासन निर्णय:-**

सामूहिक वनहक्क ( सामूहिक वनसंसाधन ) मंजूर करण्यासंदर्भात वनावर उपजिविका अवलंबून असलेल्या ग्रामीण समूहाच्या शाश्वततेकरिता वनांचे व नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण व दिर्घकाळ शाश्वतता राखण्याकरिता परिणामकारक व कार्यक्षक व्यवस्थापनाची पध्दत अवलंबविण्यासाठी वन निकेतन, ठाणे या स्वयंसेवी संस्थेमार्फत हाती घेतलेल्या ठाणे जिल्हयातील १० गावांसाठी व साकव पेण प्रकल्प, रायगड या स्वयंसेवी संस्थेमार्फत हाती घेतलेल्या रायगड जिल्यातील १० गावांसाठी तयार केलेल्या संवर्धन व व्यवस्थापन आराखडयानुसार सामूहिक वनहक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी व घ्यावयाच्या कामांसाठी वन विभाग, कृषि, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, (मनरेगा घटक ) यांच्या सहकार्याने सामूहिक वनहक्कांचे व्यवस्थापन करण्यासाठी क्षेत्रिय स्तरावरील विविध शासकीय यंत्रणांच्या सेवा उपलब्ध करुन देणे तसेच सामूहिक वनहक्कांतर्गत ग्रामसभांकडून हाती घेतलेल्या कामांचे समन्वयन साधण्यासाठी "जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी हे "जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" चे अध्यक्ष असतील व वन विभागाचे उपवन संरक्षक ( DCF) हे सदस्य सचिव असतील. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | : | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हापरिषद, | : | सदस्य |
| ३) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | : | सदस्य |
| ४) जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | : | सदस्य |
| ५) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | : | सदस्य |
| ६) सहाय्यक संचालक,मत्स्यव्यवसाय संचालनालय | : | सदस्य |
| ७) जिल्हयातील संबंधित अशासकीय संस्थेमधील प्रत्येकी एक प्रतिनिधी | | |
| अ) जिल्हा ठाणे - वन निकेतन, ठाणे | : | सदस्य |
| ब) जिल्हा रायगड - साकव पेण प्रकल्प, रायगड | : | सदस्य |
| ८) उप वनसंरक्षक | : | सदस्य सचिव |

समितीच्या कार्यान्वयामध्ये वरीलप्रमाणे अन्य विभागाच्या अधिकाऱ्यांची आवश्यकता असल्यास समिती त्यांना बैठकीसाठी आमंत्रित करु शकेल. तसेच ग्रामसभांचे २ प्रतिनिधी दरवर्षी आळीपाळीने कार्यरत असतील.

"जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" ठाणे व रायगड या २ जिल्हयातील २० गावांमधील सामुहिक वनहक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी क्षेत्रिय स्तरावरील उपलब्ध विविध शासकीय यंत्रणांचे ( Resources ) कन्व्हर्जन्स करेल.

ग्रामसभेचा १० वर्षे कालावधीचा "संवर्धन व वन व्यवस्थापन आराखडा" हा वन विभागाच्या वर्कींग प्लॅनचा अविभाज्य भाग राहील. पेसा अंतर्गत गावांना त्यांच्या सामूहिक वनहक्क आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी आदिवासी विकास विभागाच्या ५ टक्के निधीतून संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २१/०४/२०१५ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार खर्च करण्याची मुभा राहिल.

ठाणे व रायगड या २ जिल्हयातील २० गावांची यादी सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केली आहे.

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक हे या समित्यांची नोडल एजन्सी म्हणून काम पाहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०७२८१६५८३९९३२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्टाचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prabhakar Bapurao Gawade

Digitally signed by Prabhakar Bapurao Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prabhakar Bapurao Gawade
Date: 2016.07.28 17:04:24 +05'30'

**( प्रभाकर बा. गावडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत -**

१. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
२. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४ प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
५ प्रधान सचिव (कृषी व पदुम), मंत्रालय, मुंबई
६. सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
८. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
९. सर्व जिल्हाधिकारी.
१०. सर्व मुख्य प्रशासकीय अधिकारी, जिल्हापरिषद.
११. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, नागपूर,अमरावती,
१२. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१३. संबंधित अशासकिय संस्था, वन निकेतन, ठाणे / साकव पेण प्रकल्प, रायगड ,
१४. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्या.अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ३२
१५. निवड नस्ती.(का.१४)आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.

**शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्रमांकः वहका-२०१६/प्र.क्र.८२/का-१४,**
**दिनांक :- २८ जुलै, २०१६ सोबतचे सहपत्र**

**"परिशिष्ट- अ"**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी ( वनहक्कांची मान्यता ) अधिनियम, २००६ आणि नियम २००८

सामुहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीची स्थापना करण्याबाबत.

ठाणे व रायगड या २ जिल्हयातील २० गावांची यादी खालीलप्रमाणे :-

**ठाणे जिल्हयातील १० गांवे**

| अ.क्र. | संस्थेचे नांव | गावांची नांवे | ग्रामपंचायत | तालुका | जिल्हा | सामुहीक वनहक्कातील क्षेत्र ( हे.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वन निकेतन, ठाणे | भांगवाडी | माळ | मुरबाड | ठाणे | ६५.०० |
| २ | वन निकेतन, ठाणे | दिवाणपाडा | भोरांडे | मुरबाड | ठाणे | ३९.०० |
| ३ | वन निकेतन, ठाणे | शिरवाडी | दहीगांव चाफे | मुरबाड | ठाणे | ४३.०० |
| ४ | वन निकेतन, ठाणे | दुर्गापूर | कळंभाड (भो) | मुरबाड | ठाणे | २०२.०० |
| ५ | वन निकेतन, ठाणे | भेरेवाडी | सोनावळे | मुरबाड | ठाणे | ११२.०० |
| ६ | वन निकेतन, ठाणे | शिसेवाडी | झाडघर | मुरबाड | ठाणे | ९९.०० |
| ७ | वन निकेतन, ठाणे | बनाचीवाडी | झाडघर | मुरबाड | ठाणे | ६३.०० |
| ८ | वन निकेतन, ठाणे | खरपटवाडी | झाडघर | मुरबाड | ठाणे | ४०.०० |
| ९ | वन निकेतन, ठाणे | पेजवाडी | भोरांडे | मुरबाड | ठाणे | ५५.०० |
| १० | वन निकेतन, ठाणे | विद्यानगर | पळू | मुरबाड | ठाणे | ४९.०० |

**रायगड जिल्हयातील १० गांवे**

| अ.क्र. | संस्थेचे नांव | गावांची नांवे | ग्रामपंचायत | तालुका | जिल्हा | सामुहिक वनहक्कातील क्षेत्र (हे.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साकव पेण प्रकल्प, | पाबळ | पाबळ | पेण | रायगड | ७३.१८ |
| २ | साकव पेण प्रकल्प, | कोंडवी | पाबळ | पेण | रायगड | १३०१.१२ |
| ३ | साकव पेण प्रकल्प, | कुर्नाड | पाबळ | पेण | रायगड | ६८८.९४ |
| ४ | साकव पेण प्रकल्प, | उसर | पाबळ | पेण | रायगड | ७३.०५ |
| ५ | साकव पेण प्रकल्प, | कळड | पाबळ | पेण | रायगड | ११७.३१ |
| ६ | साकव पेण प्रकल्प, | जिर्णे | पाबळ | पेण | रायगड | ४१२.९४ |
| ७ | साकव पेण प्रकल्प, | जांबोशी | पाबळ | पेण | रायगड | १८०.७७ |
| ८ | साकव पेण प्रकल्प, | रेवाली | पाबळ | पेण | रायगड | ४२.५६ |
| ९ | साकव पेण प्रकल्प, | वराप | वराप | पेण | रायगड | २०३.६२ |
| १० | साकव पेण प्रकल्प, | बोरीचा माळ | वराप | पेण | | २६१.९४ |

**सामूहिक वनहक्क मान्यता प्राप्त ग्रामसभांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्याबाबत**

# महाराष्ट शासन

**नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)**

**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१९/प्र.क्र.१४४/मग्रारो-०१**

**मंत्रालय, मुंबई-४०००३२**

**दि. ३० नोव्हेंबर, २०२१**

वाचा :-

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५
२. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०१२
३. शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/प्र.क्र.२५/रोहयो-१, दिनांक.१९ एप्रिल, २०११
४. शासन निर्णय क्र.मग्रारो २०१२/प्र.क्र.६३/रोहयो-१, दि.८ जानेवारी, २०१३
५. जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.२३०११/४७/२००९-एसजी-II (एफआरए), दि.२७ जुलै, २०१० चे पत्र

प्रस्तावना :-

महाराष्ट्र रोजगार हमी कायदा, १९७७ व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोज़गार हमी कायदा, २००५ अन्वये ग्रामपंचायतीने कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम करायचे आहे. त्यासाठी ग्रामपंचायती द्वारे ग्राम सभेच्या मंजूरीने दरवर्षी समृद्धी (लेबर) बजेट तयार करावयाचे असते. या प्रक्रियेत गट ग्राम पंचायत असलेल्या पंचायतींमध्ये पंचायत मुख्यालय शिवाय इतर गावांमधील नागरिकांचा सहभाग कमी प्रमाणात असते. त्यामुळे तेथील गरजांकडे पाहिजे त्या प्रमाणात लक्ष जात नसलेचे आढळून आले आहेत.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ च्या कलम ३.१ अनुसार ग्रामपंचायत नसलेले राजस्व गाव, टोला, पाडा, तांडा यांच्या सर्व मतदारांच्या मिळून बनलेल्या सभेस ग्रामसभा म्हणून कायदेशीर मान्यता देवून या ग्रामसभांना सामुदायिक वन अधिकार मान्यता देणारे अधिकार अभिलेख देण्यात आलेले आहेत. राज्यात ५००० पेक्षा जास्त गावांना सामुहिक वनहक्क प्राप्त झालेले आहेत. या सामुहिक वन अधिकार मान्यता प्राप्त ग्रामसभांना अधिनियमाचे क़लम ५ अन्वये त्यांचे सामुहिक वनहक्क क्षेत्र व जल स्त्रोतांचे संरक्षण करायचे आहे व या संसाधनांवर आधारित सुबत्ता निर्माण करायची आहे. रोपवाटीका, वनीकरण, बंधारे, तलाव, शेतीची बांध बंदिस्ती व याला पुरक इतर कामांमुळे भुगर्भ व भुतळावरील पाणी साठे वाढतील, शेतीचे उत्पन्न व वनोपज वाढेल. यामुळे आदिवासी व इतर वननिवासी नागरिकांना रोज़गार मिळेल व त्यांचा आर्थिक विकास होईल. याकरिता प्रत्येक गाव, टोला, पाडा यांनी आपल्या क्षेत्राचा संवर्धन व विकास आराखडा तयार करायची आहे. विकेंद्रीत पद्धतीने गाव, टोला, पाडा हे घटक म्हणून नियोजन केले तर त्याचे चांगले व निश्चित परिणाम होईल व गावातील नागरिक यात सहभागी होतील. या हेतूने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोज़गार हमी

योजनेंतर्गत गाव मेंढा (लेखा) ता. धानोरा, जि. गडचिरोली येथे ग्रामसभा यांना कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून मान्यता देऊन पथदर्शी प्रकल्प राबविण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्र.३ अन्वये मान्यता देण्यात आली तद्नंतर संदर्भाधीन क्र.४ येथील शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोज़गार हमी योजनेंतर्गत संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांना यंत्रणा म्हणून काम करण्यास काही अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. तथापि, या यंत्रणांकडून मनरेगा योजनांची परिणामकारक अंमलबजावणी केल्याचे दिसून आले नाही.

वर उल्लेखित पार्श्वभूमीवर संदर्भाधीन क्र.३ व ४ येथील शासन निर्णय निरसित करून योजना बनवून कार्यान्वयित करण्याकरिता सामुहिक वनहक्क मान्यता प्राप्त ग्रामसभांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अंमलबजावणी यंत्रणा म्हणून घोषित करण्याची आवश्यकता आहे. सबब या गावांच्या ग्रामसभांना व त्यांचे कार्यकारी मंडळ म्हणजेच सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समितीला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविण्याकरीता यंत्रणा म्हणून घोषित करण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती. उपरोक्त बाबी विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. संदर्भाधीन क्र. व ४ येथील शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत. गाव, टोला, पाडा याला सुक्ष्म घटक मानून विकेंद्रीत पद्धतीने रोजगार हमी योजना राबविण्याकरिता महाराष्ट्र रोजगार हमी कायदा, १९७७, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोज़गार हमी कायदा, २००५ व अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६ यांची सांगड घालून सामुदायिक वन अधिकार मान्यता प्राप्त गावाच्या ग्रामसभेला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामे करण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

२. वनहक्क प्राप्त जमीनीवरील सर्व कार्यांचे नियोजन व खर्च ग्रामसभेचे मंजूरीने वनहक्क कायद्याचे क़लम ४(१)(ड.) नुसार ग्राम सभेद्वारा गठीत कार्यकारी मंडळ करेल.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे गावाचे सामुहिक वनहक्क क्षेत्रातील वनाची वाढ, जलसंधारण व वनहक्क धारकाचे उपजिविकेकरीता अंतर्भूत योजनांचा समावेश करून केली जातील.

४. ग्राम सभेने चिन्हांकित केलेले सर्व कार्य ग्रामपंचायतीस सादर केले जाईल व त्याची पोच पावती घेतली जाईल. ग्रामपंचायतीने या यादीस मान्यता देऊन १५ दिवसांच्या आत पंचायत समितीस सादर करावे.

५. ग्रामपंचायतीने वरील बिंदु प्रमाणे १५ दिवसांच्या आत कार्यवाही केला नाही तर ग्राम सभेतील कार्यकारी मंडळाने ही यादी ग्रामपंचायतीने दिलेल्या पावतीसह पंचायत समितीस सादर करावे. तसेच ग्राम सभेद्वारा यादी सादर केल्यावर एखाद्या ग्रामपंचायतीने पावती देण्यास नकार दिल्यास तर कार्यकारी मंडळाने ग्राम सभेद्वारे मंजूर कामांची यादीसह तसे लेखी स्वरूपात पंचायत समितीस कळवावे.

६. उपरोक्त मुद्दा क्रमांक ३ व ४ मधील कोणत्याही प्रकारे यादी प्राप्त झाल्यावर पंचायत समितीने सदर यादीस समृद्धी बजेट मध्ये जोडण्याची पुढील कार्यवाही शासन परिपत्रक २ सप्टेंबर २०२१ मधील मुद्दा क्रमांक ५ नुसार त्वरेने कार्यवाही करावी जेणेकरुन यादी प्राप्त झाल्याचे ४५ दिवसांच्या आत समृद्धी बजेट मध्ये जोडले जाईल.

७. ग्रामसभा मेटची निवड करेल. या गावांमध्ये मेट हेच ग्राम रोजगार सेवकाचे सर्व जबाबदाऱ्या पार पाडतील. मेट (ग्राम रोजगार सेवक ) चे मानधन ग्रामसभेमार्फत देण्यात येईल.

८. सामुहिक वन अधिकार मान्यता प्राप्त ग्रामसभा स्वतःचे कार्य करण्यास सक्षम व्हावे या उद्देशाला धरून ग्रामसभा स्थानिक युवक अथवा युवती मधून बेअर फुट टेक्निशियन ची निवड करेल.

**बेअर फुट टेक्निशियन निवडीचे निकष :-**

i. संबंधित युवक/ युवतीचे नाव कुटुंबाच्या जाबकार्ड मध्ये असणे आवश्यक राहील.
ii. हे जॉबकार्ड वर्तमान आर्थिक वर्ष आणि मागील दोन वर्षे एक्टीव्ह असावे किंवा मेट/ ग्राम रोजगार सेवक म्हणून कार्यरत असावे.
iii. संबंधित युवक/ युवतीचे शिक्षण किमान १२ वी झालेले असावे. तथापि, एखाद्या ग्रामसभेत १२ उत्तीर्ण झालेले व्यक्ती उपलब्ध नसल्यास १० उत्तीर्णास नियुक्तीची परवानगी असेल.
iv. बेअर फुट टेक्निशियन त्याच ग्राम सभेतील असणे बंधनकारक नाही. संबंधित ग्रामसभेत वरील निकष पूर्ण करणारे युवक/ युवती उपलब्ध नसले तरच इतर गावांमधील उमेदवारांचा विचार करण्यात यावा.
v. अनुसूचित जमाती/ अनुसुचित जाती तसेच महिलांचे पूरेशे प्रतिनिधित्व असावे.

९. बेअर फुट टेक्निशियन यांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे. त्यात योजना बनवणे, त्याची अंमलबजावणी करणे, सामुग्री पुरवठयासाठी आवश्यक निविदा प्रक्रिया, साहित्यांची खरेदी, लेखा पुस्तक संधारित करणे इत्यादींचा समावेश राहील. यशस्वी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र द्यावे. प्रशिक्षणात यशस्वी उमेदवार फक्त बेअर फुट टेक्निशियन म्हणून नियुक्तीस पात्र राहतील. प्रशिक्षणाचे नियोजन जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी करावे.

१०.बेअर फुट टेक्निशियन कार्यकर्त्यांचे निवडीनंतर प्रशिक्षित होऊन तांत्रिक सहायक म्हणून कार्य करायला सुरूवात करण्यास काही कालावधी लागेल. तोपर्यंत पंचायत समितीतील तांत्रिक सहायक या ग्रामसभेच्या रोहयोअंमलबजावणी यंत्रणेचे सदस्य सचिव म्हणून कार्य करतील.

११.गटविकास अधिकारी प्रत्येक ग्राम सभेकरिता (गावाकरिता) ग्रामसभेच्या संमतीने तांत्रिक सहाय्यकाची सदस्य सचिव म्हणून नेमणूक करतील. या तांत्रिक सहायकाचे ग्रामसभेला योग्य प्रमाणे सहकार्य मिळावे म्हणून दर आठवड्याला ग्रामसभेला भेट देतील किंवा संबंधित व्यक्तींशी दूरध्वनी/झूम वर संपर्क साधतील.

१२. ग्राम सभेतील नियोजित कामांची अंमलबजावणी पंचायत समितीद्वारे, ग्रामसभेव्दारे की शासनाचे अन्य विभागामार्फत व्हावे हे ग्रामसभेच्या मंजुरीने कार्यकारी मंडळ निश्चित करेल. मात्र एका कामासाठी अशी निश्चिती फक्त एकदा करता येईल. काही विशिष्ट कारणास्तव त्यात बदल करणे आवश्यक असल्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक त्यासाठी सक्षम प्रधिकारी असतील.

१३. पंचायत समिती/ संबंधित विभागाचे अधिकारी / प्रशिक्षित बेअर फुट टेक्नेशियन गावाची गरज व ग्रामसभाद्वारे मंजूर नियोजन आराखड्यानुसार योजना, तांत्रिक आराखडे, अंदाजपत्रक तयार करतील व त्याकरीता सर्व प्रकारचे सहाय्य करतील. संबंधित विभागाचे अधिकारी नियमानुसार तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्रदान करतील.

१४. पंचायत समिती द्वारे केल्या जाणाऱ्या सर्व कामांचे अंदाजपत्रक तांत्रिक सहाय्यक तयार करतील. त्यातील बांधकामाशी निगडीत कामांना तांत्रिक मान्यता पंचायत समितीतील कनिष्ठ अभियंता व फळबाग, शेतात/ शेताच्या बांधावर तसेच वनहक्क प्राप्त सार्वजनिक/ सामुदायिक जमीनीवरील वृक्ष लागवडीशी निगडीत कामांना तांत्रिक मान्यता पंचायत समितीतील कृषी विस्तार अधिकारी देतील.

१५. कामावर देखरेख ग्रामसभेद्वारा नियुक्त सामुहिक वनहक्क समितीचे प्रतिनिधी, संबंधित विभागाचे प्रतिनिधी किंवा बेअर फुट टेक्निशियन/ तांत्रिक सहाय्यक करतील.

१६. मस्टर भरून त्यावर स्वाक्षरी मेट (ग्रामरोजगार सेवक) करेल व ग्रामस्तरीय रोहयो अंमलबजावणी यंत्रणेची मंजुरी घेवून संबंधित विभागाचे अधिकारी/ तांत्रिक सहाय्यकास सादर करेल.

१७. या मस्टर च्या आधारे संबंधित विभाग/ पंचायत द्वारे FTO raise करून राशी प्रदान करण्यात येईल.

१८. सार्वजनिक कामाचे कुशल व अर्धकुशल राशीचे प्रदान पंचायत समिती/ संबंधित विभागाद्वारे बँकेमार्फत ग्रामसभेचे **"ग्रामसभा.....(गावाचे नाव), (रोहयो)"** नावाने उघडलेल्या वेगळ्या बँक खात्यात व वैयक्तिक कामाचे प्रदान संबंधित व्यक्तीच्या बँक खात्यात करण्यात येईल.

१९. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्य करत असतांना अग्रिम देण्याची व्यवस्था नसल्यामुळे वैयक्तिक कार्य करताना काही कुटुंबांना निधी अभावी कार्य करण्यास अडचणी निर्माण होतात. अशा कुटुंबांच्या कार्यास ग्राम सभेने अंमलबजावणीच्या वेळेस आर्थिक मदत करावी. अशा प्रकारे करण्यात आलेल्या कामांचे कुशल व अर्धकुशलचे राशी ग्राम सभेच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येईल.

२०. सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती ग्रामसभेच्या वतीने व मंजूरीने केवळ वनहक्क कायद्यानुसार प्राप्त सामुहिक वने, जलग्रहण क्षेत्रे, जलसंसाधने व वनहक्क धारकाचे शेती या क्षेत्रातच कामे करू शकतील. तथापि, त्याच महसूली गावातील वनहक्क कायद्यानुसार प्राप्त जमीनीवरील कामे ग्रामपंचायतीस सुचविण्याचा हक्क या ग्राम सभेला राहील. ती कामे समृद्धी (लेबर) बजेट मध्ये समाविष्ट करणे संबंधित ग्रामपंचायतीस बंधनकारक असेल. मात्र या कामांची अंमलबजावणी सदर ग्राम सभेनी मागणी केल्यानुसार पंचायत किंवा अन्य शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात येईल.

२१.**कामावर संनियंत्रण :-**

i. तालुका पातळीवर कामाचे संनियंत्रण गटविकास अधिकारी करतील. कोणत्याही ग्राम सभेद्वारे प्रस्तावित कार्ये वेळच्या वेळी मंजूर होऊन क्रियान्वित होतील याची सर्वस्वी जबाबदारी गट विकास अधिकारी पार पाडतील.

ii. आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी, गटविकास अधिकारी तसेच तालुकास्तरावरील अन्य विभागातील अधिकाऱ्यांचे प्रत्येक तिमाहीला आढावा घेतील.

iii. जिल्हा कार्यक्रम समन्वयक प्रत्येक ६ महिन्यात बैठका घेऊन येणाऱ्या अडचणी सोडवतील.

iv. वरील बैठकांमध्ये SECURE संगणक प्रणालीतील डेटाचा वापर करण्यात यावा.

v. गरजेनुसार या बैठकांमध्ये अंमलबजावणीत अडचण येत असलेल्या ग्राम सभेतील प्रतिनिधी सुद्धा आमंत्रित करता येईल.

vi. धोरणानुसार कामाचे सामाजिक अंकेक्षण तसेच स्थानिक निधी अंकेक्षण करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२१११३०१६४९३२४३१६ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

Digitally signed by NANDKUMAR VERMA
Date: 2021.11.30 16:52:57 +05'30'

**( नंदकुमार )**
**अपर मुख्य सचिव (रो.ह.यो)**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
३. मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद
६. अ.मु.स. (रोहयो) यांचे स्विय सहायक
७. सचिव (आदिवासी विकास विभाग) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई - ३२
८. सर्व विभागीय आयुक्त
९. आयुक्त (नरेगा), महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
१०.आयुक्त (आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था), महाराष्ट्र राज्य, पुणे
११.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१२.प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
१३.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे
१४.संचालक, फलोत्पादन, पुणे
१५.संचालक, सामाजिक वनिकरण, पुणे

१६.सर्व जिल्हाधिकारी
१७.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१८.सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१९.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२०.महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर,
२१.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ / २,मुंबई / नागपूर,
२२.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२३.सर्व उपसचिव/अवर सचिव / कार्यासन अधिकारी, (रोहयो)
निवडनस्ती मग्रारो-१,

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारित नियम २०१२, सामूहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी "ग्रामस्तरीय समिती व तालुकास्तरीय कन्व्हर्जन्स समिती स्थापन करणे व जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती व राज्यस्तरीय सुकाणु समितीमध्ये बदल करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**आदिवासी विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः वहका -२०२१/प्र.क्र.१८७ /का-१४**

आदिवासी विकास विभाग, मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२ नोव्हेंबर, २०२१

**वाचा:**

१. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारित नियम २०१२.
२. आदिवासी विकास विभाग शा.नि.क्र.बैठक -२०१३/प्र.क्र.२७२/का-१४, दि. ०५ मार्च, २०१४.
३. आदिवासी विकास विभाग शा.नि.क्र.बैठक -२०१३/प्र.क्र.२७२/का-१४, दि. १२ जुन, २०१५.
४. आदिवासी विकास विभाग शा.नि.क्र.वहका -२०१४/प्र.क्र.६६/का-१४, दि. २४ जुन, २०१५.
५. आदिवासी विकास विभाग शा.नि.क्र.वाहका-२०१६/प्र.क्र.८२/का-१४, दि.०१ ऑक्टोंबर, २०१६.
६. आदिवासी विकास विभाग शा.परिपत्रक.क्र.वाहका-२०१७/प्र.क्र.७७/का-१४, दि.०६ जुलै, २०१७.
७. आदिवासी विकास विभाग शा.नि.क्र.वाहका-२०१८/प्र.क्र.३३/ का.१४, दि. ०५ मे, २०१८.
८. सामुहिक वनहक्क प्राप्त गावांतील संवर्धन व व्यवस्थापन आराखड्या संदर्भात दि.०५/८/२०२१ रोजी सचिव (आदिवासी विकास) यांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक.

**प्रस्तावना -**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारित नियम २०१२ नुसार अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी यांना कलम ३ (१) नुसार वैयक्तिक व सामूहिक वनहक्क किंवा दोहोंचे धारणाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत.

अनुसूचित जमातीचे वननिवासी व इतर पारंपारीक वननिवासी यांच्या फायद्यासाठी सामूहिक वनसंपत्तीचे निरंतर व समसमान व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामसभेचे बळकटीकरण करण्याकरिता तसेच वनांवर उपजीविका अवलंबून असलेल्या ग्रामीण समाजाला निरंतर व शाश्वत उपजिविका साधन उपलब्ध करुन देणे, वनांचे व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, संरक्षण व पुर्ननिर्माणाकरीता परिणामकारक व कार्यक्षम व्यवस्थापन पध्दत अवलंबिणे आवश्यक आहे.

राज्यात माहे ऑगस्ट, २०२१ अखेर ११,८४२ सामूहिक वनहक्कांचे दावे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी जिल्हास्तरीय समितीने ८,११३ सामूहिक वनहक्क दावे अंतीमतः मान्य केले आहेत. तसेच यापुढेही ग्रामसभांना सामूहिक वनहक्क प्राप्त होऊ शकतात. त्याकरिता विविध शासकिय विभागांतर्गत मंजूर असलेल्या योजनांच्या/ प्रकल्पांच्या मंजूर निधीतून विविध योजना/प्रकल्पांमार्फत उपलब्ध होणा-या निधीचे Convergence करुन MGNREGA/आमदार/खासदार निधी, जिल्हास्तर निधी/ अशासकीय संस्था/CSR लोकसहभाग यांच्या माध्यमातून वनांचे संवर्धन, तेथील नैसर्गिक साधन संपत्तीचे जतन, संरक्षण व संवर्धन याकरिता शाश्वत उपाययोजना करण्यासाठी सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

सामुहिक वनहक्क प्राप्त गावातील संवर्धन व व्यवस्थापन आराखड्या संदर्भात रोजी सचिव (आदिवासी विकास विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दि.०५/८/२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये निश्चित केल्यानुसार सामूहिक वनहक्काचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सर्व विभागांतील सेवा उपलब्ध करुन घेण्याकरीता जिल्हयांमध्ये "ग्रामस्तरीय समिती व तालुकास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" स्थापन करणे तसेच जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती संदर्भातील दि.०१ ऑक्टोबर,२०१६ व राज्यस्तरीय सुकाणू समिती संदर्भातील दि.०५ मार्च,२०१४ शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय –**

राज्यस्तरीय सुकाणू समिती संदर्भातील वाचा येथील अ.क्र.२ येथील दि.०५ मार्च,२०१४ तसेच जिल्हास्तरिय कन्व्हर्जन्स समिती संदर्भातील वाचा येथील अ.क्र.३ येथील दि.१२ जून,२०१५ व अ.क्र.५ येथील दि.०१ ऑक्टोबर,२०१६ चे शासन निर्णय अधिक्रमित करून पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

राज्यातील सर्व ग्रामस्तर, तालुकास्तर व जिल्हास्तरावर खालील प्रमाणे **"ग्रामस्तरीय समिती व तालुकास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" स्थापन करणे तसेच जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती व राज्यस्तरीय सुकाणु समितीच्या रचना व कर्तव्य तसेच जबाबदारी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.**

**क) "ग्रामस्तरीय समिती, तालुकास्तरिय व जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती" स्थापन करण्याचा उद्देश.**

१. सामूहीक वनहक्क व्यवस्थापन समितीचे (वनहक्क कायदा नियम ४(१) ड) गठन करणे.

२. सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची क्षमतावृध्दी करणे.

३. वन्यजीव, जैविक विविधता यांचे संरक्षण करणे.

४. वनांवर उपजिविका अवलंबून असलेल्या ग्रामीण समाजाला निरंतर व शाश्वत उपजिविका साधन उपलब्ध करुन देणे.

५. वनांचे व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, संरक्षण व पुनर्निमाणाकरीता परिणामकारक व कार्यक्षम व्यवस्थापन करणे.

६. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांचे जिवनमान उंचावणे.

७. ग्रामसभेचे बळकटीकरण करणे.

**ख) ग्रामस्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १) | ग्रामस्तरीय वनहक्क समितीचे अध्यक्ष | अध्यक्ष |
| २) | ग्रामसेवक | सदस्य |
| ३) | तलाठी | सदस्य |
| ४) | कृषी सेवक | सदस्य |
| ५) | सामूहीक वनहक्क व्यवस्थापन समितीचे सदस्य सर्व | सदस्य |
| ६) | ग्राम रोजगार सेवक | सदस्य |
| ७) | वनपाल वनविभाग | सदस्य सचिव |

**"ग्रामस्तरीय समिती" समितीची कर्तव्य व जबाबदारी.**

१. वनहक्क कायदा २००६ चे नियम ४(१) (ड) ४(१) (च) नुसार ग्रामसभेने गठीत केलेली सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती, सामूहिक वनहक्क प्राप्त क्षेत्रामध्ये संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्यास बांधील असतील. सदर समितीस ग्रामस्तरीय समितीतील अन्य शासकिय सदस्य आराखडे तयार करण्याकरिता सर्वतोपरी मदत करतील.

२. सामूहिक वनहक्क प्राप्त क्षेत्रामध्ये संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्याकरिता, शासनाकडून ग्रामस्तरीय समितीचे गठन करण्यात आले आहे, याबाबत ग्रामसभेस अवगत करणे, सामूहिक वनहक्काबाबतचे महत्व पटवून देणे, सामूहिक वनहक्क प्राप्त क्षेत्रामध्ये संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्याकरिता ग्रामसभेची मंजूरी घेणे, संवर्धन व व्यवस्थापन आराखड्याविषयी ग्रामसभेमध्ये चर्चा घडवून आणणे त्यासाठी बैठका आयोजित करणे, ग्रामसभांमार्फत आराखड्यामध्ये समाविष्ट करावयाची कामे ठरविणे, श्रमदानातून हाती घ्यावयाची कामे, मृदसंधारणेची कामे, जलसंधारणाची कामे प्रस्तावित करणे व त्याविषयीची कार्यपध्दती ठरविणे.

३. ग्रामस्तरीय समितीने सामूहिक वनहक्क प्राप्त क्षेत्रात शिवारफेरी करुन सामूहिक वनहक्क क्षेत्रातील सद्यस्थिती व वनसंसाधनांबाबतची माहिती संकलित करणे, त्यांच्या वेळोवेळी नोंदी ठेवणे व अद्यावत करणे.

४. आराखडे तयार करण्यासाठी तालुका कन्व्हर्जन्स समितीकडून प्राप्त झालेल्या विविध शासकीय योजनांची माहिती व उपलब्ध वन संसाधनांच्या आधारे सामुहिक वनक्षेत्रात करावयाच्या कामांची सुची (क्षेत्र व कालावधी निहाय) तयार करुन त्याचा समावेश संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यामध्ये करणे.

५. पेसा अंतर्गत घेण्यात येणारी कामे व सामुहिक वनहक्क प्राप्त क्षेत्रामध्ये वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यानुसार करण्यात येणारी कामे यांची सांगड घालण्यात येऊन एकात्मिक पद्धतीने कामे करण्यात यावी, पेसा अंतर्गत गावांच्या ग्रामसभा विकास आराखड्यामध्ये सामूहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखड्याचा समावेश करणे क्रमप्राप्त असेल याची दक्षता घेणे.

६. सामूहीक वनजमिनीचे सर्वेक्षण करणे, जमिनीची पोत, झाडांची निवड, वनक्षेत्रातील कामांची निवड या करिता वनविभागाने आवश्यक ते तांत्रिक सहाय्य करावे .

७. सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण करणे करिता ग्रामसेवक यांनी सहाय्य करावे.

८. सामूहिक वनहक्काचे फलक लावणे. (गावाचे नांव, सामूहिक वनहक्क प्राप्त क्षेत्राचा आकार/ क्षेत्राचा नकाशा, चतु:सिमा/ हद्द यांचा तपशिल असलेला फलक असावा)

९. सामूहीक वनहक्क प्राप्त क्षेत्र निश्चित करून नकाशा अंतिमरित्या तयार करुन देण्याची जबाबदारी वनविभागाची असेल.

१०. वन संवर्धन व व्यवस्थापन आराखड्याचे प्रारुप तयार करुन विविध शासकिय विभागांच्या सुचना विचारात घेण्यासाठी तालुका कन्व्हर्जन्स समिती समोर सादर करणे.

११. तालुका कन्व्हर्जन्स समितीने आराखड्यामध्ये सुचविलेल्या बदलांनुसार आराखड्याचे प्रारुप अंतिम करुन ग्रामसभेची अंतिम मान्यता घेणे

१२. सदर आराखड्यांच्या अंमलबजावणीच्या मान्यतेसाठी सदर आराखडा तालुका कन्व्हर्जन्स समितीमार्फत जिल्हा कन्व्हर्जन्स समितीस सादर करणे.

१३. आराखड्यांच्या अंतिम मंजूरीनंतर वन, जल, वन्यजीव व जैवविविधतेच्या जतन, संरक्षण व पुर्ननिर्माण करणेकरिता आराखड्यांची अंमलबजावणी करणेची जबाबदारी सामूहीक वनहक्क व्यवस्थापन समितीची राहील. तसेच आराखड्यांनुसार विविध योजनांतर्गत व योजनाबाह्य करावयाची कामांची अंमलबजावणी ग्रामस्तरीय समिती ही तालुकास्तरिय कन्व्हर्जन्स समितीच्या मार्गदर्शनाखाली करणे.

**ग) तालुकास्तरिय कन्व्हर्जन्स समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १) | प्रकल्प अधिकारी | अध्यक्ष |
| २) | तहसिलदार | सह अध्यक्ष |
| ३) | सहाय्यक वनसंरक्षक / वनपरिक्षेत्र अधिकारी वनविभाग | सदस्य |
| ४) | गट विकास अधिकारी, पंचायत समिती | सदस्य |
| ५) | तालुका कृषी अधिकारी | सदस्य |
| ६) | तालुका पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७) | सहाय्यक तालुका मत्स्यव्यवसाय अधिकारी | सदस्य |
| ८) | शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम | सदस्य |
| ९) | शाखा अभियंता लघुपाटबंधारे | सदस्य |
| १०) | अशासकिय सदस्य (वनहक्क संबंधित तज्ञ व्यक्ती) | सदस्य |
| ११) | सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास, प्रकल्प कार्यालय | सदस्य सचिव |

**"तालुकास्तरिय कन्व्हर्जन्स समिती" समितीची कर्तव्य व जबाबदारी.**

१. तालुका कन्व्हर्जन्स समितीने बैठक घेऊन समितीमधील सदस्यांचे विभाग निहाय कामकाज निश्चित करणे.

२. ग्रामस्तरीय समितीच्या कामकाजाची रुपरेषा व कालावधी निश्चित करणे.

३. सदर योजनेअंतर्गत सामूहीक वनहक्क व्यवस्थापन समितीचे (वनहक्क कायदा नियम ४(१)(ड) गठन करुन घेणे.

४. सामूहीक वनहक्क प्राप्त गावाचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्याकरिता ग्रामस्तरीय समितीशी समन्वय साधुन आराखडे तयार करुन घेणे.

५. ग्रामस्तरीय समिती व समितीमधील सामूहिक व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना क्षमतावृध्दीसाठी प्रशिक्षण देणे.

६. संवर्धन व व्यसवस्थापन आराखडे तयार करणेकामी गठीत करण्यात आलेल्या ग्रामस्तरीय समितीच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे, ग्रामस्तरीय समितीच्या कामकाजाचा दरमहा आढावा घेणे व समितीस येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे.

७. ग्रामस्तरीय समितीस सामूहीक वनहक्क क्षेत्र निश्चित करून नकाशा वनविभागाकडून उपलब्ध करुन देणे.

८. आराखडे तयार करण्यासाठी विविध शासकिय योजनांची माहिती व इतर आवश्यक माहिती तसेच विविध शासकिय यंत्रणांच्या सेवा ग्रामस्तरीय समितीस उपलब्ध करुन देणे.

९. पेसा अंतर्गत घेण्यात येणारी कामे व सामुहिक वनहक्क प्राप्त क्षेत्रामध्ये वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यानुसार करण्यात येणारी कामे यांची सांगड घालण्यात येऊन एकात्मिक पद्धतीने कामे करण्यात यावी. पेसा अंतर्गत गावांच्या ग्रामसभा विकास आराखड्यामध्ये सामूहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखड्याचा समावेश करणे क्रमप्राप्त असेल याची दक्षता समितीने घ्यावी.

१०. ग्रामस्तरीय समितीने तयार केलेला प्रारुप आराखड्याच्या अनुषंगाने बैठक घेऊन आराखड्यांमध्ये विविध विभागांच्या सूचना विचारात घेऊन, आवश्यक ते बदल करुन ग्रामसभेच्या अंतिम मान्यतेसाठी ग्रामस्तरीय समितीकडे पाठविणे.

११. ग्रामस्तरीय समितीने ग्रामसभेच्या अंतिम मान्यतेनंतर सादर केलेल्या संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यांमध्ये नमुद केलेली कामे कोणकोणत्या योजनांमधुन करता येतील याची वर्गवारी करणे तसेच त्यानुसार संबंधित शासकीय विभागांकडून त्यासाठी विभाग निहाय आवश्यक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन घेणे व खर्चाचे नियोजन करणे.

१२. योजनाबाह्य कामकाजांची वर्गवारी करणे व सदर कामांच्या निधी उपलब्धतेसाठी जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीचे मार्गदर्शन घेणे. व त्यानुसार विकास कामे प्रस्तावित करणे.

१३. ग्रामसभेच्या अंतिम मान्यतेनंतर सदर आराखड्यांच्या अंमलबाजवणीसाठी योजना निहाय येणाऱ्या खर्चाचा आराखडा जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती समोर सादर करणे व आराखड्यांच्या अंमलबजावणीकरिता जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीचे मंजूरी घेणे.

१४. जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीच्या आदेशानुसार आराखड्यांच्या अंमलबजावणीचे कामकाज करणे.

घ) **जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीची रचना खालील प्रमाणे राहील.**

| अ.क्र. | समिती सदस्य | | पद |
|---|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | :- | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद | :- | सह अध्यक्ष |
| ३) | उप वनसंरक्षक | :- | उपाध्यक्ष |
| ४) | उप जिल्हाधिकारी (मनरेगा) | :- | सदस्य |
| ५) | जिल्हा नियोजन अधिकारी | :- | सदस्य |
| ६) | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | :- | सदस्य |
| ७) | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | :- | सदस्य |
| ८) | कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे | :- | सदस्य |
| ९) | कार्यकारी अभियंता सार्वजनीक बांधकाम | :- | सदस्य |
| १०) | सहाय्यक संचालक, मत्स्यव्यवसाय संचालनालय | :- | सदस्य |
| ११) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | :- | सदस्य सचिव |

**"जिल्हास्तरिय कन्व्हर्जन्स समिती" समितीची कर्तव्य व जबाबदारी**

१. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ आणि नियम २००८ व सुधारित नियम २०१२ प्रमाणे वैयक्तिक तसेच सामूहिक वनहक्क प्राप्त

झालेल्यांना दावा मान्यतेनुसार सर्व शासकीय विभागांकडुन विविध योजनांचा लाभ मिळणेकरिता सहाय्यता मिळेल याची खात्री करणे.

२. वनहक्क नियम २००८ च्या नियम ४ अंतर्गत ग्रामसभांना त्यांची कामे पार पाडण्यासाठी प्रशिक्षण निधीचा विनीयोग इत्यादीबाबत सर्वतोपरी मदत मिळेल याची खात्री करणे, विशेषत:

अ) वनहक्कांची मान्यता अधिनियम, २००६ च्या कलम ५ मधील तरतुदीनुसार वन्यजीव, वने आणि जैव विविधतेचे संरक्षण करण्याठी ग्रामसभेच्या सदस्यांची सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती (CFRMC) स्थापन करण्यासाठी तसेच बँक खाते उघडण्यासाठी ग्रामसभांना मदत करणे.

ब) वनहक्क सुधारणा नियम २०१२ च्या नियम ४ (१) (च) नुसार संवर्धन आणि व्यवस्थापन आराखडा तयार करण्यासाठी ग्रामसभा आणि सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती (CFRMC) यांना मदत करणे तसेच वनविभागाच्या सूक्ष्म योजना किंवा चालू योजना किंवा व्यवस्थापन योजनाबरोबर सदर व्यवस्थापन आराखडा ग्रामसभा आणि त्यांच्या समित्यांना करणे आवश्यक वाटेल अशा फेरबदलांनिशी एकत्रीकरण करण्यासाठी ग्रामसभा आणि त्यांच्या समित्यांना सर्वतोपरी मदत पुरविणे.

३. ग्रामसभा व सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती (CFRMC)) यांनी तयार केलेला संवर्धन व्यवस्थापन आराखड्यानुसार सामूहिक वनहक्कांची अंमलबजावणी करण्यासाठी व घ्यावयाच्या कामांसाठी वनविभाग, कृषि, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभाग, ग्राम विकास व जलसंधारण विभाग (मनरेगा घटक) इ. विभागांच्या सहकार्याने सामूहिक वनहक्काचे व्यवस्थापन करणे करिता क्षेत्रिय स्तरावरील विविध शासकिय यंत्रणांच्या सेवा ग्रामसभा यांना उपलब्ध करुन देणे.

४. आराखड्यांनुसार मागणी केलेल्या कामांची अंमलबजावणी करणेकरिता विविध शासकीय विभागांच्या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून घेणे. ज्या कामांची अंमलबजावणी नियमित शासकीय योजनेअंतर्गत होऊ शकणार नाही अशा कामांच्या अंमलबजावणी करिता, आदिवासी उपयोजना घटक, जिल्हा नियोजन समिती, आमदार/खासदार निधी, अशासकीय संस्था/CSR लोकसहभाग याद्वारे निधी उपलब्ध करून घेण्याचे नियोजन करून तालुकास्तरीय कन्व्हर्जन्स समिती मार्फत आराखड्यांच्या अंमलबजावणी करून घेणेकरिता सर्वोतोपरी प्रयत्न करेल.

५. आराखड्यांमध्ये नमूद योजनेतंर्गत व योजनाबाह्य कामांची अंमलबजावणी करण्यासाठी मान्यता देणे.

६. जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती, सर्व गावांना सामूहिक वनहक्क दावे दाखल करण्यासाठी आणि सामूहिक वनहक्क व्यवस्थापन समिती स्थापन करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेल.

७. कोणताही निर्णय घेण्यापुर्वी अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ चे कलम ३ आणि कलम ५ अंतर्गत देण्यात आलेले अधिकार मोडले जाणार नाहीत याबाबत जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीने दक्षता घेणे आवश्यक असेल.

८. पेसा अंतर्गत गावांना, त्यांच्या सामूहिक वनहक्क आराखड्याची अंमलबजावणी विविध यंत्रणांकडुन करून घेण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या ५ टक्के निधीतुन, आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. पेसा-२०१५/प्र.क्र.१९/का.१७, दि.२१/०४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार खर्च करण्याची मुभा राहिल. जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समिती त्याबाबत वेळोवेळी आढावा घेईल.

९. पेसा अंतर्गत घेण्यात येणारी कामे व सामुहिक वनहक्क प्राप्त क्षेत्रामध्ये वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यानुसार करण्यात येणारी कामे यांची सांगड घालण्यात येऊन एकात्मिक पद्धतीने कामे करण्यात यावी पेसा अंतर्गत गावांच्या ग्रामसभा विकास आराखड्यामध्ये सामूहिक वनहक्कांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखड्याचा समावेश करणे क्रमप्राप्त असेल याची दक्षता समितीने घ्यावी.

१०. जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी.

११. संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणेकरिता गठीत करण्यात आलेल्या तालुका कन्व्हर्जन्स समितीचे संनियंत्रण करणे, समितीचा आढावा घेणे व समितीस येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे.

१२. जिल्हा स्तरीय कन्व्हर्जन्स समितीवर संनियंत्रण राज्य स्तरीय सुकाणू समितीचे राहील.

**च) प्रशिक्षण**

संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण व मार्गदर्शन आयोजीत करण्याचे कामकाज आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेमार्फत केले जाईल. प्रशिक्षणासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना उपलब्ध होणा-या निधीमधून सदर प्रशिक्षणाचा खर्च भागवावा व आवश्यकता भासल्यास यासाठी आदिवासी विकास विभागाकडे निधी मागणी करावी.

**छ) निधी**

संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी **प्रति सामूहिक वनहक्क दाव्याकरिता** (सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभा) निधी आदिवासी विकास विभागामार्फत एकात्मिक आदिवासी

विकास प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावर उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | दर (रु.) |
|---|---|---|
| १ | सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण व क्षमता वृध्दी व जन जागृती | ३,००० |
| २ | जिल्हा स्तरीय कन्व्हर्जन्स समितीच्या कामकाजाकरिता. | १,००० |
| २ | तालुका स्तरीय कन्व्हर्जन्स समितीच्या कामकाजाकरिता. | २,००० |
| ३ | ग्रामस्तरीय समिती व्यवस्थापन आराखडे छपाई, स्टेशनरी व सामुहिक वनक्षेत्राचे फलक लावणे. | ६,००० |
| | एकुण | १२,००० |

**ज) प्रकल्पाचा कालावधी**

तालुक्यातील सर्व सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे सहा महिन्यांचा असेल त्याचा तपशिल खालील प्रमाणे असेल. पुर्ण करण्याची जबाबदारी तालुका कन्व्हर्जन्स समितीची राहिल.

| अ.क्र. | कामकाज | कामकाजाचा कालावधी |
|---|---|---|
| १) | ग्रामस्तरीय समितीने प्रारुप आराखडा तयार करुन तालुका कन्व्हर्जन्स समिती समोर सादर करणे. | ३ महिने |
| २) | तालुका स्तरीय समितीकडे प्राप्त झालेल्या प्रारूप आराखड्याच्या अनुषंगाने बैठक घेऊन ग्रामस्तरीय समितीने तयार केलेला प्रारुप आराखड्यांमध्ये आवश्यक ते बदल करुन आराखडे ग्रामसभेच्या अंतिम मान्यतेसाठी ग्रामस्तरीय समितीकडे पाठविणे. | १ महिना |
| ३) | तालुका स्तरीय समिती, ग्रामसभेने आराखड्यांना दिलेल्या अंतिम मान्यतेनंतर आराखडे अंमलबजावणीच्या मान्यतेसाठी (सदर आराखड्यांमध्ये समाविष्ट असलेल्या कामांच्या योजनेनिहाय येणारा खर्च व योजनाबाह्य असलेल्या कामांच्या संभाव्य खर्चासह तपशिल) जिल्हा कन्व्हर्जन्स समिती समोर सादर करेल. | २ महिने |
| ४) | जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीच्या सुचनेनुसार आराखड्यांच्या अंमलबजावणीचे कामकाज करणे. | पुढील कालावधी |

**झ) संवर्धन व व्यवस्थापन आराखड्याचे स्वरुप**

१. संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करण्यासाठी आदिवासी विकास विभाग शासन परिपत्रक दि. ६ जुलै, २०१७ अन्वये मार्गदर्शक सुचना विहीत करण्यात आलेल्या आहे. त्यानुसार संवर्धन व व्यवस्थापन आराखड्याचे स्वरुप असणे अपेक्षित आहे.

२. ग्रामसभा तिच्या सदस्यांना व्यवस्थित समजेल, अशा सोप्या स्वरुपात संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करावे.

३. वनहक्क अधिनियम २००६ च्या कलम ३(१)(झ) आणि कलम ५ नुसार सामूहिक वनहक्कांचे संरक्षण पुनर्निर्माण किंवा संवर्धन किंवा व्यवस्थापन या बाबतचे प्राधिकार ग्रामसभा व ४(१) (ड) अंतर्गत गठीत समितीस असल्याने सवंर्धन व व्यवथापन आराखड्यांमध्ये वनांचे संरक्षण संवर्धन, पुनर्निर्माण तसेच वन्यजीव आणि जैवविविधता यांचे संरक्षण इत्यादी बाबींचा प्रामुख्याने समावेश असावा.

४. सामूहिक वनहक्क व्यवस्थापन आराखड्यामध्ये जंगलात प्रवेश, जंगलाचा वापर आणि जंगलाचे संवर्धन याबाबतचे नियम आणि नियमनाचा समावेश असावा.

**त) राज्यस्तरीय सुकाणू समिती रचना**

| अ.क्र. | समिती सदस्य | पद |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग , मंत्रालय, मुंबई. | अध्यक्ष |
| २ | प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई. | सदस्य |
| ३ | प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | प्रधान सचिव, मृद व जलसंधारण,विभाग,मंत्रालय,मुंबई | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव, पदुम, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ७ | प्रधान सचिव, (रोहयो), मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ८ | आयुक्त,आदिवासी विकास,नाशिक | सदस्य |
| ९ | आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे. | सदस्य ,सचिव |

**(टीप:- आवश्यकतेनुसार इतर विभागांच्या अधिका-यांना सदर बैठकिस आमंत्रित करण्यात यावे.)**

**"राज्य स्तरीय सुकाणू समिती" समितीची कर्तव्य व जबाबदारी**

१. सामुहिक वनहक्क प्राप्त गावांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्यांची अमलबजावणी संदर्भात प्रभावी नियंत्रण व संनियंत्रण ठेवणे.

२. जिल्हास्तरीय कन्व्हर्जन्स समितीला मार्गदर्शन करणे तसेच सदर प्रकल्पाचे मुल्यमापन करणे.

३. सामुहिक वनहक्क प्राप्त गावांचे संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व त्यांची अमलबजावणीसंदर्भात आदिवासी विकास विभाग,महाराष्ट्र राज्य यांचा सहभाग मार्गदर्शक व समन्वयक असा असेल.

४. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक/ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (या दोहोंपेकी जे नोडल अधिकारी असतील ते ) हे दर तीन महिन्याने या महिमेचा आढावा घेतील व संबधित विभागाचे प्राधिकृत अधिकारी यास उपस्थित असतील.

५. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा अध्यक्षतेखाली ६ महिन्यातून एकदा सुकाणू समिती बैठक आयोजित करण्यात येईल. कन्व्हर्जन्स योजने करिता लागणारा निधी आवश्यकतेनुसार आदिवासी उपघटक योजनेतून भागविण्यात यावा.

६. संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तयार करणे व अंमलबजावणी करणे कामी गठीत करण्यात आलेल्या जिल्हा कन्व्हर्जन्स समितीवर राज्यस्तरीय सुकाणू समितीचे संनियंत्रण राहील.

**थ)** वरील नमूद योजनेकरिता आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य, यांचा सहभाग मार्गदर्शक व समन्वयक असा असेल.

**द)** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०२१११२२१३२०१३४५२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish Vithalrao Kove

**(सतीश वि. कोवे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई.
२. मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
४. मा.विरोधी पक्षनेता विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
६. मा.उपाध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई.
८. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव ,मंत्रालय,मुंबई.
९. मा. सर्व मंत्री, यांचे खाजगी सचिव.मंत्रालय,मुंबई.
१०. मा. सर्व राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.

११. मा. विधानसभा / विधान परिषद, सदस्य सर्व
१२. मुख्य सचिव,यांचे उप सचिव,मंत्रालय,मुंबई
१३. अ.मु.स./प्र.स./सचिव,विभाग सर्व ,मंत्रालय मुंबई.
१४. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१६. सर्व जिल्हाधिकारी,
१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक
१८. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक.
१९. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर.
२०. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,
२१. सर्व जिल्हा कृषी अधिकारी,
२२. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
२३. सर्व कार्यकारी अभियंता,जलसंपदा विभाग
२४. सर्व कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग
२५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
२६. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
२७. सर्व नियंत्रक अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८. निवडनस्ती कार्यासन १४.

महाराष्ट्र शासन
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१
(Government of Maharashtra)
Tribal Research & Training Institute.
28, QUEENS GARDEN, PUNE 411 001.

दूरध्वनी - ०२०-२६३६२०७१
फॅक्स-०२०-६३६००२६
Tel- 020-2636 2071
Fax 020-26360026
Email-trti.mah@nic.in

क्र.आसंप्रसं/वनका/का.७/ ३०७० दिनांक : ९ सप्टेंबर, २००९

प्रति,

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हास्तरीय समिति,
जिल्हा - ठाणे ------

जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
शाखा क्रमांक
11 NOV 2009
ज.के.अ.
नि.व.नि. जिल्हाधिकारी

**विषय :-** **अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता), अधिनियम २००६, व नियम २००८ अंमलबजावणीबाबत..**

---

**अधिनियमातील कलम ३(२) च्या अनुषंगाने केंद्रशासन जनजातीय कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून निर्गमित अधिसूचनेचे मराठी भाषांतर.**

संदर्भ :-
१) या कार्यालयाचे पत्र क्र. आसंप्रसं/वनका/का.७/२०१९ दि.२८/५/२००९.
२) भाषा संचालनालय विभागीय कार्यालय, यांचे पत्र क्र.संकीर्ण/६६-०९ -अ-४८५ दिनांक २६/८/२००९.

विषयांकित अधिनियमामधील कलम ३(२) च्या अनुषंगाने केंद्रशासन, मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडून विहित केलेल्या कार्यपध्दतीची इंग्रजी व हिंदी भाषेतील अधिसूचना व त्या सोबतचे परिशिष्टे वरील संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये आपणास पाठविलेली आहे.

सदर अधिसूचनेचा भाषा संचालनालयाचेकडून मराठी अनुवाद संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झालेला असून, तो सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. मूळ संदर्भ म्हणून केंन्द्रशासनाचे दिनांक १८/०५/२००९ अन्वये अधिसूचित इग्रंजी व हिंदी प्रतीचा वापर करावा.

सहपत्र : वरीलप्रमाणे.

आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे करीता

5629
13/11/09

प्रत :
१) मा. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर.
२) मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक, वनभवन, रामगिरी मार्ग, महाराष्ट्र राज्य, नागपर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.
३) आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नाशिक यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.
४) अप्पर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ठाणे, नाशिक, नागपूर, अमरावती यांना माहिती व पुढील कार्यवाहीस अग्रेषित.

-909

**विभागीय सहाय्यक भाषा संचालक, भाषा संचालनालय, पुणे-४११ ००१ यांचे पत्र क्र. संकीर्ण/ ६६-०९-अ-४८५ दि. २६/०८/२००९ अन्वये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियमामधील कलम ३ (२) च्या अनुषंगाने विहीत इंग्रजी कार्यपध्दतीचा केलेला मराठी अनुवाद**

---

पत्र क्र. २३०११/१५/२००८- एस जी. दोन
याचे जोडपत्र
दिनांक १८ में, २००९

**भारत सरकार**

**आदिवासी कार्य मंत्रालय**

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३ (२) अन्वये शासनाद्धारे देण्यात आलेल्या सुविधांकरिता वन्य जमीन वनेत्तर प्रयोजंनासाठी बदलण्याकरिता पूर्वमान्यता घेण्याकरिता कार्यपद्धती

---

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३, पोट कलम (२) मध्ये अशी तरतूद आहे की, वन (संरक्षण) अधिनियम, १९८० या मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही केंद्र सरकार, त्या कलमामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे सरकारद्धारे देण्यात येणा-या काही विशिष्ट सुविधांकरिता वन जमिनीच्या वापरामध्ये बदल करण्याकरिता तरतूद करेल, ज्यात प्रती हेक्टर पंच्याहत्तर पेक्षा अधिक नाही इतकी झाडे पाडणे याचा अंतर्भाव आहे, परंतु जर

(एक) उक्त पोटकलमामध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनाकरिता परिवर्तीत करावयाची वन जमीन प्रत्येक प्रकरणात एक हेक्टर पेक्षा कमी असेल तर

D:\Mangal\letter no. 23011-15-2008.doc

(दोन) अशा विकासात्मक प्रकल्पांची मान्यता ही ग्रामसभेने शिफारस केली आहे या शर्तीच्या अधीन असेल, असे असेल तरच केवळ वनजमिनीच्या अशा परिवर्तनास मान्यता देण्यात येईल.

२. अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३, चे पोटकलम (२) च्या तरतुदींच्या अंमलबजावाणीकरिता, केंद्र सरकार याद्वारे पुढील कार्यपद्धती निर्धारीत करत आहे. :-

२.१ व्याख्या :- कार्यपद्धतीमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) "अधिनियम" याचा अर्थ, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ (२००७ चा २) असा आहे;

(ख) " जिल्हास्तरीय समिती" याचा अर्थ, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) नियम, २००८ च्या नियम ७ नुसार स्थापन करण्यात आलेली असा आहे;

(ग) " वन जमीन" याचा अधिनियमाच्या कलम २ (घ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे तसाच अर्थ असेल;

(घ) " ग्रामसभा" याचा अधिनियमाच्या कलम २ (छ) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे तसाच अर्थ असेल;

(ङ) " मध्यस्थ अधिकारी " याचा अर्थ, वनसंरक्षकापेक्षा कमी दर्जाचा नसणारा, अधिनियमान्वये वनजमिनी परिवर्तीत करण्याशी संबंधित बाबींवर कार्यवाही करण्याकरिता राज्य शासनाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, असा आहे;

(च) " कलम" याचा अर्थ, अधिनियमाचे कलम असा आहे;

(छ) " वापरकर्ता अभिकरण" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ च्या पोट कलम (२) मध्ये विनिर्दिष्ठ केल्याप्रमाणे शासनाकडून चालविण्यात येणा-या विकासात्मक प्रकल्पांसाठी वन

जमिनीच्या परिवर्तना करिता विनंती करणारा केंद्र किंवा राज्य शासनाचा विभाग किंवा जिल्हा पंचायत, असा आहे;

(ज) " खेडे" याला अधिनियमाच्या कलम २ (त) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे तोच अर्थ असेल;

२.२ अधिनियमाच्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये वनजमिनीचे परिवर्तन करण्याकरिता मान्यता मागणारे प्रस्ताव सादर करणे-

(एक) अधिनियमाच्या कलम ३ (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही विकासात्मक प्रकल्पाकरिता कोणत्याही वन जमिनीचा ज्यांना वापर करावयाचा आहे असे प्रत्येक वापर कर्ता अभिकरण सोबत जोडलेल्या योग्य नमुन्यामध्ये म्हणजेच नमुना 'क' मध्ये प्रस्ताव तयार करेल आणि तसा ठराव स्विकारण्यासाठी संबंधित ग्राम सभेच्या सर्वसाधारण सभेपुढे तो ठेवेल.

(दोन) वन जमिनीचे परिवर्तन करण्याची शिफारस करणारा ठराव स्विकारण्याकरिता ग्राम सभेच्या सदस्यांपैकी किमान निम्या सदस्यांची गणपूर्ती उपस्थित असली पाहीजे.

(तीन) ग्राम सभेने प्रस्तावाची केलेली शिफारस प्राप्त झाल्यानंतर, वापरकर्ता अभिकरण ग्राम सभेने स्विकारलेल्या ठरावासह तो प्रस्ताव त्या क्षेत्राच्या संबंधित वन क्षेत्रपालाकडे सादर करेल.

(चार) संबंधित वन क्षेत्रपाल, प्रस्तावाच्या स्विकृतीवरील मत देण्याकरिता प्रस्तावित क्षेत्राच्या जागेचे निरीक्षण करेल.

(पाच) संबंधित वनक्षेत्रपाल, सोबत जोडलेला नमुना 'ख' मध्ये, जागेच्या तपासणीचा अहवाल व त्याचे मत यांसह, प्रस्ताव व त्याच्या शिफारशी संबंधित विभागीय वन अधिका-याकडे, वापरकर्ता अभिकरणाकडून पूर्ण प्रस्ताव मिळण्याच्या दिनांकापासून तीन आठवडयांच्या आत सादर करेल.

(सहा) संबंधित विभागीय वनअधिकारी प्रस्तावाचा विचार करेल आणि जर त्यांची संमती असेल तर तो त्याची मान्यता देईल, आणि वन क्षेत्रपालाकडून प्रस्ताव मिळाल्याच्या दिनांकापासून चार आठवडयांच्या आत त्याचा निर्णय संबंधित वन क्षेत्रपालाला कळवेल व त्याची एक प्रत जिल्हास्तरीय समितीच्या अध्यक्षांकडे पाठवेल.

(सात) संबंधित विभागीय वन अधिका-याकडून मान्यता मिळाल्यानंतर, वनक्षेत्रपाल, परिवर्तनाकरिता मान्यता मिळालेल्या वनजमिनीच्या क्षेत्राचे सिमांकन करेल व ती जमीन ग्राम सभेच्या देखरेखीखाली वापरकर्ता अभिकरणाकडे सुपूर्त करेल.

(आठ) वनक्षेत्रपालाद्वारे वापरकर्ता अभिकरणाने सादर केलेला प्रस्ताव संबंधित विभागीय वन अधिका-याने मान्य न केल्यास, तो असा प्रस्ताव जिल्हा स्तरीय समितीकडे अंतिम निर्णयाकरिता पाठवेल.

(नऊ) जिल्हास्तरीय समिती बैठक घेईल व कमीतकमी १/३ गणपूर्तीने अंतिम निणय घेईल, आणि जर प्रस्ताव स्विकारल्यास, अंमलबजावणीकरिता व अभिलेख व नकाशा यामध्ये दुरुस्ती करण्याकरिता विभागीय वन अधिका-याला निर्णय कळवेल.

(दहा) विशिष्ट प्रयोजनाकरिता परिवर्तीत करण्यात आलेली जमिन इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता वापरण्यास परवानगी देण्यात येणार नाही आणि वापरकर्ता अभिकरणाला जमिन सुपूर्त केल्यापासून एक वर्षाच्या आत, ज्या कामाकरिता त्या जमिनीचे परिवर्तन करण्यात आले आहे ते काम सुरु न केल्यास वन विभागाकडून तिचा विनीयोग करण्यात येईल, या शर्तीच्या अधिन राहून विभागीय वन अधिकारी किंवा, प्रकरणपरत्वे जिल्हास्तरीय समिती यांच्याकडून वन जमीन परिवर्तीत करण्याकरिता मिळालेल्या संमतीला मान्यता देण्यात येईल.

(अकरा) संबंधित विभागीय वन अधिकारी, अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये वन जमिनीच्या परिवर्तनासाठी दिलेल्या मान्यतांचा त्रैमासिक अहवाल राज्याच्या मध्यस्थ अधिका-याकडे सादर करेल, जो त्यानंतर सचिव, आदिवासी कल्याण विभाग यांचेकडे एकत्रित माहिती सादर करेल, जो त्यानंतर आदिवासी कार्य आणि पर्यावरण व वने मंत्रालयाकडे एकत्रित अहवाल पाठवेल.

